
# 'स्व' - रूपवर्धिनी

## कार्यवृत्त-२००८



धन्य तुकाराम धन्य तुझी वाणी । ऐकतां उन्मनीदीप लागे ॥१॥
धन्य निस्पृहता एकविध निष्ठा । श्रुतिभावे स्पष्टा दाखविसी ॥२॥
- समर्थ रामदास

कां स्तविसी मातें दुर्बळा पतिता । नमितों समर्था पाय तुझे ॥१॥
ब्रह्मज्ञ ब्राह्मण वैराग्य पुतळा । रामभजनीं लीळा अनुपम्य ॥२॥
- संत तुकाराम

मूल्य रु. २५/-

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००८


**संस्थेचे पदाधिकारी**

श्री. जयसिंहभाई मरिवाला

श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ

श्री. श्रीकांत सामळ

श्री. शिरीष पटवर्धन



**संपादक**

श्री. जयंत कवठेकर

**संपादकीय मंडळ**

सौ. बागेश्री पोंक्षे

श्री. सुनील कुलकर्णी

श्री. कृ. गो. लवळेकर

**दूरध्वनी संपर्क**

श्री. जयंत शंकर कवठेकर

संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४

(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०



किंमत रूपये ५/-

वार्षिक वर्गणी रूपये १००/-

(विशेषांकासह)

आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त

चेक अथवा ड्राफ्ट 'स्व'-रूपवर्धिनी या

नावाने काढावा.


## अंतरंग


- हृद्गत
- वार्षिक कार्यक्रम वृत्त
- वर्षभरातील विशेष कार्यक्रम
- विशेष लेख
- आर्थिक स्थिती व आवाहन



**छपाई**

प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

वार्षिक विशेषांक — मुखपृष्ठ: श्री. अवधूत फडणीस

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

* पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर  * श्री. प्रमोद चौधरी

### *संस्थापक सदस्य*

- *श्री. पु. व. श्रॉफ*
- *श्री. श्री.शं. सामळ*
- *श्री. रा. प. देसाई*
- *श्री. कां. गि. शहा*
- *श्री. कृ. गो. लवळेकर*
- *श्री. वा. दे. संचेती*
- *कृ. ल. पटवर्धन*
- *अ. न. गोगावले*
- *दत्तोबा तांबे*

### *विद्यमान कार्यकारी समिती*

***अध्यक्ष***

*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

***उपाध्यक्ष***

*श्री. प्रतापराव पवार*
*श्री. उदय गुजर*
*श्री. अविनाश वारदेकर*
*श्री. आर. ए. मेहता*

***कार्याध्यक्ष***

*श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ*

***सहकार्याध्यक्ष***

*श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी*
*श्री. शिरीष पटवर्धन*

***कोषाध्यक्ष***

*श्री. श्रीकांत सामळ*

***सहकार्यवाह***

*श्री. ज्ञानेश पुरंदरे*
*श्री. अविनाश जोशी*
*श्रीमती पुष्पाताई नडे*

***सदस्य***

- *श्री. संजय तांबट*
- *श्री. कन्हैयालाल बलदोटा*
- *श्री जयंत कवठेकर*
- *श्री. रामभाऊ डिंबळे*
- *अॅड. सौ. निलिमाताई गोखले*
- *सौ. बागेश्री पोंक्षे*
- *प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर*
- *श्री. सुनील कुलकर्णी*
- *श्री. विश्वास कुलकर्णी*
- *श्री. विनोद बिबवे*
- *कु. दीपाली पवार*
- *श्री. अरविंद केळकर*
- *श्री. पराग लकडे*
- *श्री. कल्याण वर्दे*
- *प्रा. सौ. छाया सकटे*
- *मेजर श्री. किरण कुडलिंगार*
- *श्री. अजय कदम*
- *सौ. मेघना अत्रे*

**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. अॅक्टनुसार नोंदणी क्र.८३९३०६०**
संपर्काचा पत्ता : – 'स्व'-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११.
दूरध्वनी : – (कार्यालय) – २६१२१७०४, २६१३४३१०
**100% Exemption available under Sec. 35-AC of the Income Tax Act 1961**
**(For the period 2008-2009 to 2010-2011)** PAN No. : AAATS 5461K
भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)
ई-मेल : swaroopwardhinee@vsnl.net  वेबसाईट : http://www.geocities.com/wardhinee/
**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# हृद्गत

*भारत जगातील एक सामर्थ्यशाली आणि समृद्ध देश बनणार आहेच परंतु आपल्या देशाला त्या स्थानापर्यंत नेण्याच्या वाटेत जे अडथळे आहेत त्यांचा गांभीर्याने विचार करावा लागेल. निश्चयपूर्वक हे सर्व अडथळे दूर करावे लागतील. यातील एक मोठा अडथळा म्हणजे जातीजातींमध्ये निर्माण होणारे तणाव. केवळ कडक कायदे करून, अंमलबजावणी करणारी यंत्रणा निर्माण करून समाजाच्या मनोवृत्तीत अपेक्षित बदल होत नाही असा आजवरचा अनुभव आहे. जातीभेदांच्या आधारे जाती-जातीत तणाव निर्माण करणारी संकटे दूर करण्यासाठी सर्व समाजाला विश्वासात घेऊन आणि सर्वांचा सहभाग घेऊनच काम करावे लागेल.*

*आपल्याला फार मोठी संतपरंपरा लाभली आहे. सर्व संत महात्म्यांनी आपल्या कृतीतून, साहित्यातून समाजाला सर्वांच्या ठायी 'नारायण' पाहण्याचा दृष्टिकोन दिलेला आहे. असे असूनही समाजात वावरताना मात्र काही वेळा समाजातील काही मंडळी आपल्या तात्कालिक आणि क्षुद्र स्वार्थासाठी संतमहात्म्यांची जातीत विभागणी करताना दिसतात व यातून समाजाच्या ऐक्याला तडे जातात. हे वर्ष जगद्गुरु संत तुकाराम महाराज आणि राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामींच्या जन्म चतु:शताब्दीचे आहे. या दोन्ही संतांनी समाजाचे प्रबोधन करण्यासाठी जे विचार मांडले आहेत ते स्थलाभावी मर्यादित स्वरूपात तळटीपांमधून उद्धृत केले आहेत. त्यातील साम्य पाहिल्यावर त्यांच्यातील एकरूपता मोहून टाकते. 'साधु दिसताती वेगळाले, परि ते स्वरूपी मिळाले' या वचनातील सत्यता प्रत्ययास येते. जगद्गुरु संत तुकाराम महाराज आणि राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामींनी दाखवलेल्या वाटेने समाज वाटचाल करेल तेव्हा जातियतेसारख्या रोगावर आपण मात केलेली असेल आणि अशा एकरस समाजाने सर्व जगाच्या कल्याणासाठी मागितलेले पसायदान मग परमेश्वरही संतोषाने समाजाच्या ओंजळीत टाकेल. हा सुदिन लवकर येवो.*

*नव्या पिढीच्या मनात सर्व समाजाविषयी आत्मियतेची, समरसतेची भावना सहजतेने फुलविण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे प्रभावी माध्यम नाही. अनौपचारिक शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून वर्धिनी गेल्या तीस वर्षांपासून हीच आत्मियतेची, समरसतेची भावना रोजच्या कार्यक्रमातून आणि नैमित्तिक उपक्रमातून फुलविण्याचा नम्र प्रयत्न करीत आहे. व्यक्तिगत पातळीवर किंवा शाखांच्या उपक्रमांमध्ये या संस्कारांचे प्रतिबिंब उमटताना दिसते. सरलेल्या २००८ या वर्षामधील हे दोन प्रसंग पुरेसे बोलके आहेत.*

*१) अखंडानंद शाखेने यमगरवाडी येथील फासेपारधी मुलामुलींसाठी चालणाऱ्या प्रकल्पातील मुलांना वह्या-कंपासपेट्या अशा उपयुक्त वस्तू दिवाळीभेट म्हणून दिल्या. यासाठी प्रत्येक वर्धकाने योगदान दिले होते.*

*२) योगानंद शाखेत नव्याने आलेल्या आपल्या मित्राकडे अभ्यासाची पुस्तके नाहीत हे जाणवल्यावर स्वत:ची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असलेल्या त्याच्याच वर्गातील एका वर्धकाने मित्रांशी बोलून व थोडे-थोडे आर्थिक योगदान गोळा करून आवश्यक ती सर्व पुस्तके नवीन वर्धक मित्राला भेट दिली.*

*वर्ष २००८ मध्ये वर्धिनीमध्ये घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचा, उपक्रमांचा आणि आलेल्या वेगवेगळ्या अनुभवांचा आढावा आपल्यासमोर ठेवीत आहोत. वर्षभरात झालेल्या कामाचा आनंद जरूर आहे पण यापेक्षा अधिक काम होणे आवश्यक आहे याची जाणीवही मनात आहे. नव्या वर्षात असे काम करण्याचा आमचा संकल्प सिद्धीस जाण्यासाठी आपल्या शुभेच्छा आणि आपले सक्रीय सहकार्य मिळावे ही अपेक्षा.*

**आपले स्वहित न कळे जना । तेणें भोगिती यातना ।**
**म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा ।।**

# मुखपृष्ठ कथा




संत तुकाराम महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या जन्मचतु:शताब्दीच्या निमित्ताने हे मुखपृष्ठ तयार केले आहे. समकालीन असलेल्या या दोन्ही सत्पुरुषांच्या विचारांचा प्रभाव छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर होता आणि तेही या दोन्ही सत्पुरुषांपुढे सदैव नतमस्तकच होते. दोघांनीही छत्रपतींच्या स्वप्नातील हिंदवी स्वराज्य प्रत्यक्षात येण्यासाठी आवश्यक असे सामाजिक मन घडवले. संत तुकाराम महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांनी केलेल्या भक्तीच्या संस्कारातून राष्ट्रभक्तीचा हुंकार जागृत झाला आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी जीवाला जीव देणारे मावळे महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यातून उभे राहिले. या दोन्ही संतांचा दृढ स्नेह तर होताच पण दोघेही एकमेकांना श्रेष्ठ मानत होते. मुखपृष्ठावरील ओळी या दोन्ही संतांनी एकमेकांवर रचलेल्या खालील स्तवनातील आहेत.

*धन्य तुकाराम धन्य तुझी वाणी।*
*ऐकता उन्मनी दीप लागे।*
*धन्य निस्पृहता एकविध निष्ठा।*
*श्रुतीभाव स्पष्टा दाखविसी।*
*संतोषले चित्त होताचि दर्शन।*
*कळो आली खूण अवताराची।*
*घातलासे धडा नामाचा पै गाढा।*
*प्रेमे केला वेडा पांडुरंग।*
*नवविधा भक्ती रूढविली जगी।*
*तारुं कलियुगीं दास म्हणे। – समर्थ रामदास*

*का स्तविसी माते दुर्बळा पतिता।*
*नमितो समर्था पाय तुझे।*
*ब्रह्मज्ञ ब्राह्मण वैराग्य पुतळा।*
*रामभजनी लीळा अनुपम्य।*
*त्रेतायुगी स्वामीसेवा केली भारी।*
*श्रीरामावतारी महारुद्रा।*
*हें आम्हां कळले स्वामींच्या प्रतापे।*
*वदलो पायापें समर्थांच्या।*
*असावी ते कृपा समचरणी दृष्टी।*
*विटेवरी गोमटी वृत्ती राहो। – संत तुकाराम*

बाबा महाराज सातारकरांच्याच शब्दांत सांगायचे तर 'संत तुकाराम आणि समर्थ रामदास हे शिवछत्रपतींचे दोन डोळे होते'.* स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे की धर्म हा भारताचा आत्मा आहे. या धर्मामध्ये संत तुकाराम, समर्थ रामदास अशांसारख्या संतांची मांदियाळीच आहे. या संत महात्म्यांनी मांडलेल्या विचारांमधील एकरूपता लक्षात घेऊन समाजाने समरसतेचा भाव कृतीत आणला तर आपला देश एक सामर्थ्यशाली देश म्हणून लवकर उभा राहू शकेल. तो समरसतेचा संदेशच या मुखपृष्ठातून देण्याचा हा एक नम्र प्रयत्न.

* श्री समर्थ चरित्र आक्षेप आणि खंडन या पुस्तकातून.

दया तिचें नांव भूतांचे पालन । आणीक निर्दालन कंटकांचें ।।

# वर्षभरातील नित्याचे कार्यक्रम

## जिजामाता जयंती

शारदामणी महिला विभागाच्या वतीने १२ जानेवारी रोजी जिजामाता जयंती साजरी करण्यात आली. ज्या बचत गटांचे तीन वर्षांचे कामकाज पूर्ण झाले आहे त्या गटातील सदस्यांना बचत झालेल्या रकमेचा धनादेश या प्रसंगी देण्यात आला. सहकार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी राजमाता जिजाऊंचे प्रेरणादायी चरित्र या प्रसंगी सांगितले. या कार्यक्रमाला १०० महिला उपस्थित होत्या.

## प्रजासत्ताक दिन

सकाळी ८.३० वाजता अभ्यासिकेतील एक विद्यार्थी श्री. सोमनाथ पवळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामीण भागातून आलेल्या श्री. पवळे यांनी शिक्षण पूर्ण करताना आलेल्या अडचणींवर मात कशी केली याबाबत मनोगत व्यक्त केले.

## अनुभवांनी समृद्ध व्हा!

१०वी-१२ वीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम रविवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी मे. केमटेक लॅबोरेटरीजच्या सौ. भाग्यश्री भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी सौ. भागवत यांनी अनुभवातून होणारे शिक्षण आपले व्यक्तिमत्त्व कसे घडवते याबाबत स्वत:चे काही अनुभव सांगितले. विद्यार्थ्यांशी बोलताना त्या म्हणाल्या, 'तुम्ही जितके अनुभवसमृद्ध व्हाल तितके स्वत:ला घडवाल. वेगवेगळ्या प्रसंगी येणाऱ्या अनुभवातून माणूस खरा शिकतो पण त्याची संवेदनशीलता जागी हवी'.

# संक्रांत उत्सव

## बालवाडी व बालविभाग

१७ जानेवारी रोजी शिक्षणतज्ज्ञ सौ. रेणूताई गावस्कर यांच्या अध्यक्षतेखाली या विभागाचा संक्रांत उत्सव संपन्न झाला. बालवाडीच्या प्रत्येक वर्गाने सादर केलेल्या देखण्या प्रात्यक्षिकांनंतर पालकांशी बोलताना रेणूताई म्हणाल्या की पालकांनी आपली मुलं काय सांगत आहेत त्याकडे लक्ष देऊन ते ऐकले पाहिजे, त्यांच्याशी गप्पागोष्टी केल्या पाहिजेत आणि त्यांच्याशी खेळलेसुद्धा पाहिजे.

## शाखा आणि प्रकल्प विभाग

दिनांक २० जानेवारी रोजी संपन्न झालेल्या या विभागांच्या संक्रांत उत्सवाला अभिजित एअर सेफ्टी फौंडेशनच्या संचालिका सौ. कविताताई गाडगीळ उपस्थित होत्या. स्वातंत्र्यलढ्याच्या १५० व्या वर्षानिमित्त ४०० विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी 'भारतीय क्रांतीचा लढा' हे महानाट्य सादर केले. सुमारे सव्वा तास चाललेल्या या महानाट्याला सुमारे २००० प्रेक्षकांची उपस्थिती होती.

## विज्ञानदिन कार्यक्रम

विज्ञान दिनाच्या निमित्ताने २४ फेब्रुवारी रोजी झालेल्या प्रकल्प स्पर्धेचे उद्घाटन मे. प्राज इंडस्ट्रिज लिमिटेडच्या संचालिका सौ. परिमल चौधरी यांनी केले. त्यांनी 'ग्लोबल वॉर्मिंग' या विषयासंबंधी माहिती देत सामान्य व्यक्ती, विद्यार्थी या संकटावर मात करण्यासाठी काय योगदान देऊ शकतात हे सांगितले. प्रकल्प स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे-

> कष्टेविण फळ नाहीं । कष्टेविण राज्य नाही ।
> केल्याविण होत नाही । साध्य जनी ।।

| | | | |
|---|---|---|---|
| [illegible] वी) | प्रथम क्रमांक<br>द्वितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक | स्वामी दयानंद शाखा<br>स्वामी अखंडानंद शाखा<br>वीर अभिमन्यू शाखा | (प्रकल्प – नैसर्गिक शीतगृह)<br>(प्रकल्प – पूरनियंत्रण योजना)<br>(प्रकल्प – पाणी शुद्धीकरण) |
| मोठा गट (८थी ते १० वी) | प्रथम क्रमांक<br><br>द्वितीय क्रमांक | स्वामी अभेदानंद शाखा<br><br>भगिनी निवेदिता शाखा | (प्रकल्प – मातीचे निरीक्षण, प्रदूषण आणि उपाय)<br>(प्रकल्प – ग्लोबल वॉर्मिंग) |

यावेळी प्रश्नमंजुषा स्पर्धाही घेण्यात आली. त्याचे विजेते खालील प्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| लहान गट | प्रथम क्रमांक | स्वामी दयानंद शाखा |
| मोठा गट | प्रथम क्रमांक | स्वामी अभेदानंद शाखा |

## माडगावकर ट्रस्ट पुरस्कार

मुंबईच्या माडगावकर ट्रस्टने ठेवलेल्या कायमनिधीतून दरवर्षी तीन गटांमध्ये सर्वात्कृष्ट वर्धक/वर्धिकेची निवड करण्यात येते. वर्ष २००८ साठी खालील तीन जणांची सर्वोत्कृष्ट वर्धक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

१) पदवीधर गट : श्री. हर्षद कुलकर्णी (स्वामी अखंडानंद शाखा )

२) उच्च माध्यमिक गट : श्री. संदेश शेंडकर (स्वामी अखंडानंद शाखा)

३) माध्यमिक शाळा गट : कुमार संदेश मनवल (स्वामी दयानंद शाखा)

## धन्यवाद – 'छोट्या' वयाच्या 'मोठ्या' देणगीदाराला

वर्धिनीचे इंग्लंडमधील एक हितचिंतक कुटुंब गेल्या वर्षी वर्धिनीचे काम पाहायला येऊन गेले. त्यांच्या सोबत त्यांचा मुलगा सागर हाही होता. तो ८वीमध्ये शिकतो. इंग्लंडला परत गेल्यावर त्याने आपल्या शाळेत/शाळेतील मित्रांना वर्धिनीचे काम सांगितले. वर्धिनीच्या कामाची चित्रफीत दाखवली व आर्थिक मदत देण्याचे आवाहन केले. त्याच्या या आवाहनाला त्याच्या शाळेने व मित्रांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यातून सुमारे १००० पौंड इतकी रक्कम वर्धिनीला देणगीरूपाने मिळाली. दूर परदेशात राहणाऱ्या या छोट्या वयाच्या मोठ्या देणगीदाराला वर्धिनीच्या वतीने खूप खूप धन्यवाद.

पावलें पावलें तुझें आम्हा सर्व । नको दुजाभाव होऊं देऊं ।।

# शुभेच्छा कार्यक्रम

## होमनर्सिंग अभ्यासक्रम

पौड आणि आसपासच्या खेड्यामधील मुलींसाठी कोर्स सुरू केल्याचे हे पहिलेच वर्ष. या विद्यार्थिनींना शुभेच्छा देण्यासाठी झालेल्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी या नात्याने श्री. शिरीष पटवर्धन यांनी आपले विचार मांडले.

## 'पाकोळी' बालवाडी

मोठ्या गटातील सुमारे ११० विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम ८ एप्रिल रोजी संपन्न झाला. शुभेच्छा कार्यक्रमाला बहुतेक विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. आपल्या पाल्याला बालवाडीमध्ये मिळालेले संस्कार किती महत्त्वाचे आहेत याबाबत पालकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यातील काही प्रतिक्रिया अशा होत्या-

● माझ्या नातीला आई नाही पण येथील सर्व शिक्षिकांनी तिला आईचे प्रेम दिले, तिची तशी काळजी घेतली.

*(कु. अवंतिका गायकवाड हिचे आजोबा)*

● घरातील भांडणांमुळे अनेक दिवस मी माझ्या मुलाला शाळेत पाठविले नव्हते पण तो यायला लागल्यानंतर त्याच्या बाईंनी त्याला जवळ बसवून त्याचा अभ्यास करून घेतला. असं प्रेम त्याला आता नव्या शाळेत मिळेल का?

*(कु. प्रद्युम्न शिंदेची आई)*

● माझी धाकटी मुलगी या शाळेतून आता पहिलीसाठी दुसऱ्या शाळेत जाणार आहे. या बालवाडीमध्ये तिला जे संस्कार मिळाले ते खूप महत्त्वाचे आहेत. मला एका गोष्टीचे वाईट वाटते की माझ्या मोठ्या मुलीच्या वेळेस मला या बालवाडीची माहिती नव्हती आणि त्यामुळे मी तिला अन्य शाळेत पाठविले.

*(श्री. खोत)*

● माझ्या मुलीच्या पायात दोष आहे. मी तिला या शाळेत दाखल केले तेव्हा ती स्वत: चालू शकत नव्हती. तिच्या अपंगत्वामुळे तिला अनेक ठिकाणी प्रवेश नाकारला गेला. या शाळेत प्रवेश तर मिळालाच पण येथील वातावरणामध्ये तिच्या पायातील दोष खूप कमी झाला आहे. आज माझी मुलगी स्वत: जिने चढू-उतरू शकते आहे. वर्धिनीच्या वार्षिक उत्सवात तर तिला नाटुकल्यामध्ये महत्त्वाची भूमिका करायला मिळाली.

*(कु. आत्मजा खेतकरची आई)*

या कार्यक्रमाच्या निमित्ताने पालकांनी स्वयंस्फूर्तीने रुपये १६३०/- ची देणगी वर्धिनीला दिली.

# भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंती कार्यक्रम

या निमित्ताने वर्धिनीमध्ये दरवर्षी दोन कार्यक्रम संपन्न होतात. - १) डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसरात पाणपोई २) रक्तदान शिबिर

● यावर्षी पाणपोईच्या उद्‌घाटनासाठी सामाजिक समरसता मंचाचे पुणे महानगराचे अध्यक्ष व माजी उपमहापौर श्री. सुरेश नाशिककर उपस्थित होते. दिवसभर चाललेल्या या पाणपोईच्या माध्यमातून **सुमारे १३४४८** नागरिक बंधु-भगिनींची सेवा करता आली. ही व्यवस्था 'आजोळ' शाखेने सांभाळली.

● जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने संपन्न झालेल्या रक्तदान शिबिरात **१०९ रक्तपिशव्या** संकलित झाल्या. रक्तदान शिबिराची जबाबदारी श्री. प्रशांत तांबे यांनी समर्थपणे सांभाळली.

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥

**सहली -(१) हरिश्चंद्रगड**

७ एप्रिल रोजी पाच युवक १० वीच्या गटाला घेऊन हरिश्चंद्र गडाच्या मोहिमेवर गेले. खिरेश्वर गावात डबे खाऊन चैत्र शुद्ध द्वितियेच्या रात्री शुभ्र टिपूर चांदण्यामध्ये रात्री गड चढणे म्हणजे केवळ अविस्मरणीय सोहळाच होता. वाघेश्वरी खिंड, रॉकवॅच, माकडकडा, विंड पॉईंट आणि अवाढव्य गडाचे मुख्य आकर्षण कोकण कडा, प्रत्येक पॉईंटची मजा वेगळीच पण अविरत वाऱ्याशी झुंजून पोट आत गेलेला कोकण कडा कोणाच्याही पोटात गोळा आणल्याशिवाय राहत नाही.

**(२) श्री क्षेत्र भीमाशंकर**

वर्षभर अभ्यासात गुंतवणारी १२ वीची परीक्षा संपली आणि 'बारावी'कर युवकांना वेध लागले निसर्गाच्या कुशीत शिरण्याचे. स्थान ठरले भीमाशंकर. दि. १८ ते २० एप्रिल असे ३ दिवस ही मंडळी भीमाशंकरच्या जंगलात मनसोक्त विहार करीत होती. वाहनांची गर्दी, सिग्नल, ट्रॅफिक जॅम, कर्कश्श हॉर्न, घाई-धावपळ या सर्वांपासून कोसो दूर भरगच्च हिरव्या झाडीत, नीरव शांततेत, शुद्ध हवेत आणि प्राण्यांच्या राज्यात १२ वीतील श्रमांचा संपूर्ण परिहार घडला. २० विद्यार्थी सहलीत सहभागी झाले. भीमाशंकराच्या प्राचीन मंदिरातील उपासना व 'ॐ नमः शिवाय'च्या जपामध्ये अन्य भाविकही सहभागी झाले.

मोकळ्या गप्पांमध्ये १२ वी नंतर पुढे काय? करिअर इत्यादी संलग्न विषयांवरही चर्चा रंगल्या.

●●●

---

## वर्धापन दिन कार्यक्रम

**त्रिदशकपूर्ती वर्ष**

१३ मे २००८ रोजी वर्धिनीच्या कामाला २९ वर्षे पूर्ण झाली. त्रिदशक पूर्तीच्या या वर्षामध्ये वर्धिनीमध्ये येऊन गेलेल्या सर्व वर्धक वर्धिकांचे एकत्रीकरण करावे अशा हेतूने १३ मे रोजी शाखा-शाखांवर व्यावसायिक युवकांचे मेळावे घेण्यात आले. काही शाखांवर हे मेळावे १२ मे व १८ मे रोजी घेण्यात आले. एकूण २२५ युवक-युवती या मेळाव्यांना उपस्थित होते. मेळाव्यांना खालील कार्यकर्त्यांनी / वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

| | | |
|---|---|---|
| रामकृष्ण शाखा | - | श्री प्रमोद केशव बेहरे |
| स्वामी विवेकानंद व स्वामी अभेदानंद शाखा | - | श्री. यशवंतराव लेले |
| स्वामी सुबोधानंद शाखा व स्वामी ब्रम्हानंद शाखा | - | श्री. सुभाषराव इनामदार |
| स्वामी अखंडानंद शाखा व स्वामी दयानंद शाखा | - | श्री. संजय विष्णू तांबट |
| स्वामी योगनंद शाखा | - | श्री. अरविंद केळकर |
| भगिनी निवेदिता शाखा | - | श्री. शिरिष पटवर्धन |

**स्वामी ब्रह्मानंद शाखा**

शाखेचा वर्धापन दिन रविवार दिनांक १० ऑगस्ट रोजी संपन्न झाला. पाणी, अपारंपारिक ऊर्जा या क्षेत्रात काम करणाऱ्या गंगोत्री संस्थेचे प्रमुख श्री. संतोष गोंधळेकर हे या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

**भेदाभेद मतें भ्रमाचे संवाद । आम्हा नको वाद त्याशीं देऊं ॥**

## सुटीतील उपक्रम

### भगिनी निवेदिता शाखा :

१ जून रोजी शाखेचा १९ वा वर्धापन दिन संपन्न झाला. सेवावर्धिनी या संस्थेचे समन्वयक श्री. प्रमोद कुलकर्णी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. वर्धिकांनी वर्धिनीच्या शाखेत येत असल्याचा काय उपयोग होतो या बाबतीतील आपापले अनुभव सांगितले. उपस्थित पालकांनी वर्धिनीमुळे त्यांच्या पाल्यांमध्ये कोणते चांगले बदल झाले त्याविषयीचे अनुभव सांगितले. शाखा प्रमुख कुमारी गौरी बोर्लीकर हिने वर्षभरातील कामाचा आढावा घेतला.

याच दिवशी व्यावसायिक व गृहस्थी युवतींसाठी झालेल्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला श्री. अनंतराव अभंग हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. व्यवहारामध्ये वावरताना वर्धिनीने दिलेल्या संस्काराचा कसा उपयोग होतो या विषयी उपस्थित व्यावसायिक/ गृहस्थी वर्धिकांनी आपले अनुभव सांगितले. या एकत्रिकरणाच्या निमित्ताने मासिक वाचन गट सुरू करण्याचा संकल्प उपस्थित युवतींनी केला.

### विवेकानंद शाखा वर्धापन दिन

१२ जुलै रोजी कार्यक्रम संपन्न झाला. शिव-प्रतिष्ठान या संस्थेचे कार्यकर्ते आणि एम.आय.टी. इंजिनिअरिंग महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. पराशर मोने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रत्येकाच्या घरात टीव्ही असतो पण शिवछत्रपतींचा चरित्रग्रंथ नसतो असे सांगत समाजात ज्या-ज्या प्रकारच्या समस्या दिसतात त्या दूर होण्यासाठी चारित्र्यसंपन्न आणि कर्तव्यदक्ष नागरिक घडणे हे सर्वाधिक महत्त्वाचे आहे, असे त्यांनी आग्रहाने सांगितले.

### मल्लखांब प्रशिक्षण वर्ग

ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयाच्या माध्यमातून सुरू झालेल्या क्रीडाकुलाचे हे दशकतपूर्ती वर्ष आहे. या निमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमाचा भाग म्हणून मोठ्या संख्येने क्रीडा प्रात्यक्षिके सादर केली जाणार होती. या प्रात्यक्षिकात वर्धिनीच्या शाखांमधील वर्धक मल्लखांबाच्या प्रात्यक्षिकात सहभागी झाले होते. मे आणि जून या दोन महिन्यात जवळपास एक महिन्याचे सराव आणि कौशल्य प्रशिक्षण शिबिर निगडी येथे संपन्न झाले. या मध्ये सुमारे २५ वर्धकांनी सहभाग घेतला. दिनांक १५ जून रोजी झालेल्या क्रीडा प्रात्यक्षिकात या सर्व विद्यार्थांनी सादर केलेल्या प्रात्यक्षिकांना प्रेक्षकांची उत्तम दाद मिळाली.

### पोहण्याचा सराव

काही वर्षांपूर्वी उन्हाळी शिबिरामध्ये पोहण्याचे प्रशिक्षण नियमितपणे मिळत होते व त्याचा लाभ शेकडो वर्धकांना झाला. शिबिराच्या काळात तलाव उपलब्ध होण्यामधील अडचणींमुळे पुढे असे प्रशिक्षण देणे अवघड झाले. गेल्या दोन वर्षांपासून मात्र नरपतगिरी चौकातील गोसावीपुरा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या सहकार्याने उन्हाळी सुटीच्या काळात शाहु तलाव वर्धकांना पोहण्यासाठी उपलब्ध होत आहे. या वर्षी सुमारे १५० वर्धकांनी या व्यवस्थेचा लाभ घेतला.

### पोवाडा प्रशिक्षण वर्ग

शाहीर हेमंत मावळे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धिनीच्या भगिनी निवेदिता शाखेतील १० वर्धिकांनी पोवाडा प्रशिक्षण वर्गात सहभाग घेतला.

> रेखा तितुकी पुसोनि जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते ।
> डोळे झाकणी करावी ते । काये निमित्य ।।

## कल चाचणी परीक्षा

१० वी व १२ वी ची परीक्षा झालेल्या ३८ वर्धक वर्धिकांची कल चाचणी परीक्षा (Aptitude Test) घेण्यात आली. सौ. मेघा नगरे यांनी ही परीक्षा व त्यानंतरचे मार्गदर्शन सत्र घेतले.

## शाखांवर संपन्न झालेले विविध कार्यक्रम

वर्धिनीच्या शाखांनी बोधकथेवर आधारित नाटिका सादरीकरण, खजिनाशोध, हस्ताक्षर, वक्तृत्त्व, वैज्ञानिक माहितीचे सादरीकरण, कात्रज दुध डेअरीला भेट, विविध किल्यांच्या माहितीचे संकलन करणे, समाज प्रबोधन पर विषयांवर नाटिका सादरीकरण, व्यवस्थापकीय खेळ, इंग्रजी व गणित विषयांवर आधारीत प्रश्नमंजुषा. अशा विविध स्पर्धांचे आणि कार्यक्रमांचे आयोजन सुटीच्या कालावधीत केले होते. स्वामी श्रद्धानंद शाखेतील वर्धकांनी घोरपडी पेठेतील मंदिर, दर्गा व पाण्याच्या तळ्याची स्वच्छता करण्याचा उपक्रम घेतला होता.

### उद्योगशिक्षण वर्ग
### प्रशस्तीपत्रक वितरण कार्यक्रम

शैक्षणिक वर्ष २००७-०८ मधील बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग व सहाय्यक परिचारिका या दोन अभ्यासक्रमामध्ये उत्तीण झालेल्या विद्यार्थिनींना प्रशस्तिपत्रक देण्याचा कार्यक्रम दिनांक १२ मे रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सचिन नगरकर हे होते. सहाय्यक परिचारिका वर्गामधील एकूण ६० विद्यार्थिनींपैकी ५९ जणी उत्तीर्ण झाल्या. पुण्यातील तुकडीमध्ये कुमारी विविधा हिर्लेकर तर पौडच्या तुकडीमध्ये कु. अमृता फाले प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गामध्ये सौ. शमा शेख या प्रथम क्रमांकाने उत्तीण झाल्या.

## विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला !

आषाढी एकादशीच्या दिवशी बालवाडी आणि बालशाखा विभागाच्या वतीने काढण्यात आलेली दिंडी वर्धिनीच्या इमारतीमधून निघून सोमवार पेठेतील कण्वाश्रमाच्या श्री. विठ्ठल-रखुमाईच्या मंदिरात पोहोचली. संपूर्ण मार्गावर दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत झाले. विविध संतांच्या वेषभुषेमध्ये असलेल्या या छोट्यांना पहायला परिसरातील नागरिक आणि मुलांचे पालक आवर्जून उपस्थित होते. मंदिराच्या मुख्य पुजाऱ्यांनी दिंडीचे औक्षण करून स्वागत केले. इयत्ता चौथीमधील कुमारी भाग्यश्री बांगर आणि कुमारी लक्ष्मी कुर्ले यांनी 'तना-मनाची स्वच्छता' कशी राखावी या विषयावर कीर्तन सादर केले. सौ. स्वातीताई कारेकर यांनी त्यांना मार्गदर्शन केले होते. या बालकीर्तनकारांचा सत्कार सौ. कुमुदताई कुलकर्णी यांनी केला.

## गुणगौरव कार्यक्रम वृत्त –

शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये उत्तम यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना शाबासकी देण्याचा कार्यक्रम दि. २० जुलै रोजी संपन्न झाला. जिल्हा परिषदेच्या उपमुख्य अधिकारी सौ. दीपालीताई सडेकर (देशपांडे) या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. उत्तम यश मिळवलेल्या एकूण १८५ जणांचे प्रमुख अतिथींच्या हस्ते कौतुक करण्यात आले. काका हलवाई स्वीट्सचे श्री. सुरेंद्र गाडवे यांनी पेढ्यांच्या रूपाने देणगी देऊन सर्वांचे तोंड गोड केले.

## रक्तदान शिबिर–

सह्याद्री रक्तपेढीच्या सहकार्याने दि. १० ऑगस्ट रोजी बिबवेवाडीमधील विश्वकर्मा विद्यालयामध्ये शिबिर घेण्यात आले. प्रचंड पाऊस असूनही ५६ रक्तपिशव्या रक्त संकलित झाले. हे शिबिर यशस्वी

तुका म्हणे अणु तुजवीण नाहीं । नभाहुनी पाहीं वाड आहे ॥

करण्यासाठी पवन रासकर, राहूल शिळिमकर, प्रशांत तांबे, राकेश शेंडगे या युवकांनी विशेष प्रयत्न केले.

**स्वातंत्र्यदिन कार्यक्रम–**

संस्थेच्या इमारतीवर श्री. अप्पासाहेब पोतदार यांच्या हस्ते सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. सायंकाळी बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमामध्ये आंतरशाखीय क्रीडास्पर्धा घेण्यात आली. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने या वर्षी प्रकल्प स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये खालील शाखा विजयी झाल्या.

**लहान गट (महाराष्ट्रातील किल्ले) :**
अखंडानंद शाखा

**मधला गट ('स्व'-रूपवर्धिनी परिचय) :**
श्रद्धानंद शाखा

**युवक गट (हिंदू धर्म प्रवास आणि आव्हाने):**
स्वामी विवेकानंद शाखा

● कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ॲड. संजय चितळे यांच्या हस्ते यशस्वी गटांचे कौतुक करण्यात आले. ॲड. श्री. संजय चितळे यांनी छत्रपती संभाजी महाराजांचे अफाट कर्तृत्व आणि त्यांच्या पराक्रमाचा इतिहास आपल्या ओघवत्या आणि प्रभावी शैलीमध्ये सर्वांसमोर मांडला. शंभु महाराजांचा 'धैर्य' हा एक गुण जरी आपण जोपासायचा ठरविले तरी आपल्या जीवनामध्ये खूप बदल घडेल असे त्यांनी सांगितले.

● स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने स्वामी अखंडानंद शाखेतील वर्धकांनी ५ शाळांमध्ये जाऊन राष्ट्रध्वजाचा मान राखण्यासंबंधी आवाहन केले. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दोन्ही दिवशी दुर्दैवाने अनेकदा कागदी ध्वज रस्त्यावर पडतात, पायदळी तुडविले जातात किंवा फाटतात. अनावधानाने आपणच आपल्या राष्ट्रध्वजाचा अपमान करतो. गेली काही वर्षे वर्धिनीच्या अनेक शाखा रस्त्यावर पडलेले असे ध्वज गोळा करण्याचे काम करीत आहेत; पण या वर्षी शाळाशाळांमध्ये जाऊन स्वामी अखंडानंद शाखेच्या वर्धकांनी त्या त्या शाळेतील विद्यार्थ्यांना राष्ट्रध्वजाचा मान कसा राखावा हे सांगितले.

**बचत गट**

परिसरातील काही महिला वर्धिनीने संघटित केलेल्या बचत गटांच्या सदस्य आहेत. त्यापैकी काहींना घरच्यांच्या व्यसनांची समस्या सोसावी लागते. अशा महिलांच्या मागे शक्ती उभी करणे गरजेचे आहे. या विषयासंदर्भात श्री. रामभाऊ डिंबळे यांनी १५ जुलै रोजी भीमनगर परिसरातील पाच बचत गटातील महिलांना मार्गदर्शन केले. व्यसनांची समस्या असलेल्या घरांतील मुलांच्या भवितव्यासाठी काय करता येईल यासंबंधीसुद्धा काही विचार श्री. डिंबळे यांनी व्यक्त यावेळी केले. या बैठकीला ९० महिला उपस्थित होत्या.

● दिनांक २७ जुलै रोजी सौ. वागेश्री पोंक्षे यांच्या उपस्थितीत बचत गटांच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांचा प्रशिक्षणवर्ग झाला. सौ. पोंक्षे यांनी आपला गट चांगल्या पद्धतीने कसा चालवावा, आपले पद व त्यामागची जबाबदारी काय आहे, निरोप कसे द्यावेत, संपर्क कसा ठेवावा, कर्जवाटप-परतफेड, पदाधिकाऱ्याने सदस्यांशी कसे संबंध राखावेत व समूहभावना कशी विकसित करावी अशा महत्त्वाच्या विषयाचे मार्गदर्शन केले.

●●●

उत्कट भव्य तेचि घ्यावे । मळमळित अवघेंचि टाकावे ॥

## गणेशोत्सव–२००८



**१) श्री गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठा पूजा प्रशिक्षण वर्ग** –या वर्षी वर्धिनीच्या चार शाखांवरती ८ वी ते १० वी मधील विद्यार्थी, त्यांचे पालक आणि नागरिकांसाठी हा वर्ग २४ ते २८ ऑगस्ट या कालावधीत घेण्यात आला. ज्ञानप्रबोधिनीच्या संस्कृत, संस्कृती संशोधिका विभागाने या चारही वर्गांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी सांभाळली. या चारही प्रशिक्षण वर्गाचा सुमारे १२० जणांना लाभ मिळाला. प्रशिक्षण झालेल्या सुमारे दहा वर्धकांनी आपापल्या घरच्या गणपतीची प्राणप्रतिष्ठा पूजा केली तर २–३ वर्धक/युवकांनी घराजवळील सार्वजनिक मंडळाच्या मूर्तीचीही प्राणप्रतिष्ठा पूजा केली.

**२) राज्यस्तरीय ढोल–ताशे स्पर्धा**– झी वाहिनीच्या माध्यमातून यावर्षी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय ढोल–ताशे स्पर्धेत वर्धिनीच्या पथकाला तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**३) अथर्वशीर्ष पठण** – बालवाडीच्या मोठ्या गटाने चार मंडळांसमोर अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम केला. बालवाडी विभागातील शिक्षिकांनी सुद्धा एका मंडळासमोर अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम केला.

**४) पथनाट्य सादरीकरण** – शारदामणी महिला विभागातील सहाय्यक परिचारिका वर्गाच्या विद्यार्थिनींनी स्त्री भृण हत्या, स्त्री शिक्षणाचे महत्त्व, परिसर स्वच्छता, शारीरिक आरोग्य आणि व्यसनमुक्ती या विषयांवर आठ गणेशोत्सव मंडळांसमोर पथनाट्य सादर केले. अथर्वशीर्ष पठणाने कार्यक्रमाची सुरुवात व्हायची. सर्व पथनाट्यांना एकूण पाचशे नागरिक उपस्थित होते. शाखा विभागातील स्वामी ब्रह्मानंद, स्वामी अखंडानंद, स्वामी श्रद्धानंद, स्वामी सुबोधानंद आणि रामकृष्ण या शाखांनी या वर्षी पथनाट्ये सादर केली. सुमारे ४८ ठिकाणी ही पथनाट्ये सादर करण्यात आली. सांस्कृतिक प्रदूषण, गर्जा महाराष्ट्र माझा, अशा विषयांबरोबरच दहशतवाद आणि सुरक्षा या विषयांवर पथनाट्ये सादर झाली. एकूण सुमारे १२५ जणांनी पथनाट्य सादरीकरणात सहभाग घेतला आणि २५०० प्रेक्षकांपर्यंत वरील विषय पोहोचविले.

**५) प्रशिक्षण** – ठाणे येथे पर्यावरण शाळेच्या माध्यमातून पर्यावरणपूरक सजावटीचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणासाठी वर्धिनीचे तीन कार्यकर्ते जाऊन आले. वर्धक/वर्धिकांच्या घरांमध्ये पर्यावरण पोषक सजावट करता यावी असा प्रयत्न आहे. पुढच्या वर्षी या शिक्षणाचा उपयोग होईल.

**६) मिरवणुकीतील सहभाग** – प्रचंड उत्साह ओसंडून वाहताना दिसतो असा हा विषय. गणेश चतुर्थीच्या दिवशी तीन सार्वजनिक मंडळांच्या मिरवणुकांमध्ये वर्धिनीच्या पाच शाखा सहभागी झाल्या होत्या. तर अनंत चतुर्थी दिवशी पुण्याच्या मिरवणुकीत मानाचा चवथा गणपती तुळशीबाग मित्रमंडळ आणि श्रीमंत दगडूशेठ गणपती या दोन ठिकाणी वर्धिनी सहभागी झाली होती.

आत्मा नारायण सर्वांघरीं आहे । पशुमध्यें काय कळों नये ।।

# वार्षिक सर्वसाधारण सभा -२००८

वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १९ ऑक्टोबर रोजी संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष. श्री. उदयराव गुजर होते. यावेळी तीन कार्यकर्त्यांचा वेगवेगळ्या क्षेत्रातील त्यांच्या कर्तृत्वाबद्दल गौरव करण्यात आला.

## औषधांसाठी मदत

● वर्धिनीच्या इमारतीमध्ये गरजू महिला व मुलांसाठी आरोग्य-केंद्राचा उपक्रम गेल्या १८ वर्षांपासून सुरू आहे. केईएम रुग्णालयाच्या सहकार्याने हा उपक्रम चालतो. या उपक्रमाला प्रोत्साहन आणि विकत आणाव्या लागणाऱ्या औषधांसाठी मदत म्हणून महादेवकर कुटुंबियांनी रुपये एक लाख पन्नास हजाराची देणगी जाहीर केली. यापैकी रुपये एक लाखाची देणगी देण्याचा कार्यक्रम वर्धिनीमध्येच संपन्न झाला. ही देणगी त्यांनी 'अॅड. नागुअण्णा व सौ. आनंदीबाई देशपांडे' यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिली आहे.

● लायन्स क्लब डेक्कन जिमखाना यांच्या माध्यमातूनही वर्धिनीच्या आरोग्यकेंद्र उपक्रमासाठी औषधे व पाच हजारांचा धनादेश देण्याचा कार्यक्रम ५ ऑक्टोबर रोजी झाला. लायन्स क्लब डेक्कन जिमखाना यांचे विद्यमान अध्यक्ष, पदाधिकारी आणि सदस्य कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

## मुलाखत महिला कुस्तीपटूची

अर्जुन पुरस्काराने सन्मानित झालेल्या राष्ट्रीय महिला कुस्तीपटु श्रीमती अंजली देवकर यांच्या अनुभव कथनाचा कार्यक्रम स्वामी अखंडानंद शाखेवर झाला. कुस्तीसारख्या पुरुषांची मक्तेदारी मानल्या गेलेल्या क्षेत्रात त्यांनी केलेले पदार्पण, यशस्वी कुस्तीपटू होण्यासाठी घेतलेली मेहनत या विषयीचे त्यांचे अनुभव अतिशय प्रेरणादायी होते.

## आकाशवाणी मुलाखत

आकाशवाणी पुणे केंद्राच्या युवावाणी कार्यक्रमामध्ये दि. ९ सप्टेंबर रोजी श्री. कैलास अंडील व कु. सुप्रिया फुलावरे या वर्धिनीच्या दोन कार्यकर्त्यांची मुलाखत झाली. शिक्षण/नोकरी सांभाळून सामाजिक काम करण्यामागील त्यांचा विचार, त्यांचे अनुभव आणि एकूणच सामाजिक कामात सहभागी होण्यामागची त्यांची प्रेरणा अशा विषयांवर ही मुलाखत घेण्यात आली होती.

सावधपण सोडो नये । व्यापकपण सांडू नये ।।

# शिबिरवृत्त

## हसत खेळत इंग्रजी

इच्छा असो वा नसो आज व्यवहारात-नोकरी-व्यवसाय दोन्ही क्षेत्रांत होणारे संभाषण हे इंगजीतून होते आणि ते तसे उत्तम करता येणे ही अत्यंत आवश्यक गोष्ट झाली आहे. मराठी माध्यमातून शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांच्या बाबतीत इंगजी बोलण्यासंबंधी मनात असलेल्या भीतीमुळे आत्मविश्वासाचा अभाव जाणवतो. ही भीती दूर व्हावी यासाठी या हेतूने ७ वी मधील विद्यार्थ्यांचे 'हसत खेळत इंग्रजी' शीर्षकाचे एक शिबिर संपन्न झाले. या शिबिरात इंग्रजी शब्दकोडी, विषयानुसार शब्दसंग्रह, अक्षरांनुसार शब्दसंग्रह, गोष्टी ऐकणे-गोष्टी सांगणे, स्वत:चा परिचय करून देणे, व्याकरणावर आधारित खेळ, इंग्रजी गाण्यांचा सराव आणि गोष्टीवर आधारित नाटकाचे सादरीकरण असे अनेक कार्यक्रम झाले. या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे या शिबिरात सर्व सत्रे कृतीसत्रे आणि स्पर्धात्मक कार्यक्रमांची होती. हे शिबिर शिबिरार्थी विद्यार्थ्यांना खूप आवडले.

शिबिर यशस्वी होण्यासाठी सौ. हेमाताई होनवाड, आरतीताई बाळ, कीर्तीताई पेडणेकर, रसिकाताई अजोतिकर आणि सौरभ भालेराव यांनी मोलाचे सहकार्य केले.

याच शिबिरार्थींसाठी दोन प्रेरणासत्रे झाली. 'मनाचे आरोग्य' या विषयावर श्री. संजय तांबट यांनी तर 'व्यक्तिमत्त्व विकास आणि शिबिरे' या विषयावर श्री. शिरीष पटवर्धन यांनी आपले विचार मांडले.

## कला आणि आरोग्य शिबिर (५ वी-६ वी मुलांच्या शाखा)

मानवी जीवनात कला आणि आरोग्य या दोन्ही विषयांचा विलक्षण परिणाम होत असतो. आरोग्य चांगले राहण्यासाठी कलेचा उपयोग होत असतो तर चांगल्या शरीरात चांगले विचार, चांगल्या कला टिकतात. वयोगट लक्षात घेऊन चित्रकला, हस्तकला, मूर्तीकला (साच्यातील मूर्ती व चिकणमातीच्या सहाय्याने बनवून), संगीत आणि अभिनय अशा पाच गटांमध्ये १०० शिबिरार्थींची विभागणी केली होती. या कलांचे मार्गदर्शन सौ. गौरी शेंडगे, श्रीमती ज्योत्स्ना कुंठे, सर्वश्री राम माळी, चेतन वैती, संकेत शेंबेकर व सातपुते सर यांनी केले. हस्तकला, मूर्तीकला, चित्रकला या कलांच्या प्रशिक्षणावर आधारित एक प्रदर्शनी समारोप कार्यक्रमाचे ठिकाणी मांडलेली होती. संगीत विषयामधील गटाला बासरी वाद्य शिकवण्याचे ठरविले होते. तीन दिवसाच्या सरावात हा गट भूप रागातील रचना वाजवायला शिकला.

आरोग्य या विषयासाठी पुढील तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले तसेच सर्व शिबिरार्थींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| डॉ. विनेश नगरे | दिनचर्या |
| डॉ. सचिन नगरकर | मनाचे आरोग्य |
| डॉ. रश्मी गुपचूप | पोषक आहार (स्लाईड शो) |

देखत हा जीव हुंबरे वरडत । निष्ठुराचे हात वाहाती कैसे ।।

दररोज संध्याकाळी होणाऱ्या प्रेरणासत्रांमध्ये खालील मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| श्री. मंदार परळीकर | भाक्रा-नानगल धरणाची जन्मकथा |
| श्री. केतन पुरंदरे | वेडात मराठे वीर दौडले सात |
| डॉ. प्रदीप आगाशे | क्रांतिकारक कथा (स्वा. सावरकर, मदनलाल धिंग्रा आणि अनंत कान्हेरे) |

रात्र कार्यक्रमामध्ये शक्ति-बुद्धी स्पर्धा, नाट्य-विविध गुणदर्शन या स्पर्धा खूपच चुरशीच्या झाल्या. सौ. संध्याताई साबणे यांनी कागदाच्या सहाय्याने पपेट कसे तयार करायचे हे शिबिरार्थींना शिकवले आणि या पपेटस्च्या सहाय्याने 'चल रे भोपळ्या टुणुक टुणुक' ही गोष्ट सांगितली. सर्व शिबिरार्थी पपेट तयार करण्यात आणि गोष्ट ऐकण्यात रंगून गेले होते.

दोन्ही शिबिरांचा समारोप दिनांक २४ एप्रिल रोजी संपन्न झाला. 'चिंटू' चित्रमालेचे जनक श्री. प्रभाकर वाडेकर आणि श्री. चारूहास पंडीत हे या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. श्री. चारुहास पंडित यांनी एकाच गोलाच्या सहाय्याने वेगवेगळी भाव दाखविणारे चेहरे कसे रेखाटता येतात याचे प्रात्यक्षिक दाखवले. श्री. प्रभाकर वाडेकर यांनी १७ वर्षांच्या 'चिंटू'च्या आठवणी ताज्या केल्या. ही चित्रकथा रोज रेखाटताना किती विचार करावा लागतो, हे प्रसंग, ही पात्रे कुठे सापडतात याबाबतचे अनुभव सांगितले. शिबिरार्थी मुलांनी 'चिंटू'विषयी खूप प्रश्न विचारून त्यांच्यातील कुतुहलाचे दर्शन घडवले. या कार्यक्रमात नाट्य प्रशिक्षण गटाने एक प्रसंग सादर केला तर इंग्रजी विषयाच्या शिबिरातील विद्यार्थ्यांनी दोन गीते व एक नाटक सादर केले.

### कला शिबिर-भगिनी निवेदिता शाखा

निवासी नसलेल्या या शिबिरात सकाळी ९.०० ते सायं. ७.०० शिबिरामध्ये सिरॅमिक पॉट पेंटिंग, वारली चित्रकला या कलांच्या शिक्षणाबरोबरच हस्ताक्षर कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात आले. सौ. सुनिता बोडस, सौ. सुजाता दाते व सौ. सविता पुराणिक यांनी वारली चित्रकला आणि सिरॅमिक पॉट पेंटिंगचे प्रशिक्षण दिले तर श्री. अरविंद गोखले यांनी हस्ताक्षर उत्तम होण्यासाठी अक्षराची उंची, त्याचे वळण अशा सर्व बारीक बारीक गोष्टींकडे लक्ष देत तीन दिवस सर्वांचे अक्षर घटवून घेतले.

या शिबिरार्थीसाठी तीन व्याख्याने झाली. त्यामध्ये श्री. जयंतराव कवठेकर यांनी दैनंदिन शाखेची आवश्यकता, श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी वर्धिनीच्या शिबिरातील अनुभव या विषयावर आपले विचार मांडले तर सौ. मृणालिनी दातार यांनी उमलत्या वयातील मुलींच्या शारीरिक-मानसिक आरोग्याशी संबंधित असा 'कळी उमलताना' हा विषय मांडला.

शिबिरार्थी वर्धिकांनी वढु येथील श्री. संभाजी महाराजांच्या समाधीस्थळाला भेट दिली. त्या ठिकाणी श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी श्री. शंभु महाराजांचे स्फूर्तीदायी चरित्र सांगितले. शिबिराचा समारोप डॉ. माधुरीताई देशपांडे यांच्या मार्गदर्शनाने झाला.

### नेतृत्त्वकौशल्य विकास शिबिर-खंडाळा-पारगाव

खंडाळा विभाग शिक्षण समिती (जिल्हा सातारा) या संस्थेच्या १३ शाळांमधील ६१ विद्यार्थी आणि

वर्धिनीच्या शाखांमधील १०० विद्यार्थी अशा विद्यार्थ्यांचे 'नेतृत्त्वकौशल्य विकास' या विषयावरचे शिबिर १५ ते १९ एप्रिल या कालावधीत झाले. ८ वी ते १० वी या इयत्तांमधील विद्यार्थी या शिबिरात होते तर शिबिर संचालन करणारे युवक ११ वी-१२ वी मधील होते. 'नेतृत्व' या विषय सूत्रावरील व्याख्याने, व्यायाम, योगासने, ध्यान, सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धा अशा वैविध्यामुळे शिबिर खूपच रंगले. क्रीडा विषयांमध्ये रॅपलिंग, दोरीचा मल्लखांब, तिरंदाजी, वेत्रचर्म अशा विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरात झालेली व्याख्याने खालीलप्रमाणे-

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| डॉ. प्रदीप आगाशे | नेतृत्त्वाची आवश्यकता (उद्घाटन सत्र) |
| श्री. भोसले सर | ईश्वर- सर्वश्रेष्ठ प्रेरणास्रोत |
| श्री. मोहन शेटे | क्रांतिकारक बिरसा मुंडा |
| श्री. शिरीष पटवर्धन | नेतृत्त्वाचे पैलू |
| श्री. अरविंद केळकर | संवाद कौशल्य |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | नेतृत्त्वाचे आदर्श |
| सौ. उर्मिलाताई गुजर | नियोजन कौशल्य |
| डॉ. राम साठे | समर्थांना अभिप्रेत नेतृत्त्व |
| श्री. सागर शेडे | वक्तृत्व कौशल्य |
| श्री. उदयराव गुजर | वास्तुशिल्पातील सौंदर्य (स्लाईड शो) |
| सौ. अनघा लवळेकर | समस्या निराकरण |

या शिबिराच्या समारोपाला सातारा जिल्हा शिक्षण प्रमुख श्री. उदयसिंह भोसले हे अध्यक्ष म्हणून तर प्रमुख वक्ते म्हणून श्री. रामभाऊ डिंबळे उपस्थित होते.

**शिबिरातील विशेष -**

१) रॅपलिंगचे कौशल्य शिकवण्यासाठी डॉ. विनेश नगरे दररोज पुण्याहून येत होते. हे सत्र दररोज सकाळी ६.०० वाजता होते.

२) उद्घाटन सत्रामध्ये डॉ. प्रदीप आगाशे यांनी सादर केलेले 'ए मेरे वतनके लोगो' या गीताच्या मराठी अनुवादित गीताने उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले.

३) शिबिराचा कालावधी आणखी दोन दिवस तरी वाढवावा असा आग्रह सातारा जिल्ह्यातील विद्यार्थी शिबिर प्रमुखांकडे सतत करीत होते.

४) ठरलेले एक व्याख्यानसत्र संबंधित वक्त्यांच्या अडचणीमुळे रद्द झाले. दहावीची परीक्षा दिलेल्या वर्धकांनी वेगवेगळ्या गटांमध्ये जाऊन 'नेतृत्त्व' हा विषय मांडला. अचानक दिलेल्या जबाबदारीला मिळालेला त्यांचा प्रतिसाद अतिशय उत्साह वाढवणारा होता.

**छंदवर्ग**

बालवाडीतून इयत्ता १ ली मध्ये गेलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा छंदवर्ग आयोजित केला होता. ८ ते २९ एप्रिल या कालावधीत झालेल्या या छंदवर्गात ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. या छंदवर्गात मुलांनी मातीकाम, घडीकाम, चित्रकला अशा कलांच्या माध्यमातून खूप वस्तू बनवल्या. त्यामध्ये बैल, बैलगाडी, हत्ती, गणपती, कासव,

देह समर्पिजे देवा । भार काहीच न घ्यावा ।
होईल आघवा । तुका म्हणे आनन्द ।।

पवनचक्की अशा गोष्टीचा समावेश होता. पाण्याची आणि वीजेची बचत हा विषय मुलांसमोर मांडला गेला. आपल्या पाल्याला सोडायला येणारे पालक मोठ्या कौतुकाने सांगत होते की ही मुलं घरात आणि शेजारी जाऊन सांगू लागली आहेत की "पाणी वाया घालवू नका, गळणारे नळ दुरुस्त करून घ्या, उगीचच वीज जास्त वापरू नका." वयाने लहान असूनही या विषयाचे महत्त्व त्यांना समजले आहे हे यामुळे लक्षात आले.

## व्यक्तिमत्व विकास शिबिर – लातूर

उन्हाळी शिबिरे सुरू असताना लातूर येथील अर्थभारती पतसंस्थेचे पदाधिकारी श्री. नितीन शेटे आणि त्यांचे दोन सहकारी भेटायला आले. लातूर येथील विद्यार्थ्यांसाठी शिबिर घेण्याचे त्यांच्या मनात होते व हे शिबिर वर्धनीने घ्यावे असे त्यांनी सुचविले. त्यांची तीव्र इच्छा आणि त्यामागचा विचार लक्षात घेऊन तयारीला अवधी कमी असूनही शिबिर घेण्याचे ठरले आणि तयारीला सुरुवात झाली. श्री. नितीन शेटे व त्यांचे सहकारी निवासी शिबिरासाठी जागा, अन्य व्यवस्था आणि मुख्य म्हणजे शिबिरार्थी विद्यार्थ्यांची नोंदणी या कामाला लागले तर लातूरचे शिबिर घेण्याची जबाबदारी कोणावर सोपवावी, त्याचे सोबत सहकारी कोण असावेत आणि या शिबिरासाठी विषयसूत्र निश्चित करणे अशी कामे वर्धिनीत सुरू झाली. श्री. निलेश धायरकर यांच्यावर शिबिर प्रमुख म्हणुन जबाबदारी सोपवण्यात आली आणि १० वी ची परीक्षा झालेली नव्या दमाच्या वर्धकांची फळी त्यांच्याबरोबर सहकारी म्हणुन जायला सिद्ध झाली.

शिबिराला येणारे विद्यार्थी हे पहिल्यांदाच निवासी शिबिराला येणार असल्याने वेगवेगळी हस्तकला कौशल्ये, क्रांतिकारक कथा असे वेगवेगळे विषय शिबिरात घेण्याचे ठरले. प्रेरणादायी सत्रांसाठी लातूर व जवळच्या गावातील मान्यवर वक्त्यांना निमंत्रित करण्यात आले होते. ६ ते ९ मे अशा कालावधीत लातूरच्या केशवराज विद्यालयामध्ये हे शिबिर संपन्न झाले. या शिबिरात पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाले.

**शिबिरातील प्रेरणा सत्रे व अन्य व्याख्यान सत्रे**

| विषय | वक्त्यांचे नाव |
|---|---|
| आदर्श दिनचर्या व पोषक आहार | डॉ. राजीव कुलकर्णी |
| 'प्रेरणा' | श्री. अभिजीत जोंधळे |
| भारत माझा देश आहे – प्रतिज्ञेचा भावार्थ | श्री. मोहनराव कुलकर्णी |
| आदर्श बालनागरिक | श्री. प्रफुल्ल कुलकर्णी |
| विज्ञानातील गमती जमती (जादूचे प्रयोग) | श्री. शिरीष पोकळे |
| १८५७ स्वातंत्र संग्रामगाथा | श्री. मिलिंद बिलोनिकर |
| क्रांतिकारक अनंत कान्हेरे | श्री. शिरिष पटवर्धन |
| अफजलखान वध | श्री. ज्ञानेश पुरंदरे |

सकळासि नम्र बोलणे । मनोगत राखोन चालणे ।
मृदुवचने बोलत जाणें । कोणी येकासी ॥

१० वी च्या तुकडीतील नवयुवकांनीही दररोज एक कथा सांगितली. या सर्व कथा शिबिरार्थी मुलांना खूप आवडल्या.

| | |
|---|---|
| वीर बालक फतेहसिंह/ जोरावरसिंह | आकाश जाधव |
| मदनलाल धिंग्रा | प्रतिक बोरूडे |
| एक होता कार्व्हर | संदेश मनवल |
| कोंडोजी फर्जंद | सारंग पोफळे |
| बहादूरगडची लूट | अमोल कुसुरकर |

शिबिराचा समारोप रा. स्व. संघाचे क्षेत्रीय संघचालक डॉ. अशोकराव कुकडे यांच्या मार्गदर्शनाने झाला.

## दिवाळी शिबिरे

मुलांच्या एकूण नऊ शाखा तीन भागांत विभागलेल्या आहेत. यावर्षी मुलांच्या शाखांची दिवाळी शिबिरे भागशः झाली. मुलींच्या शाखेचे एक आणि मालवण येथील विद्यार्थ्यांसाठी एक अशी एकूण पाच शिबिरे झाली. या शिबिरांचे विषय खालीलप्रमाणे होते.

| शाखा/भाग | विषय | स्थान | संख्या |
|---|---|---|---|
| भगिनी निवेदिता शाखा | पर्यावरण शिबिर | चिखलगाव (दापोली) | ३७ |
| श्री. शिवाजी वाचन मंदिर, मालवण | व्यक्तिमत्त्व विकास शिबिर | मालवण (सिंधुदुर्ग) | ६० |
| भाग एक (रामकृष्ण, विवेकानंद, अभेदानंद) | कला/अभ्यासपूरक कौशल्य | अपंग कल्याणकारी संस्था वानवडी | ८३ |
| भाग दोन (योगानंद, सुबोधानंद, ब्रह्मानंद) | विज्ञान | ज्ञानप्रबोधिनी-निगडी | १२० |
| भाग तीन (श्रद्धानंद, अखंडानंद, दयानंद) | संघटन/ पर्यावरण | क्रांतीवीर फडके विद्यालय, रावडी-भोर | २०३ |

### हिरवी छाया, हिरवी माया (पर्यावरण शिबिर)
### २२ ते २४ ऑक्टोबर, २००८

शैक्षणिक प्रकल्प भेट, शिबिर, सहल या सर्वच गोष्टी एकाच वेळी या शिबिरातून साध्य झाल्या. चिखलगाव (ता. दापोली) येथील लोकमान्य चॅरिटेबल ट्रस्ट संचालित मुलींचे होस्टेल, शाळा, डी.एड्. कॉलेज, डी.बी. आर.टी. कोर्स इ. प्रकल्पांची माहिती शिबिरार्थींनी घेतली. तसेच परिसरातील विविध प्रकारच्या झाडांची माहिती संस्थेचे अध्यक्ष श्री. राजा दांडेकर यांनी जवळजवळ तीन-साडेतीन

तास हिंडून दिली.

वसतीगृहापासून जवळच असलेल्या लोकमान्य टिळक स्मारकाला दिलेली भेट प्रेरणादायी होती.

पर्यावरण आणि पारंपारिक जीवनशैली तसेच पर्यावरण आणि आधुनिक जीवनशैली या विषयावर चर्चासत्र लताताई टिळेकर यांनी घेतले. शिल्पा पोफळे यांनी डॉ. राजा दांडेकर यांची मुलाखत प्रेरणासत्रात घेतली. या मुलाखतीतून श्री. सौ. रेणू दांडेकर यांच्या कार्याचा व जीवनाचाही पट मुलींसमोर अगदी मोकळेपणाने उलगडला गेला. 'पाषाण पालवी' ही प्रकल्प माहितीची सी.डी. मुलींनी यावेळी पाहिली.

वर्गसजावट, आदर्श ग्रामरचना, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे, वाद-विवाद, पोवाडा सादरीकरण, पर्यावरण विषयांवरील घोषवाक्ये तयार करणे इ. स्पर्धा शिबिरकाळात झाल्या. तसेच शेकोटीचा कार्यक्रम शेवटच्या दिवशी रात्री खूप रंगला.

श्री. राजा दांडेकर व सौ. रेणूताई दांडेकर यांच्या उपस्थितीत शिबिराचा समारोप झाला. चार दिवस निसर्गाच्या कुशीत राहिलेल्या सर्व शिबिरार्थी एस.टी. मार्गे पुन्हा एकदा आपल्या कॉंक्रीटच्या जंगलाकडे म्हणजे पुण्याच्या दिशेने मार्गस्थ झाल्या.

## भाग एक (कला आणि अभ्यासपूरक कौशल्य)

| पाचवी ते सातवी | |
|---|---|
| विषय | मार्गदर्शक |
| शुभेच्छापत्र तयार करणे | श्री. संदीर मोरे/श्री. दत्ता सकट |
| हस्ताक्षर कौशल्य | श्री. अरविंद गोखले |
| स्मरणशक्ती कौशल्य | श्रीमती अभयाताई टोळ |

| आठवी ते दहावी | |
|---|---|
| विषय | मार्गदर्शक |
| हस्ताक्षर कौशल्य | श्री. अरविंद गोखले |
| स्मरणशक्ती कौशल्य | श्रीमती अभयाताई टोळ |

आठवी ते दहावीसाठी भारतातील शिक्षण पद्धती व स्थिती या विषयावर खालील विशेष व्याख्यानसत्रे आयोजित केली होती.

| वक्ते | विषय |
|---|---|
| श्री. शशिकांत मांडके | भारतातील शिक्षणपद्धती व स्थिती (कालची) |
| प्रा. श्री. धनंजय कुलकर्णी | भारतातील शिक्षणपद्धती व स्थिती (आजची) |
| प्राचार्य श्री. अनिरुद्ध देशपांडे | भारतातील शिक्षणपद्धती व स्थिती (उद्याची) |

सायंकालीन प्रेरणासत्रामध्ये सर्वश्री मोहन शेटे, विलास कुलकर्णी आणि प्रा. शिरीष आपटे यांचे मार्गदर्शन मिळाले.

नानाजनांचे हृदय । मृदु शब्दें उकलावें ।
उंचनीच म्हणो नये । सकळांचे निववावे हृदय ।।

**शिबिरातील विशेष कार्यक्रम / उपक्रम :**

१) **अभिरूप न्यायालय :** (लहान गट) 'मुलांच्या विकासामध्ये आमची भूमिका' अशा विषयावर पालक, पाल्य, शिक्षक व प्रसारमाध्यमे चार गटांनी आपापली भूमिका मांडली.
(मोठा गट) 'देशविकासामधील आमचे स्थान' अशा विषयावर सामान्य नागरिक, शेतकरी, उद्योजक, सैनिक व राजकीय पुढारी अशा पाच गटांनी आपापली भूमिका मांडली.

२) **आदर्श प्रतिकृती स्पर्धा :** निवासी गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेत संरक्षणतळ, क्रीडासंकुल, व्यापारसंकुल, शाळा व रेल्वे स्थानक असे विषय प्रतिकृतींसाठी होते.

३) **साहित्यचित्र स्पर्धा :** निवासासाठी आणलेल्या साहित्याचा (चादरी, ताट वाटी इ.) वापर करून चित्र तयार करणे असे या स्पर्धेचे स्वरूप होते. पालखी, ऑलिंपिक्समधील स्पर्धा अशा विविध विषयांवर मुलांनी चित्रे बनविली.

४) **वाद्यपरिचय कार्यक्रम :** श्री. संतोष मोरे यांनी सुमारे २५ वाद्यांचा परिचय प्रत्यक्ष ती वाद्ये वाजवून करून दिला. या वाद्यांची वैशिष्ट्ये या निमित्ताने मुलांना समजू शकली.

५) **रात्रकार्यक्रम :** श्री. रमेश धायगुडे यांचे भारूड, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी अपंग कल्याणकारी संस्थेला दिलेल्या भेटीवर आधारित चित्रफीत, श्रीमती आरती बाळ यांचे व्हायोलिन वादन असे कार्यक्रम संपन्न झाले. उद्घाटन सत्रात श्री. ज्ञानेश पुरंदरे तर समारोप सत्रात श्री. अभयराव फडके यांनी मार्गदर्शन केले.

## भाग दोन (संघटन आणि पर्यावरण)

**मोठा गट**

| व्याख्यानाचा विषय | वक्ते |
|---|---|
| शिवरूप संघटन | श्री. विजय खुटवड |
| संतरूपी संघटन | श्री. रमेश धायगुडे |
| क्रांतिकारी संघटन आणि सावरकर | श्री. जयंत कवठेकर |
| चीनने मिळवलेले सामर्थ्य | श्री. चव्हाण |
| संघटन (लगान चित्रपटावर चर्चा संचालन) | श्री. निलेश धायरकर |

**लहान गट**

| व्याख्यानाचा विषय | वक्ते |
|---|---|
| बिग बॅग थिअरी | श्री. चव्हाण |
| पर्यावरण | श्री. चव्हाण |
| गोष्टी छत्रपती शिवरायांच्या | श्री. निलेश धायरकर |
| पक्षीजीवन | श्रीमती मेदिनी डिंगरे |
| कचरा व्यवस्थापन | श्री. नरेंद्र पितळे |

**सर्वांसाठी झालेली व्याख्यानसत्रे**

| | |
|---|---|
| शिबिरांमधून होणारा व्यक्तिमत्त्व विकास (उद्घाटन सत्र) | श्री. पवार |
| हुतात्मा राजगुरु यांचे चरित्र | श्री. मोहन शेटे |
| एक प्रेरणादायी देश– इस्राईल | श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| छत्रपती संभाजी महाराज (समारोप सत्र) | ॲड. श्री. संजय चितळे |

सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटी ।
तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ।।

**शिबिरात झालेले अन्य कार्यक्रम / उपक्रम**

१) इतिहास प्रश्नमंजुषा, २) भारूड, ३) पद्यमैफिल, ४) विविध बोधकथांवर आधारित गटचर्चा, ५) विविध गुणदर्शन कार्यक्रम - यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध गीते, नाट्यप्रसंग, पोवाडे सादर केले. अखंडानंद शाखेने मराठी गीतांचा एक कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचा समारोप शुभम कोकिळ या वर्धकाने सादर केलेल्या 'ऐ मेरे वतनके लोगो' या गीताने झाला.

**शिबिरातील विशेष उपक्रम/कार्यक्रम**

१) मातीचा वापर न करता किल्ले बनवण्याची स्पर्धा (यामध्ये मुलांनी चादरी, बॅगा अशी साधने वापरून किल्ल्यांच्या प्रतिकृती बनविल्या.

२) **खेळ-'शोध मास्टर माईंडचा'**- या खेळाद्वारे आतंकवादाचा मुकाबला कसा करावा याचे शिक्षण देण्यात आले. शिबिरार्थींचा प्रत्येक गट पोलिस दलाची भूमिका बजावत होता.

३) **कल्पना परिस्फोट (गटशः स्पर्धा)** - २०२० चे पुणे, २०२० ची 'स्व'-रूपवर्धिनी, २०२० चे ऑलिंपिक्स इ. विषय स्पर्धेसाठी होते. या स्पर्धेत एका गटाने शिबिर स्थानाजवळील कॅनॉलचा वापर करून २०२० साली समुद्रात ऑलिंपिक्स कसे होईल या बाबतच्या आपल्या कल्पना साकारल्या होत्या.

४) **ध्वजयुद्धाचा खेळ** - शिबिरांमध्ये मैदानावर होणारे खेळ हा आकर्षणाचा कार्यक्रम असतो. या शिबिर स्थानाजवळ असलेल्या टेकडीचा वापर करून मैदानी खेळांऐवजी ध्वजयुद्धाचा खेळ घेण्यात आला. आपल्या गटाच्या ध्वजाचे रक्षण करण्यासाठी या खेळाच्या दोन्ही गटांत ज्या प्रकारचा संघर्ष झाला त्यातून आपल्याजवळील शारीरिक ताकतीचा, चिवटपणाचा, धैर्याचा परिचय मुलांना झाला. खेळ शेवटच्या क्षणापर्यंत अत्यंत अटीतटीचा आणि झुंजीचा होत होता.

## भाग तीन (विज्ञान शिबिर)

शिबिरात येण्यापूर्वी अनेक शिबिरार्थींनी घरी वेगवेगळे प्रयोग करून पाहिले तसेच विज्ञानातील अनेक कुतुहला संबंधी माहिती गोळा केली होती. शिबिरामध्ये पुढील व्याख्यानसत्रे झाली.

| विषय | व्याखयाते |
|---|---|
| उद्घाटन सत्र | श्री. रामभाऊ डिंबळे |
| अपारंपारिक ऊर्जास्रोत | मनिषाताई पाठक |
| दैनंदिन विज्ञान | श्री. प्रदीप आगाशे |
| सामान्य विज्ञान | श्री. सुनील कुलकर्णी |
| नवे तंत्रज्ञान | श्री. सागर भगवान |

| प्रेरणासत्रे | |
|---|---|
| सुश्रुत, चरक (चरित्र) | सौ. चारुलता दातेगावकर |
| इतिहास शिबिरांचा | श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| कणाद | सौ. उज्वला पानसे-झा |
| समारोप सत्र | श्री. शिरीषराव पटवर्धन |

**मृदु बोलता सुख वाटते । हें तो प्रत्यक्ष कळते ।**
**आत्मवत पाहावें तें । मानीत जावें ।।**

## शिबिरात झालेले अन्य उपक्रम/कार्यक्रम

१) **विज्ञानकट्टा :** विविध वैज्ञानिक विषयांवरील गटचर्चा घेण्यात आल्या. यामध्ये वैज्ञानिक गावाची संकल्पना, अपारंपरिक ऊर्जास्रोत, भारतासमोरील वैज्ञानिक आव्हाने अशा वेगवेगळ्या विषयांचा समावेश होता.

२) **वैज्ञानिक कार्यशाळा :** वेगवेगळ्या वैज्ञानिक विषयांवरील गटकार्यांमध्ये विद्यार्थ्यांनी आदर्श गाव, वैज्ञानिक गाव याच्या प्रतिकृती मांडल्या. आपापल्या मनातील कल्पना त्यांनी मॉडेलमध्ये दाखविण्याचा प्रयत्न केला.

३) **रात्रकार्यक्रम :** श्री. मिलिंद देशमुख यांनी अंध:श्रद्धांचे निर्मूलन या विषयाची सप्रयोग मांडणी केली. छोटे छोटे प्रयोग करून समाजामध्ये काही लोक विज्ञानाचा दुरुपयोग करून अंध:श्रद्धा कशी पसरवितात हे समजावून सांगितले. याच विषयावर दुसऱ्या दिवशी गटचर्चा घेण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन श्री. रामभाऊ डिंबळे यांच्या मार्गदर्शनाने झाले तर समारोप सत्रासाठी श्री. शिरीष पटवर्धन हे उपस्थित होते.

## व्यक्तिमत्त्व विकास शिबिर, मालवण

मालवण येथे स्थायिक असलेल्या वर्धिनीच्या कार्यकर्त्या डॉ. सौ. रोहिणी दिघे यांच्या प्रयत्नातून श्री. शिवाजी वाचन मंदिराच्या सहकार्याने गेल्या वर्षी पहिल्यांदा तेथील विद्यार्थ्यांसाठी शिबिर घेण्यात आले होते. या विद्यार्थ्यांनी याही वर्षी आग्रहाने वर्धिनीला शिबिर घेण्याविषयी विनंती केली. त्यानुसार हे शिबिर झाले. व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने या शिबिरात पुढील व्याख्यान सत्रे व उपक्रम झाले.

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| कु. शिल्पा पोफळे | राणी चेन्नम्मा चरित्र |
| प्रा. चंद्रकांत गोखले | संत तुकाराम चरित्र |
| श्री. रविंद्र वराडकर | समर्थ रामदास चरित्र |
| कु. सुप्रिया फुलावरे | लोकमान्य टिळक चरित्र |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | शिवाजी महाराज चरित्र, स्वा. सावरकर चरित्र स्वामी विवेकानंद चरित्र |
| सौ. मेधाताई शेवडे | कीर्तन |
| श्री. प्रसाद देवधर | आपले पर्यावरण |
| श्री. चेतन महिंद्रकर | लढा पुरंदरचा (युद्धकथा) |
| श्री. रुपेश धुरी | मूल्यशिक्षण |
| श्री. अनिरुद्ध गायकवाड | हस्तकला प्रशिक्षण (कृतीसत्रे) |
| डॉ. राजेंद्र चव्हाण | नाट्यप्रशिक्षण (कृतीसत्रे) |

## शिबिरातील महत्त्वाचे –

१) वरील कार्यक्रमांव्यतिरिक्त शिबिरामध्ये गीत गायन स्पर्धा, विविध गुणदर्शन (नाट्यस्पर्धा), खजिना शोध (खेळ) असे अनेक कार्यक्रम संपन्न झाले.

२) मालवणमधील हे दुसरे शिबिर होते. सर्व शिबिरार्थींचे अनुशासन तर उत्तम होतेच पण शिबिरातील त्यांचा सहभाग अतिशय मन:पूर्वक होता. शिबिरातील वातावरण पूर्ण

संकोचोनी कारे झालासी लहान । घेई आपोषण ब्रह्माण्डाचें ।।

कौटुंबिक असेच राहिले.

३) शिबिराच्या लहान गटातील विद्यार्थ्यांनी अवघ्या चार दिवसात मल्लखांबावरील कसरती शिकण्याचे कसब दाखवले आणि शिबिर समारोपाच्या कार्यक्रमात या कसरती करून दाखविल्या.

शिबिराच्या उद्‌घाटनासाठी श्री. श्रीपाद वाघ (माजी संपादक–महाराष्ट्र हेराल्ड) हे उपस्थित होते तर समारोप सत्रामध्ये डॉ. सुभाषराव दिघे (कोकण प्रांत सेवा प्रमुख – रा. स्व. संघ) आणि ॲड. श्री. संजय चितळे यांनी मार्गदर्शन केले.

●●●

---

## कोऽहं? अर्थात 'स्व'ची ओळख

दिनांक ४ ते ६ जुलै या कालावधीमध्ये युवक गटाचा अभ्यासवर्ग शिवथरघळ येथे संपन्न झाला. दिनांक ४ जुलै रोजी रात्री १०५ युवक कार्यकर्ते केळद येथे पोहचले आणि ५ जुलै रोजी सकाळी पदभ्रमण करीत दुपारी एक वाजता शिवथरघळ येथे पोचले. डोंगरवाटांच्या मार्गाने पाऊस अंगावर घेत आणि वाटेवरल्या धबधब्यांच्या धारांखाली चिंब भिजून चैतन्याची अनुभूती घेत हा सारा प्रवास झाल्याने सात आठ तास सलग चालत येऊनही शिवथरघळीत पोहोचल्यावर सर्वजण अत्यंत उत्साहात होते. जेवणानंतर लगेचच अभ्यासवर्गाला सुरुवात झाली.

'उपासनेला दृढ चालवावे' हे सूत्र घेऊन पहिल्या सत्रात सुप्रसिद्ध समर्थ अभ्यासक श्री. सुनील चिंचोलकर यांनी युवक कार्यकर्त्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी उपासनेचे किती महत्त्व आहे हे दासबोधातील दाखले देत सांगितले. मन एकाग्र केल्यावर आपली शक्ती कशी वाढते हे सांगताना त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील एक प्रेरणादायी कथा सांगितली. मन शांत करा, स्थिर करा, एकाग्र करा अशा नेमक्या संदेशावर या सत्राचा त्यांनी समारोप केला. या सत्रानंतर अनेक कार्यकर्त्यांनी त्यांना प्रश्न विचारून आपल्या मनातील शंकांचे निरसन करून घेतले.

श्री. सुनीलजी चिंचोलकर यांच्या समारोपाच्या सूत्राला पुढे नेत दुसऱ्या सत्रामध्ये 'ऋषी संस्कृती विद्या केंद्राचे' ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. विनायक छत्रे यांनी मन एकाग्र करण्यामध्ये जे अडथळे येतात ते दूर कसे करायचे हे एका छोट्या कृतीतून स्पष्ट केले. सभागृहाबाहेरील अव्यवस्थित पादत्राणे व्यवस्थित ठेवण्याच्या छोट्याशा कृतीत अनेकांना सहभागी करून पादत्राणे व्यवस्थित ठेवण्यामुळे आपल्याला हवा असलेला जोड चटकन सापडतो किंवा तो कुठे ठेवला आहे हे सहज लक्षात राहाते हा कोणालाही येणारा अनुभव सांगत ते म्हणाले, की दिवसभरामध्ये मनामध्ये हजारो विचार येत असतात. यातील काही विचार महत्त्वाचे, काही कमी महत्त्वाचे तर अनेक विचार हे विसरून जावे असे पण रेंगाळत राहिलेले असतात. पादत्राणे व्यवस्थित लावल्याने जो फायदा होतो तसाच फायदा मनातील विचारांनाही अशी शिस्त लावून मिळवता येतो व त्यामुळे नेमक्या गोष्टींवर मन एकाग्र करता येते आणि नित्य उपासनेतून हे साधते असे त्यांनी सांगितले. वेगवेगळ्या यशस्वी व्यक्तींची उदाहरणे

हितकारक दे रे राम । जनसुखकारक दे रे राम ।
अंतरपारखी दे रे राम । बहुजन दे रे राम ।।

उपस्थितांना विचारून या सर्व व्यक्ती त्यांच्यातील ज्या गुणांनी यशस्वी झाल्या त्याची सूची फलकावर नोंदवून हे सर्व गुण निर्माण होण्याची कारणे आंतरिक आहेत की बाह्य कारणांनी हे गुण वाढीस लागतात यावर चर्चा झाली. बहुतांशी गुण हे व्यक्तीच्या आंतरिक इच्छाशक्तीमुळेच निर्माण होतात असे सर्वांना जाणवले. तसेच काम करताना ते आनंदाने व समाधानाने केले तर होणारे आंतरिक परिणाम किती सुखद असतात हे यशस्वी व्यक्तींच्या उदाहरणातून सहजपणे स्पष्ट झाले. यशस्वी होण्यासाठी असे गुण निर्माण होण्यामध्ये नित्य उपासना किती महत्त्वाची आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट करून या सत्राची त्यांनी सांगता केली.

संध्याकाळी कल्याणस्वामी सभामंडपामध्ये सामुदायिक उपासना झाल्यानंतर तीन गटांमध्ये गप्पागोष्टींचा कार्यक्रम झाला. या वेळी अनेकांनी आपण अनुभवलेले, ऐकलेले, वाचलेले प्रेरणादायी अनुभव, प्रसंग सांगितले. यामध्ये वर्धिनीचे काम करताना आलेल्या अनुभवांबरोबरच वृत्तपत्रातील प्रेरणादायी घटना, काश्मीरच्या सेवाभारती संस्थेने अतिरेक्यांमुळे अनाथ झालेल्या मुला-मुलींसाठी चालविलेल्या वसतीगृहाच्या कामातील अनुभव अशा अनेक घटना, प्रसंगांचा समावेश होता.

दिनांक ६ जुलैची सकाळ गिरिभ्रमणाचा आनंद लुटण्यात आणि शिवथरघळीच्या वरील मोठ्या धबधब्याच्या धारेत डुंबण्यात कधी संपली हे समजलेच नाही. योगवैद्यक अभ्यासक्रम प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन गेल्या काही वर्षांपासून स्वतःचे योगोपचाराचे केंद्र चालविणारे वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. केदार पारगावकर यांचे आसने, प्राणायाम व ध्यान या विषयांवरचे सत्र झाले. जोर बैठकांसारख्या व्यायामातून निर्माण होणाऱ्या शक्तीबरोबरच शरीराच्या आतील सर्व अवयवांची कार्यक्षमता वाढवण्यामध्ये आणि व्यक्तीची मानसिक शक्ती वाढवण्यामध्ये आसने, प्राणायाम आणि ध्यानाचे स्थान किती मोठे आहे याची जाणीव श्री. पारगावकर यांनी सर्वांना करून दिली. या वेळी काही आसने त्यांचे उपयोग, अनुलोम-विलोम, भस्रिका आदी श्वसनाचे व्यायाम आणि ध्यान हे विषय त्यांनी सप्रयोग करून घेतले.

भोजनोत्तर झालेल्या सत्रामध्ये शिवथरघळ येथील सुंदरमठ सेवा संस्था आणि समर्थ व्यासपीठाचे कार्यकर्ते श्री. श्रीराम सबनीस यांनी या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती सांगितली. तसेच शिवथरघळ या स्थानाचे ऐतिहासिक महत्त्वही सांगितले. या माहितीमुळे आपण किती पवित्र भूमीमध्ये अभ्यासवर्गासाठी जमलो आहोत हे सर्वांना जाणवले.

श्री. सबनीस यांच्या निवेदनानंतर गृपकॅप्टन (निवृत्त) श्री. दीपक आपटे यांचे 'श्रद्धेचे बळ' या विषयावर व्याख्यान झाले. हे व्याख्यान अनेक अर्थाने रंगले. माणसाच्या मेंदूमध्ये अनेक चुकीच्या समजुती कशा नोंदल्या जातात याची घडणारी प्रत्यक्ष उदाहरणे सांगत श्री. आपटे यांनी काही प्रत्यक्ष प्रयोग सर्वांकडून करून घेतले त्यामध्ये माणसाचे शरीर किती लवचिक होऊ शकते तसेच काचेच्या तुकड्यांवरून चालताना पायाला काहीही होत नाही याची प्रत्यक्ष अनुभूती सर्वांनी घेतली. या प्रयोगामध्ये शरीरातील अवयव मेंदूला देत असलेली माहिती आणि थोड्या सहेतूक केलेल्या सरावाने मेंदू शरीराला देत असलेली माहिती याचे होणारे परिणाम सर्वांनी अनुभवले. अशा प्रत्यक्ष प्रयोगातून श्री. आपटे यांनी 'विश्वासा'चे 'श्रद्धे'त रूपांतर कसे होते व त्याचे होणारे परिणाम

वर्णाभिमान विसरलो याति । येकयेका लोटांगणीं जाती रे ।
निर्मळ चित्तें झाली नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ।।

याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. न्युरो लिंग्वेस्टिक प्रोग्रामिंगच्या साह्याने त्यांनी केलेल्या या मांडणीने सर्वजण भारावून गेले. अपयशी व्यक्तीची मानसिकता अशा पद्धतीचा अवलंब करून कशी बदलता येते याची त्यांनी काही उदाहरणेही या वेळी सांगितली.

रंगलेल्या या सत्रानंतर छत्रपती श्री. संभाजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. मिलिंद एकबोटे यांनी अभ्यासवर्गाचा समारोप केला. मनाच्या सामर्थ्याविषयी समर्थ रामदासस्वामींनी मांडलेले विचार, छत्रपती श्री. शिवाजी महाराज, शंभू राजे, स्वातंत्र्यवीर सावरकर, मदनलाल धिंग्रा यांचे वेगवेगळे प्रेरणादायी प्रसंग सांगत त्यांनी जय भारत हे शब्द खरे करण्यासाठी आज प्रत्येकाने काय करायला हवे आहे याची जाणीव करून दिली.

दोन दिवसांचा हा अभ्यासवर्ग सर्वार्थाने यशस्वी झाला आणि तो यशस्वी होण्यामध्ये सुंदरमठ सेवा संस्थेमधील सेवेकरी श्री. केळकर, देव दांपत्य, श्रीमती आपटे ताई आणि अन्य सर्व सहकाऱ्यांचे खूप साह्य झाले.

---

## क्रीडादिन २००८

दैनंदिन शाखांवरील रोज होणारे खेळ हे नेहमीच उत्साहाने भरलेले असतात. पण क्रीडादिन म्हटलं की उत्साहाला उधाण येतं.

प्रत्यक्ष क्रीडादिनाच्या दिवशी म्हणजे १४ डिसेंबरला बिबवेवाडीच्या स्वामी अखंडानंद शाखेच्या मैदानावर सर्व शाखांचे संघ सकाळी आठ वाजता एकत्रित झाले. ५वी-६वी, ७वी-८वी, ९वी-१०वी आणि युवक अशा गटांमध्ये लंगडी, खो-खो आणि कबड्डीचे सामने झाले. व्यक्तिगत पातळीवरील १०० मीटर धावण्याची स्पर्धाही झाली. सर्व सामने अत्यंत चुरशीचे झाले. शालेय स्तरावरील लंगडी, खो-खो आणि कबड्डी हे सर्व सामने जिंकून स्वामी दयानंद शाखेने एक वेगळाच पराक्रम केला. युवक गटातील कबड्डीचे विजेतेपद समर्थ रामकृष्ण शाखेने खेचून आणले.

विजयी संघांना ॲड. संजय चितळे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. डॉ. विनेश नगरे यांनी शिस्तबद्ध संघ, सर्वोत्कृष्ट संयोजन, खेळातील कौशल्य हे गुण ज्या शाखेच्या संघामध्ये सर्वाधिक दिसतील त्या शाखेला एक चषक, एक मोठा व एक छोटा फूटबॉल, एक हँडबॉल व एक व्हॉलीबॉल बक्षीस रूपाने देण्याचे जाहीर केले होते. ही सर्व बक्षिसे दयानंद शाखेने पटकाविली.

With Best Compliments From :

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.,**

Plot No. 4, S. No. 17/1-B, Kothrud Industrial Estate,
Kothrud, Pune 411 038
Phone : 25431474, 25441124, 25464551

बहुतची सुकुमारा स्वस्थ नाही शरीरा ।
निशीदिनी जनचिंता लागलीसे उदारा ॥

# प्रयोगशाळा प्रकल्प विभाग


सुंदरमठ सेवा समिती, शिवथरघळ यांच्या पुढाकाराने याही वर्षी महाड तालुक्यातील कुंभे शिवथर, निगडे व वरंध या गावांमधील शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रयोग शिबिर घेण्यात आले. २ ते ६ डिसेंबर या कालावधीत ते संपन्न झाले. शिबिराला सर्वश्री सुनील कुलकर्णी, श्रीराम सबनीस, वसंत क्षीरसागर, प्रशांत कवडे, नीरज खोपडे, वैभव क्षीरसागर व आकाश जाधव यांनी मार्गदर्शन केले. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या अभ्यासक्रमातील सर्व प्रयोग त्यांना स्वत:च करून पाहण्याची संधी वर्धिनीने दिली होती. तसेच शाळांमधील सर्वच विद्यार्थ्यांसाठी विज्ञानावर आधारीत गमतीदार प्रयोग दाखविण्यात आले. हे सत्र सर्वच शाळांमध्ये खूप रंगले.


| गाव | विद्यार्थी संख्या | सत्र | वेळ |
|---|---|---|---|
| रामदास विद्यालय<br>कुंभे शिवथर | ३९ | १०वी प्रयोग<br>(प्रयोगसंख्या २०) | रोज आठ तास<br>दोन दिवस |
| न्यू इंग्लीश स्कूल<br>निगडे | २५० (५ वी ते १० वी)<br>३९ | गमतीदार प्रयोग<br>१०वी प्रयोग परीक्षा,<br>अभ्यास /लेखन कौशल्य | अडीच तास<br>तीन तास |
| छत्रपती विद्यालय<br>वरंध | ४५०<br>८० | गमतीदार प्रयोग<br>१० वी प्रयोग, | अडीच तास<br>तीन तास |

या शिबिरानंतर कुंभे शिवथर व वरंध येथील मुख्याध्यापकांनी काही अपेक्षा तसेच या उपक्रमाबद्दल आपल्या भावना खालीलप्रमाणे व्यक्त केल्या.

- २००६ मध्ये केलेल्या अशाच उपक्रमामुळे १० वीतील सर्व मुलांनी आत्मविश्वासाने प्रयोग परीक्षा दिली व सर्वांना उत्तम गुण मिळाले.
- प्रयोगांचे स्पष्टीकरण देताना जी माहिती सांगितली जाते, त्याची एखादी पुस्तिका काढावी.
- हा प्रयोगप्रकल्प फक्त १० वी पुरता न ठेवता ८ वी व ९ वी साठीसुद्धा करावा, जेणेकरून विज्ञान विषयातील अवघड संकल्पना सर्वांनाच स्पष्ट होण्यास मदत होईल व विषयाची गोडी वाढेल.

वर्धिनीच्या सर्व कार्यकर्त्यांना सुंदरमठ सेवा समितीने उत्तम पुस्तिकांचा संच भेट दिला. पुढील वर्षी प्रयोगशाळेचा उपक्रम करण्याचे निश्चित करून मार्गदर्शक गट पुण्याकडे परतला.





वर्णाभिमानें कोण झाले पावन । ऐसें द्या सांगोन मजपासी ।

## वर्षभरातील विशेष कार्यक्रम / अनुभव / प्रसंग

# करुनी देशाटन...

*वर्ष २००८ मध्ये एकूण सात अभ्यासदौरे आखण्यात आले. या दौऱ्यांच्या निमित्ताने दौऱ्यात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांना राज्याच्या/देशाच्या वेगवेगळ्या भागातील समस्या व त्या समस्यांचे समाधान शोधणाऱ्या, त्यासाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांच्या सहवासात काही वेळ राहता आले. त्यांच्याशी गप्पा मारता आल्या. या दौऱ्यातील त्यांचे अनुभव त्यांच्याच शब्दात...*

## अभ्यासदौरा (१)

### मुक्काम पोस्ट नंदुरबार

पाच कार्यकर्त्यांचा गट नंदुरबार जिल्ह्याचा प्रवास करून आला. चार दिवसात जवळपास पूर्ण जिल्ह्याचे ओझरते दर्शन आणि काही प्रकल्पांचे अध्ययन दौऱ्याचा वृत्तांत या गटाला करता आले.

**या दौऱ्यात भेटी दिलेल्या संस्था, ठिकाणे –** १) डॉ. हेडगेवार शिक्षण सेवा समिती संचलित कृषी विज्ञान केंद्र, नंदुरबार २) नवापूर तालुक्यातील बारीपाडा गाव ३) सातपुडा पर्वत रांगातील दोन गावे : धनाजे व बिलगाव

**भेटलेल्या व्यक्ती :** कृषीविज्ञान केंद्रप्रमुख डॉ. गजानन डांगे आणि त्यांचे सहकारी प्राध्यापक/संशोधक, बारीपाड्यातील श्री. चैतराम पवार, धनाजे गावाचे कार्यकर्ते श्री. जैलसिंग, श्री. मोतीरामजी पाटील व श्री. शंभु सदाशिव तथा दादा पाटील

**जिल्ह्याची स्थिती :** ६५ % आदिवासी लोकसंख्या असलेला नंदुरबार जिल्हा आजही अनेक मुलभूत सुविधांच्या अभावामुळे अविकसित आहे. या जिल्ह्याचे साक्षरतेचे प्रमाण ५६% आहे. १८ वर्षांखालील मुलींच्या विवाहाचे प्रमाण ५० ते ६०% आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबसंख्या ७५.४३% आहे. सुझलॉन कंपनीचा पवनचक्क्यांच्या माध्यमातून चाललेला वीजप्रकल्प सोडला तर या जिल्ह्यात मोठा म्हणावा असा एकही उद्योग नाही. नंदुरबारची अशी थोडी प्राथमिक माहिती घेऊन अभ्यासगट १८ डिसेंबरला सकाळी तेथे पोहोचला. नंतर झालेल्या प्रत्येक भेटीतून तेथील समस्यांचीही जवळून ओळख झाली आणि ही परिस्थिती बदलवून टाकण्याचा वसा घेतलेली माणसेही भेटली.

### डॉ. हेडगेवार शिक्षण सेवा संस्था संचालित कृषी विज्ञान केंद्र – नंदुरबार

केंद्रसरकारच्या योजनेतून भारतातील प्रत्येक जिल्ह्यात एक कृषी विज्ञान केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्यापैकी नंदुरबार जिल्ह्याच्या केंद्राचे संचालन वरील समिती करते. २००० साली हे केंद्र सुरू झाले आणि अवघ्या ६-७ वर्षांमध्ये या केंद्राने केलेल्या कामामुळे आज या केंद्राच्या कामाची दखल राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही घेतली जात आहे.

**भेटीतून जाणवलेली केंद्राची वैशिष्टचे :** कोरडवाहू शेती करणारा शेतकरी, पाणी उपलब्ध असलेला शेतकरी, दुष्काळी/कमी पावसाच्या तसेच डोंगराळ भागात शेती करणारा शेतकरी या सर्वांना शेती

पृथ्वीमध्ये जितुकी शरीरे । तितुकी भगवंताची घरे ।

अधिक उत्पन्न देणारी कशी करता येते याचा प्रत्यक्ष अनुभव देणारे एक-एक एकरांवरील शेतीप्रयोग, विविध फळझाडे, विशेषत: दुष्काळी/कमी पावसाच्या क्षेत्रात बोराच्या यशस्वी शेतीचा प्रयोग, कीडनियंत्रण करण्यासाठी यशस्वीरीत्या राबविलेले पर्यावरणस्नेही प्रयोग. हे सारे प्रयोग ५० एकराच्या शेतांवर प्रत्यक्ष केलेले आहेत व हे प्रयोग पाहण्यास जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने येतात. प्रत्यक्ष सुदूर डोंगरदऱ्यांमध्ये शेती करणाऱ्या वनवासी शेतकऱ्याला त्याच्या दारात जाऊन शेतीप्रयोग शिकवण्याचे काम संस्थेचे प्राध्यापक/संशोधक करतात. यातूनच कांद्याचे १०० टक्के शुद्ध बेणे निर्माण करण्याचे केंद्र म्हणून येथील काही वनवासी भाग विकसित होत आहे आणि दोन वेळची चूल पेटण्याची भ्रांत असलेल्या वनवासी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान फुलायला लागले आहे. तूरडाळीचे पीक खाणाऱ्या आळीचे नियंत्रण करण्यासाठी या केंद्राने सुचवलेल्या आणि पर्यावरणाचे संतुलन राखणाऱ्या उपायांमुळे या किडीचा धोका जवळपास संपत चालला आहे. या प्रयोगाची दखल महाराष्ट्र सरकारने घेऊन या प्रयोगाची व्हिडिओ कॅसेट राज्याच्या अनेक भागांमध्ये दाखविली आहे.

**बारीपाडा (नवापूर तालुका) :**

जेमतेम ९० उंबऱ्याचा डोंगरांच्या कुशीतील हा एक पाडा. पण याचं नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकलं ते या गावाला इटलीमध्ये मिळालेल्या आशिया पातळीवरील पुरस्काराने. 'Local Knowledge And Innovation of the Rural Poor' या विषयासाठी हा सन्मान या गावाला मिळाला. त्यामुळे हे गाव कसं आहे, या गावाचे नेतृत्व करणारे श्री. चैत्राम पवार कसे आहेत हे जाणून घेण्याची इच्छा होती. स्वत: एम.कॉम पर्यंतचे शिक्षण झालेले श्री. चैत्राम पवार हे वनवासी कल्याण आश्रमाच्या संपर्कात आले. त्यांच्यातील सामाजिक बांधिलकीच्या पिंडाला प्रोत्साहन मिळाले आणि कामाला दिशा मिळाली. वनवासी कल्याण आश्रमाचे कार्यकर्ते डॉ. फाटक व डॉ. दप्तरदार यांच्याकडून मिळालेल्या प्रोत्साहनातून श्री. पवार यांनी गावाच्या विकासाचा ध्यास घेतला. त्यासाठी एअर इंडियाची चालत आलेली नोकरी सोडून दिली आणि गावासाठी उभे राहिले. गावाभोवती असलेले जंगल तर वृक्षतोडीमुळे आणि चोऱ्यांमुळे उध्वस्त झाले होतेच पण व्यसनांनी गाव पोखरले होते. शिक्षण नाही, उद्योग नाही, पाणी नाही त्यामुळे शेती नाही आणि त्यामुळे दारू गाळण्याच्या उद्योगाकडे काहीजण वळलेले. अशा स्थितीत गावाचे नेतृत्त्व करायला श्री. पवार यांनी सुरुवात केली. कारणाशिवाय झाडं तोडली जाऊ नयेत म्हणून नियम केले, गावाच्या दंडाची योजना बनवली आणि राबवली, त्यामध्ये वनसंरक्षण अधिकाऱ्यालाही सोडले नाही. पाणी अडवण्याचे कार्यक्रम सुरू केले. हळूहळू गावाचे चित्र बदलू लागले आणि आज गावाच्या भोवती १२०० एकरावर दाट जंगल उभे आहे. गावाला याचा अभिमान आहे. शेतामधून एकदा नाही तर दोनदा पिके डोलायला लागली आहेत. मोहाच्या फुलांचा लिलाव करून गावाच्या निधीमध्ये रक्कम जमा होते आहे. उसाचे पीक घेऊन त्या ऊसापासून गूळ बनविण्याचे गुऱ्हाळ गावातच सुरू केले त्यातून काहींना रोजगार मिळाला. आर्थिकदृष्ट्या गाव आज चांगल्या स्थितीत तर आहेच पण सामुहिक भावना विकसित करण्यात श्री चैत्राम पवार यांना यश आले आहे. गावातील भांडणे गावातच मिटवली जातात. ज्याची चूक आहे त्याला दंड केला जातो

अंत्याजादि योनी तरल्या हरिभजनें । तयाची पुराणें भाट झाली ।

आणि दंडाची रक्कम गावाच्या निधीत जमा होते. अभ्यासगट ज्या दिवशी गावात पोहोचला तेव्हा श्री. पवार गावातील एक तंटा सोडवण्याच्या कामातच व्यस्त होते. तंटा मिटला, गावकरी हसत उठले आणि गावच्या डोंगरीबाबाच्या जत्रेत सहभागी झाले. त्यानिमित्ताने वनवासी पारंपारिक नृत्य पाहण्याचाही आनंद अभ्यासगटाला मिळाला.

## सातपुड्यातील धनाजे व बिलगाव

या दोन गावांना भेटी देण्यासाठी एक दिवस प्रवास झाला. ही दोन्ही गावे सातपुड्याच्या ४थ्या पुड्यात आहेत.

**धनाजे :** धनाजे गावी नंदुरबारच्या कृषीविज्ञान केंद्राचा नित्य संपर्क आहे. गावातील वनवासी शेतकऱ्यांना केंद्रातील संशोधक/प्राध्यापक नियमितपणे मार्गदर्शन करण्यासाठी येतात. या सर्वांचे गावकऱ्यांशी कसे आत्मियतेचे संबंध आहेत हे जवळून अनुभवता आले. अगदी छोट्या तुकड्यात असलेल्या त्यांच्या शेतीतून त्यांना सुखाचे चार घास मिळावेत यासाठी केंद्र सल्ला व मार्गदर्शन करते. या गावाच्याच सीमेवर राहणाऱ्या श्री. जैलसिंग यांचे घरी जाण्याचा योग आला. श्री. जैलसिंग हे गेल्या ५-७ वर्षांपासून एकल विद्यालयाच्या प्रकल्पामध्ये काम करीत आहेत. वनवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हा प्रकल्प देशभरामध्ये अनेक ठिकाणी चालतो. या कामासाठी श्री. जैलसिंग यांनी वनवासी कल्याण आश्रमाच्या योजनेमध्ये 'जीवनदान' केले आहे. म्हणजे महिन्यातील पंचवीस दिवस ते या प्रकल्पासाठी काम करणार. आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असलेले श्री. जैलसिंग ज्या सहजतेने यासंबंधी बोलले आणि एकल विद्यालयाचे काम किती मोलाचे आहे हे सांगतानाची त्यांची त्यातील तळमळ प्रभावित करून टाकणारी होती.

**बिलगाव :** धनाजे गावापासून खूप आतील बाजूस उंचउंच डोंगरांच्या रांगांमध्ये हे गाव वसले आहे. या गावाच्या सीमेवर उदय नदी आहे आणि उंच कड्यावरून याचे पाणी खाली दरीत कोसळते व पुढे नर्मदेला मिळते. या दरीमध्ये उदय नदीच्या प्रवाहाचा वेग, उंची याचा उपयोग करून मेधा पाटकर यांनी एका जनित्राच्या साह्याने १०० घरांसाठी वीज निर्मितीचा प्रकल्प यशस्वीपणे राबवला. स्वदेस चित्रपटात हा प्रकल्प प्रभावीपणे दाखविला आहे. गेल्या वर्षी झालेल्या प्रचंड पावसामुळे आलेल्या पुरात हा प्रकल्प उध्वस्त झाला असला तरी त्या ठिकाणाला भेट देऊन ही योजना कशी होती हे समजून घेता आले. जनित्र आणि अन्य व्यवस्था पुरामुळे उध्वस्त झाल्या आहेत त्याचा साधा पंचनामा करण्यात सरकार पातळीवरून कसे दुर्लक्ष होते आहे त्यासंबंधी तेथील लोकांची मते ऐकायला मिळाली.

४) **श्री शंभु (दादा) पाटील** यांचे शिक्षण तसे अगदी कमी झालेले. पण तल्लख बुद्धीच्या श्री. पाटील यांनी अनेक उपयुक्त यंत्रे स्वत:च्या कल्पनेनी बनवली आहेत. (उदा. छोट्या वाफ्यातून फिरू शकणारा ट्रॅक्टर, बोअरवेलमध्ये पडलेली मोटर काढण्याचे यंत्र, बियाणे पेरणी यंत्र इ.) ही यंत्रे कशी बनवली, कल्पना कशी सुचली याविषयी त्यांच्या गप्पा खूप प्रेरणा देणाऱ्या होत्या.

**श्री. मोतीलालजी पवार** हे तसे सधन कुटुंबातील आणि उच्च शिक्षित. त्यांचे अन्य भाऊसुद्धा खूप शिकलेले आणि विदेशात स्थिरावलेले. केवळ आईच्या इच्छेसाठी श्री. पाटील यांनी आपले

> जितकी शरीरे तितकी मंदिरे । कळली पाहिजे ।
> अनाथांचा नाथ रे । त्याला कैसी जात रे ।

गाव आणि शेती सोडली नाही. ते राजकारणात सक्रीय असून त्यांच्याविषयी एक आदराची भावना समाजात आहे. ३५ एकरावर त्यांनी त्यांच्या कल्पनेतून फुलवलेले फार्म हाऊस पाहण्यासाठी जाण्याचा योग आला. तापी नदीच्या काठावर जमिनीची नैसर्गिक रचना जरासुद्धा न बदलता त्यांनी ज्याप्रकारे झाडे लावली आहेत त्यामागची त्यांची सौंदर्यदृष्टी आणि व्यावहारिक विचार प्रेरक वाटला. खरोखरीच ध्यान लावायला बसावे असे सुंदर वातावरण तेथे त्यांनी निर्माण केले आहे. या फार्महाऊसच्या माध्यमातून प्रवाशांना आकर्षित करून खूप पैसे मिळवावेत हे त्यांना मान्य नाही. पण ईको–टुरिझमसाठी एक उत्कृष्ट ठिकाण असे याचे वर्णन करता येईल.

---

## अभ्यासदौरा (२)

ज्ञानप्रबोधिनीच्या वतीने सोलापूर आणि आंबेजोगाई या ठिकाणी चालवले जाणारे प्रकल्प पाहण्यासाठी महिला विभागातील ८ महिलांचा एक गट अभ्यास दौऱ्यासाठी गेला होता, त्याचा हा वृत्तांत–

**शेकोटीच्या उबेत, शिक्षकांच्या सोबत**

सोलापूर येथील ज्ञानप्रबोधिनीच्या शाळेला प्रथम भेट देण्यात आली. पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व अध्यापकांशी खूप छान गप्पा झाल्या. त्यांच्या गप्पांतून शाळेतील अनेक उपक्रमांची माहिती मिळाली. डिसेंबरच्या थंडीतच हा दौरा होता आणि योगायोगाने प्राथमिक विभागाचा शेकोटीचा कार्यक्रम प्रत्यक्ष पाहायला मिळाला. पहाटे ५.३० ते ६.०० या दरम्यान विद्यार्थी आले. शाळेसमोरच्या मैदानात शेकोटी पेटवण्यात आली. एकेक शिक्षिका पुढे येऊन गाणे म्हणवून घेत होत्या. दोन तास मुले शेकोटीच्या उबेत आणि गाण्यांच्या सुरात दंग झाली होती.

**व्यावसायिक शिक्षण**

बिडी कामगारांच्या मुलांसाठी प्रबोधिनीमार्फत एक शैक्षणिक उपक्रम चालतो. या मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणही दिले जाते. पंखे जोडणे, गाड्या दुरुस्त करणे अशा छोट्याछोट्या व्यावसायिक विषयांचे शिक्षण दिले जाते तसेच त्यांच्या जेवणाचीही सोय शाळेमार्फत केली जाते. हा उपक्रम विशेष वाटला.

**हराळीत हरखून गेलो**

श्री. अण्णा ताम्हनकर व डॉ. स्वर्णलता भिशीकर यांनी हराळी येथे प्रबोधिनीमार्फत एका नव्या उपक्रमाचे काम हाती घेतले. शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या मुलामुलींसाठी १ ली ते १० पर्यंतची शाळा व कृषी शाळा येथे चालवली जाते. ५० एकरावर या केंद्राचे वसतीगृह असून एका वेळी ५०० जणांचा स्वैपाक करता येईल, गरम पाणी मिळेल अशी मोठी सोलर सिस्टीम येथे उभी केली आहे. वसतीगृह व शाळेचा परिसर सोडला तर पहावे तिकडे फळबागा आणि हिरवीगार शेती या प्रकल्पाने फुलवली आहे. ते दृश्य पाहताना सर्वजणी हरखून गेल्या होत्या.

**जनआधाराने दाखविला स्वच्छतेचा आणि स्वावलंबनाचा मार्ग**

सोलापूर आणि हराळी येथील प्रबोधिनीचे वेगवेगळे शैक्षणिक उपक्रम पाहून जनआधार या सेवाभावी संस्थेचे काम पाहण्यासाठी अभ्यासगट लातूर येथे पोहोचला. विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते श्री. संजय

यातायाति धर्म नाही विष्णुदासां । निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ।

कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेचे काम चालते. गरजू महिला व पुरुषांच्या सहाय्याने लातूर शहरातील कचरा व्यवस्थापनाचे काम चालविले जाते. या प्रकल्पामुळे दोन गोष्टी साध्य झाल्या. एक लातूरमधील रस्त्यांची स्वच्छता वाढली आणि ज्यांना दोन वेळची चूल पेटविण्याइतकी सुद्धा मजुरी मिळत नव्हती, झोपायला छप्परही नव्हते अशी कुटुंबे स्वावलंबी झाली. या प्रकल्पातील महिलांचा आता बचतगट चालतो आणि त्यांच्या मुलांसाठी संस्कार वर्ग. संस्कारवर्गातील वातावरणामुळे मुलांना आता शाळेची गोडी वाटू लागली आहे.

### आंबेजोगाई

या गावाचे नाव घेतले की ताबडतोब देवीचे स्मरण होते. आंबेजोगाईच्यां मुक्कामात देवीच्या दर्शनाला तर सर्वजण जाऊन आलेच पण आद्यकवी मुकुंदराज आणि दासोपंत यांच्या समाधीचेही दर्शन सर्वांनी घेतले. आंबेजोगाईत मुख्य पाहायचे होते ते तेथील ज्ञानप्रबोधिनीचे काम. श्री. प्रसाद चिक्षे हे तेथील काम प्रमुखपणाने पाहतात. त्यांनी चालविलेल्या बालवाडी प्रकल्पातील काही उपक्रम आवडले. बालवाडीच्या प्रत्येक गटाचे पूर्ण दिवसाचे स्नेहसंमेलन ही कल्पना वेगळी वाटली व मुले आणि पालक कसे रंगून जातात याचे अनुभवही छान वाटले. या वयोगटातील मुला-मुलींसाठी तीन चाकी सायकलची शर्यत आणि पालक-बालक सहली हे उपक्रम नाविन्यपूर्ण व अनुकरणीय वाटले. इतक्या छोट्या वयातील मुले पुढे येऊन धीटपणे २-५ मिनिटे बोलतात, गोष्ट सांगतात हे प्रत्यक्ष पाहून आश्चर्यही वाटले. इतके छान उपक्रम चालतात पण त्यांची जागा खूपच लहान वाटली व इतक्या छोट्या जागेत लहान वयातील ही मुलं कशी रमतात असा विचार मनात येऊन गेला.

### आरोग्यदूत महिला

परतीच्या प्रवासात डॉ. शशीकांत व डॉ. शुभांगी अहंकारी यांच्या हॅलो मेडिकल फाऊंडेशनने चालविलेले काम पाहण्यासाठी गट अखनुर येथे पोहोचला. गेल्या किमान दहा वर्षांपासून या फाऊंडेशनच्या माध्यमातून गावपातळीवर भारतवैद्यक महिला कार्यकर्त्या प्रशिक्षित करण्याचे काम चालू आहे. या प्रशिक्षित महिलांच्या माध्यमातून गावागावांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करणे, प्राथमिक आरोग्यसेवा पुरविणे असे काम केले जाते. याच संस्थेमार्फत सुमारे २५० बचतगट चालविले जात असून किशोरी विकास प्रकल्प, ग्रामीण आरोग्य विमा, स्वयंरोजगार अशा अनेक विषयात काम केले जाते. या संस्थेच्या कामाचा पसारा खूप मोठा आहे आणि अभ्यासगट तेथे पोहोचला तेव्हा खूप उशीर झाला होता. आधी कळवल्यामुळे वस्तीतील बचतगटातील महिला वाट पाहून गेल्या होत्या. पण अभ्यासगट पोहोचल्यावर डॉक्टरांनी त्या महिलांना निरोप पाठविला आणि दहा पंधरा मिनिटात सर्व महिला पुन: भेटायला आल्या. त्यांच्याशी झालेल्या गप्पांतून कुटुंबनियोजनाचे महत्त्व किती आहे, स्त्रीचे आरोग्य किती महत्त्वाचे आहे यासंबंधी संस्थेने दिलेला विचार या महिलांमध्ये कसा रुजला आहे, याचा प्रत्यय आला.

## अभ्यासदौरा (३)

## आधुनिक ऊर्जा उद्यान

मॉडर्न टेक्निकल सेंटर यांनी विकसित केलेले आधुनिक ऊर्जा उद्यान पाहण्यासाठी सर्वश्री सुनील कुलकर्णी, ज्ञानेश पुरंदरे, दत्ता सकट, राहुल सावरमाळे,

रामी रंगले ते मन । असो नीच जाती ।
त्याच्या चरणाची । वंदीन मी माती ।।

हे कान्हे फाटा येथे नुकतेच जाऊन आले. या संस्थेचे श्री. चंद्रकांत पाठक यांनी या ऊर्जा उद्यानामागील विचार सर्वांना समजावून सांगितला व तेथील साधने दाखविली. विजेच्या अभावी शेतकऱ्यांचे शेतीचे जे नुकसान होते त्याला पर्यायी साधने येथे विकसित केलेली आहेत ही साधने वापरण्यास वीज लागत नाही. सायकल चालवून, झोपाळा खेळता खेळता, मनुष्य व बैल यांच्या शक्तीचा वापर करून विहिरीतून पाणी उपसणे, शेतीला पाणी देणे, उद्यानाला/ शेतीला तुषार सिंचन करणे अशी कामे सहज करता येतात.

## अभ्यासदौरा (४)

वर्धिनीच्या विविध शाखांमधील अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या युवक कार्यकर्त्यांचा गटाने फलटण व बारामती येथील काही उद्योगसंस्थांना भेटी दिल्या. ॲशडेन पुरस्कारप्राप्त आर्टी (ARTI) या संस्थेचे प्रशिक्षण संकुल फलटण येथे आहे. डॉ. आनंद कर्वे, डॉ. प्रियदर्शनी कर्वे आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी ऊर्जा क्षेत्रात केलेल्या मुलभूत व बहुआयामी संशोधनाचे दर्शन येथे घडले. प्रशिक्षण प्रमुख श्री. विजय व्यास यांनी ऊर्जाबचतीसाठी पाचटापासून कांडीकोळसा निर्मिती, घरगुती टाकाऊ वस्तूंपासून बायोगॅस निर्मिती, मातीविना शेती, इत्यादी उपक्रमांची माहिती प्रात्यक्षिकासह सांगितली. त्यानंतर युवकांच्या शंकांचे त्यांनी समाधान केले. बारामती येथील कृषी विज्ञान केंद्राला गटाने भेट दिली. आशिया खंडातील सर्वोत्तम केंद्र असा याचा नावलौकिक आहे. शेतीशी संबंधित सर्व विषयांच्या प्रयोगशाळा, खते, बियाणे, कीड निवारण, बाजारभाव, नवीन संशोधने यासाठी हे केंद्र म्हणजे मुक्तपीठ आहे. दूरच्या शेतकऱ्यांना इंटरनेट, मोबाईल, पत्रे, इत्यादी माध्यमातून मार्गदर्शन केले जाते. एफ.एम. कम्युनिटी रेडिओ वसुंधरा (९०.४ MHz) द्वारा निरंतर मार्गदर्शन चालू असते. श्री. विवेक भोईटे यांनी या केंद्राचा परिचय करून दिला. कृषिमित्र कै. अप्पासाहेब पवार यांनी स्थापन केलेल्या या केंद्राच्या प्रयोगभूमीत आज फळबागायत, फुलांची शेती, रेशीम उद्योग, मेंढीपालन, सुधारित म्हशी व गोपालन, कृषीपर्यटन इत्यादी विषय हाताळले जातात.

बारामती येथील या भेटीनंतर माळेगाव येथील साखर कारखान्याला भेट देऊन या दौऱ्याचा समारोप झाला.

## अभ्यासदौरा (५)

वर्धिनीच्या पाकोळी बालवर्ग विभागाच्या शिक्षिकांचा गट सासवड येथील एम.ई.एस. सोसायटीच्या बालवाडीस भेट देण्यासाठी गेला होता. त्यांना भावलेल्या गोष्टी त्यांच्या शब्दात...

**पूर्वप्राथमिक शाळा (म. ए. सोसायटी), सासवड**

या शाळेविषयी खूप ऐकले होते त्यामुळे बालवाडी विभागातील सर्व शिक्षिका आणि प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी यांची या शाळेला भेट आयोजित केली होती. १९८८ पासून वर्धिनीमध्येही बालवाडी चालू आहे आणि नवे नवे उपक्रमांची जोड देण्याचा सतत प्रयत्नही असतो. वेगवेगळया ठिकाणच्या बालवाड्यांमध्ये चालणारे उपक्रम पाहिल्यामुळे अशा प्रयत्नांना बळ मिळते. म. ए. सोसायटीच्या सासवड येथील बालवाडीला दिलेल्या तेथील खालील उपक्रम, पद्धती खूप आवडल्या.

पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथें हरीचे दास घेती जन्म ।

१. सर्व विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड खूप छान ठेवले आहे.
२. वर्षभरात झालेल्या सर्व कार्यक्रमांचे मुलांकडून स्मरणचित्र काढून घेतले जाते.
३. मातीकामाला खूप छान प्रोत्साहन दिले जाते. मुलं छान गणपती तयार करतात.
४. एका दिवशी एक अक्षर घेऊन त्या अक्षरावरील नावे/शब्द मुलांना सांगायला सांगितले जाते. त्यामुळे मुलांना खूप नावे/शब्द माहिती होतात.
५. प्रत्येक वर्गात सरस्वतीची एक मूर्ती आहे. दररोज दोन विद्यार्थी या सरस्वतीच्या पुढे आणि वर्गाच्या दारात रांगोळी काढतात.
६. वर्तमानपत्राच्या रद्दीतून घडीकाम शिकवले जाते. मुलं वेगवेगळ्या प्रकारच्या नावा तयार करतात.
७. प्रत्येक वाहनाचे चित्र दाखवून त्या वाहनाचा उपयोग काय केला जातो हे मुलं सांगतात.
८. प्रत्येक वर्षासाठी एक विषय निश्चित केला जातो व त्या वर्षभरात त्या विषयाशी संबंधित कार्यक्रमांची रचना केली जाते. (गोष्टी, गाणी, नाटुकले हे सर्व त्या विषयावर आधारित घेतली जातात.)

●●●

---

# जलदुर्ग - जंजिरा

## द्वैवार्षिक युवक सायकल सहल

वार्षिक नियोजन पत्रकातील काही तारखांची युवक कार्यकर्ते आतुरतेने वाट पाहत असतात. २५ ते २८ डिसेंबर हा कालावधी त्यातलाच. एकतर समुद्रकाठी सहल, तीसुद्धा अतिदूर जंजिऱ्यावर आणि चक्क सायकलने..... मग काय राव! अशा मोहिमेचे वेध लागणार नसतील तरच नवल.

स्वतःच्या सायकलींचं रडगाणं माहीत असल्याने मित्र परिवाराच्या पागांमधील रेंजर, हर्क्युलिस, हिरा जातीच्या उमद्या जनावरांचा शोध चालू झाला. लगाम, खोगीर, जीन ठीकठाक केली जाऊ लागली. लांब पल्ल्याची मोहीम असल्याने ४०-४५ संख्येचा अंदाज होता. पण २५ डिसेंबरच्या सुप्रभाती चक्क ६० युवास्वार आपल्या फुरफुरत्या घोड्यावर (चुकलं सायकलींवर) चांदणी चौकात पश्चिमेकडे कूच करण्यासाठी सिद्ध होते. अखेर ईशारत झाली आणि 'हर हर महादेव' गर्जनेने परिसर हादरून गेला. बिनीच्या पथकाचे मानकरी सरदार वाईकर आपल्या तेजतर्रार युवा स्वारांसह पिरंगुट घाटाकडे झेपावले. अनुभवी जाणते सरदार डॉ. नगरे यांनी फौजेची मधली फळी सावरली होती तर दयानंद शाखेच्या द्वाड तट्टांनी कितीही शेपट्या पिरगळल्या तरी मोहिमेची पिछाडी शेवटपर्यंत सोडली नाही.

पौड, माले, मुळशी अशा लांबच्या मजला मारत दुपारच्या खाण्यासाठी मंडळी ताम्हिणीच्या शाळेत घडीभर विसावली. भर उन्हात अवघड ताम्हिणी घाट चाकाखाली घेत सूर्यास्ताला नारायणगावात प्रशांत बोरकरांच्या आग्रहास्तव चहा-पोह्यासाठी ताफा थांबला. लख्ख सारवलेलं स्वच्छ, चकचकीत असं ते कोकणसीमेवरील गाव व तेथील आतिथ्य मंडळींना खूप भावून गेले. तेथून पुढे मंडळी मुक्कामासाठी रोह्याला सरदार भावेंच्या गढीत पोहोचली.

२६ तारखेला भल्या पहाटे मुरुडचा रस्ता धरला.

> ब्राह्मणाचे ब्रह्म ते सोवळे । आणि शूद्राचे ब्रह्म ते ओवळे ।
> ऐसे वेगळे आगळे । तेथे असेचिना ।।

खाडीतून वर येणारा सूर्योदय रस्त्यातच भेटला. फणसाडच्या जंगलउतारावर निसर्गसौंदर्यात मुग्ध झाल्याने काही राऊतांनी जोरदार कोलांटउड्या खाल्ल्या. ते पाहून बाकीचे स्वार दबक्या, सावध चालीने घाट उतरू लागले. भर दुपारी चमकता, उसळता मुरुडचा समुद्र पाहून मोहिमेचा शीणवटा कुठल्याकुठे पळाला.

छोट्या शीडांच्या गलबतातून सर्वजण जंजिऱ्यावर पोहोचले. तुफानी लाटांशी झुंजणारा तो अफाट अजिंक्य किल्ला व कुठल्याही परिस्थितीत त्यावर भगवा फडकविण्यासाठी हट्टाला पेटलेली छे, शंभूराजांनी अर्ध्यापर्यंत बुजवलेली ती विस्तीर्ण खाडी सर्वजण टक लावून पाहत होते. याच जंजिऱ्याने २००६ साली त्सुनामी लाटांच्या पडद्याआड राहून वर्धिनीच्या सायकलस्वारांना किनाऱ्यावरूनच परतवले होते. यावेळी मात्र त्याच्या बाले किल्ल्यावर पाय रोवून वर्धिनीचे युवक शिवरायांचे गौरवगीत गात होते.

पाहता पाहता परतीचा प्रवास सुरू झाला. वाटेत माणगावला आदिवासी मेळाव्यात सहभागी होऊन मुक्कामाला ताम्हिणी घाटाखालील विळे गावात मंडळींनी कुडकुडत रात्र घालवली.

मुक्कामाच्या ठिकाणी कॉलेजमध्ये चालणारे उपक्रम व जागतिक अर्थकारण या विषयांवर डॉ. नगरे व सुजय पैलवान यांनी सर्वांना विचारप्रवृत्त केले.

दि. २८ ला सकाळी ताज्या दमात ताम्हिणी चढून मजल-दरमजल करीत सायंकाळी सर्व सेना पुण्यनगरीत स्वस्थानी पोहोचली. रोजचे सरासरी पाऊणशे कि.मी. चे अंतर काटीत स्वतःची क्षमता आणि वाढता आत्मविश्वास याच्या बळावर मंडळींनी ३५० कि.मी.ची सायकल सफर यशस्वीरीत्या पूर्ण केली.



व्यापक हा विश्वंभर । चराचर ज्याचेनी ।

## दूर्गदिनाचे कार्यक्रम

दिनांक १ मे हा दिवस दूर्गदिन म्हणून साजरा होतो. वर्धिनीच्या शाखांनी सात किल्ल्यांवर हा दिवस साजरा केला. सिंहगड, तोरणा, पुरंदर, लोहगड, राजगड, तिकोना, रोहिडेश्वर या किल्ल्यांवर वर्धिनीची एकेक शाखा कार्यक्रम करण्यासाठी गेली होती. गडांची स्वच्छता, डागडुजी, गडावरील मंदिरात पूजा-आरती, नवीन ध्वजारोहण, लोकसंपर्क आणि जागरण असे अनेक कार्यक्रम झाले. गडाच्या कुशीतील गावांचा, गडावर आलेल्या नागरिकांचा प्रतिसाद उत्साह वाढविणारा होता. या दूर्गदिनामधील विशेष प्रसंग, अनुभव –

१) स्वामी श्रद्धानंद शाखेच्या युवक व वर्धकांनी तोरणा गडाला गेल्या वर्षी भेट दिली होती. किल्ल्याची अवस्था पाहून त्यांनी असा संकल्प केला की आपले खाऊचे पैसे साठवायचे आणि त्या रकमेचा विनियोग या किल्ल्याच्या डागडुजीसाठी करायचा. या संकल्पानुसार त्यांनी वर्षभर खाऊचे पैसे वाचवून निधी जमा केला आहे. ही रक्कम रु. १५०००/- च्या आसपास आहे. आता योग्य त्या व्यक्तींचे साह्य घेऊन डागडुजीची छोटी कामे नक्की करता येतील असा विश्वास आहे. मुलांचा हा संकल्प आणि प्रत्यक्ष कृती पाहून काही पालकांनी यामध्ये सहयोग देण्याचे मान्य केले आहे.

२) स्वामी ब्रह्मानंद शाखा व स्वामी सुबोधानंद शाखा सिंहगडावर गेल्या होत्या. गडावर प्रचंड कचरा होता. वर्धकांच्या लक्षात आले की गडावर असलेल्या दुकानांमुळे कचरा अधिक वाढतो आहे. संबंधित दुकानदारांशी संवाद करून त्यांनी पाण्याच्या प्लॅस्टिकच्या बाटल्या, प्लॅस्टिक पॅकिंग असलेल्या वस्तूची विक्री दुकानातून करू नये अशी त्यांना विनंती केली. त्याला प्रतिसाद उत्तम मिळाला. सुमारे ७-८ पोती कचरा (प्लॅस्टिक बाटल्या, पिशव्या, ***'बाटल्या!'*** कागद इ.) वर्धकांनी गोळा केला.

३) गडांवर प्रेमवीरांनी कोरलेल्या निशाण्या घासून काढून भिंती स्वच्छ करणे, गडावरील तळी साफ करणे, मंदिरांची स्वच्छता ही कामे प्रामुख्याने सर्व गडांवर करण्यात आली.

४) पुरंदर गडाच्या पायथ्याशी लोकसंपर्काला गेलेल्या १४ वर्धक व कार्यकर्त्यांना गावकऱ्यांनी आग्रहपूर्वक जेवायला बसवले. तुम्ही सर्वजण इतक्या तळमळीने गडाच्या स्वच्छतेसाठी आला आहात तर आता आमचा पाहुणचार घेतल्या-शिवाय तुम्हाला जाता येणार नाही असा प्रेमळ धाक दाखवून अतिशय आत्मियतेने संवाद केला.

### वार्षिक नियोजन बैठक

मुलांच्या शाखा विभागाची २००८-०९ या शैक्षणिक वर्षाची नियोजन बैठक ७ जून रोजी झाली. या बैठकीत गेल्या वर्षीच्या कामाचा आढावा, नव्या वर्षाचे नियोजन, नव्या वर्षाचे संकल्प, व्यवस्थाश: विषयांवर गटचर्चा अशी वेगवेगळी सत्रे झाली. बैठकीचा समारोप कॅप्टन सनत भाटे यांच्या मार्गदर्शनाने झाला.

उंच ब्रह्म रायासी । नीच ब्रह्म परीवारासी ।
ऐसा भेद तयालागी । मुळीच नाही ।।

# अभ्यासिका प्रकल्प

वर्धिनीच्या त्रिदशकपूर्तीच्या निमित्ताने पुण्याच्या वेगवेगळ्या भागांमध्ये अभ्यासिका केंद्र सुरू करण्याच्या दृष्टीने दैनिक सकाळमध्ये 'प्रासंगिक' सदरामध्ये समाजातील स्वयंप्रेरणेने सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागिरकांना आवाहन करणारा एक लेख प्रसिद्ध झाला होता. या लेखाला सुमारे ६५ जणांनी प्रतिसाद दिला. पिंपरी-चिंचवड ते धनकवडी आणि कर्वेनगर ते येरवडा अशा भागांतील या सर्वांसाठी एक अभ्यासिका प्रकल्प परिचय कार्यक्रम, दि. ११ जुलै रोजी संपन्न झाला. या अभ्यासिका प्रकल्पाला पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाने सहकार्य उपलब्ध करून दिले आहे. पुणे महापालिका शिक्षण मंडळ आणि 'स्व-'रूपवर्धिनी यांचा हा संयुक्त उपक्रम आहे. दिनांक ११ जुलै रोजी झालेल्या बैठकीला ३५ जण प्रत्यक्ष उपस्थित होते. अभ्यासिका केंद्र सुरू करण्यामागची कल्पना, कार्यपद्धती यासंबंधी विस्तृत निवेदन झाल्यावर मनपा शिक्षण मंडळाचे विद्यमान अध्यक्ष श्री. महेश लडकत यांनी या संयुक्त प्रकल्पामागची भूमिका आणि महानगरपालिकेच्या शाळांमधील मुलांचे प्रश्न या संबंधी आपले मनोगत मांडले. उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना त्यांनी शिक्षण मंडळाचे सर्वतोपरी साह्य या प्रकल्पाला मिळेल, असे आश्वासन दिले. अभ्यासिका केंद्र वेगवेगळ्या भागांमध्ये प्रत्यक्ष सुरू करण्याच्या दृष्टीने त्या त्या भागातून आलेल्या प्रतिनिधींची भागशः एक छोटी बैठक झाली व त्यामध्ये केंद्र सुरू करण्याच्या दिशेने पुढे कसे जायचे यासंबंधी उपयुक्त चर्चा झाली.

### अभ्यासिका केंद्र

जुलै महिन्यात झालेल्या एकत्रीकरणानंतर अभ्यासिका केंद्र प्रत्यक्ष सुरू करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. फडगेट पोलीस चौकी परिसर, शास्त्रीनगर, औंध या भागातील मनपाच्या शाळांना भेटी देऊन केंद्र सुरू करण्यासंबंधी तेथील मुख्याध्यापकांशी बोलणे झाले. दिनांक ७ ऑगस्ट रोजी पहिले अभ्यासिका केंद्र औंध येथील इंदिरा गांधी प्राथमिक शाळेत सुरू झाले.

### कार्यशाळा

अभ्यासिका केंद्रांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी एक प्रशिक्षण वर्ग २८ सप्टेंबर रोजी घेण्यात आला होता. एकूण सतरा कार्यकर्ते या प्रशिक्षण वर्गाला उपस्थित होते. पहिल्या सत्रामध्ये अभ्यासिका केंद्राच्या कामात कार्यकर्ता म्हणून स्वयंस्फूर्तीने काम पाहणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करीत श्री. सुरेशराव परचुरे यांनी शिक्षणातून विद्यार्थ्यांना कोणती दृष्टी द्यावी याविषयी आपले अनुभव सांगत मार्गदर्शन केले.

श्री. वसंतराव खरे यांनी सेवावस्त्यांमधील वातावरण आणि अशा ठिकाणी राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काम कसे केले, तसेच वैयक्तिक संपर्कामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि त्यांच्या कुटुंबांमध्ये कसे अनुकूल बदल होतात याविषयी आपले अनुभव सांगितले. संत श्री. नारायणगुरु अभ्यासिका केंद्रातील दोन विद्यार्थिनींनी अभ्यासिका केंद्राच्या संस्कारांचे त्यांच्या विकासामध्ये किती महत्त्वाचे स्थान आहे, याविषयी मनोगत व्यक्त केले.

> असे नांदतु हा हरी सर्वजीवीं । असे व्यापुनी अग्नीकाष्ठांत तेवीं ।
> घटी बिंबले बिंब ठायिं ठायीं । तया संगति नासु हा त्यासि नाही ।।

तिसऱ्या सत्रामध्ये अभ्यासिका केंद्रावर किती प्रकारचे उपक्रम घेता येऊ शकतील, त्याचे परिणाम काय होतात, नव्याने केंद्रात येणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्राचे आकर्षण वाटण्यासाठी व टिकण्यासाठी व्यक्तिगत संपर्काचा किती चांगला उपयोग होऊ शकतो, याविषयी चर्चा झाली. दिवाळीच्या सुटीत यापैकी काही उपक्रम करण्याचा संकल्प करून कार्यशाळेचा समारोप झाला.

## मल्लखांबावरच्या कसरती

गणपती विसर्जन मिरवणुकीत उघड्या ट्रकवर उभ्या केलेल्या मल्लखांबावर रामकृष्ण शाखेच्या पंधरा वर्धकांनी आकर्षक अशा कसरती सादर केल्या. या कसरतींना प्रेक्षकांची प्रचंड दाद मिळत होती. मार्गावर दोन-तीन ठिकाणी पोलिसांनी/अधिकाऱ्यांनी मल्लखांबाच्या ट्रकला थांबवून कसरतीचे प्रकार सादर करायला लावले.

पुण्यातील मिरवणुकीत एकूण ४५० वर्धक/वर्धिका व युवक कार्यकर्ते सहभागी होते तर मुंबईच्या शीव भागातील शिवप्रेरणा मित्रमंडळ या मंडळाच्या मिरवणुकीत वर्धिनीच्या ८० जणांनी सहभाग घेतला होता.

## कोजागिरी कार्यक्रम

२२ ऑक्टोबर रोजी भारताचे यान चंद्राच्या दिशेने झेपावले. प्रत्येक भारतीयाच्या दृष्टीने अत्यंत अभिमानास्पद अशी ही घटना आहे. ही मोहीम नेमकी काय आहे. हे जाणून घेण्याच्या हेतूने ज्येष्ठ वैज्ञानिक प्रा. डॉ. अनंतकृष्णन यांचे व्याख्यान कोजागिरीच्या निमित्ताने आयोजित केले होते. प्रा. अनंतकृष्णन यांनी आपल्या दीड तासाच्या सदीप व्याख्यानातून आणि त्यानंतर झालेल्या प्रश्नोत्तरांमधून भारताच्या चांद्रमोहिमेविषयी विस्तृत माहिती दिली. आपली सूर्यमाला निर्माण कशी झाली याचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे, चंद्रावर खरोखरीच पाणी आहे का हे शोधणे, चंद्राचा जो पृष्ठभाग पृथ्वीवरून दिसत नाही त्या कायम अंधारात असलेल्या चंद्राच्या जवळपास ४०% भागाचे निरीक्षण करणे, चंद्रावरचे तापमान, चंद्रावरील गुरुत्वाकर्षणाचा दाब, चंद्राची भौगोलिक वैशिष्ट्ये, चंद्राचा त्रिमिती नकाशा तयार करणे असे अनेक हेतू डोळ्यासमोर ठेवून चांद्रमोहीम आखल्याचे त्यांनी सांगितले.

भारताची चांद्रमोहीम यशस्वी करण्यासाठी शास्त्रज्ञ किती कष्ट घेत आहेत हे तर या व्याख्यानामुळे समजलेच पण भारतीय शास्त्रज्ञांचा अभिमान वाटला. चांद्र-मोहिमेतील उपग्रहात वापरलेल्या साधनांमध्ये भारतीय बनावटीची किती आणि विदेशातून आणावी लागलेली साधने किती यासंबंधी विचारलेल्या प्रश्नाला त्यासंबंधीची नेमकी उदाहरणे देऊन त्यांनी प्रश्न विचारणाऱ्याचे समाधान तर केलेच पण आपण ज्या क्षेत्रात आहोत त्या माध्यमातूनही देशभक्ती करता येते आणि अशा प्रेरणेतून उभे



नाना देही । देव एक विराजे ।

राहिलेली व्यक्ती देशासाठी मोलाचे योगदान देऊ शकते, हा खूप महत्त्वाचा संदेश सर्वांना दिला. प्रार्थना आणि दुग्धपानानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.

## कला वर्गाचे उद्घाटन

एप्रिल महिन्यात झालेल्या 'कला आणि आरोग्य' या विषयावरील शिबिरानंतर स्वामी अखंडानंद शाखेने वर्धकांचे चित्रकला. हस्तकला, संगीत आणि अभिनय अशा विषयांसाठी चार गट केले असून शाखेतील सर्व वर्धक या चार गटामध्ये विभागले आहेत. या गटांमधील उपक्रमांचे औपचारिक उद्घाटन नागपंचमीच्या दिवशी करण्यात आले. चित्रकला गटातील मुलांनी 'नाग' या विषयावरील चित्रे काढली तर हस्तकलेच्या मुलांनी मोठी पिंड तयार केली. गायन गटाने शिवतांडव स्तोत्र सादर केले तर अभिनय गटाने गैरसमजुतीतून केल्या जाणाऱ्या नाग-सापांच्या हत्येवर आधारीत नाटिका सादर केली.

## सुंदर हस्ताक्षरासाठी...

ज्या विद्यार्थ्याचे अक्षर सुंदर असते त्याला त्यामुळे हमखास अधिक गुण मिळतात. शिकण्याच्या वयात अक्षराला मिळालले चांगले वळण आयुष्यालाही चांगले वळण देण्यास उपयुक्त ठरते असे अनेक उदाहरणातून दिसते. शैक्षणिक वर्ष २००८-०९ ची सुरूवात हस्ताक्षर प्रशिक्षणाने करण्यात आली. रविवार दिनांक २२ जून रोजी वर्धिनीच्या सर्व शाखांच्या प्रतिनिधी कार्यकर्त्यांना अक्षर सुंदर घटवण्यासाठी सराव कसा करायचा, अक्षरांचे वळण, अक्षरांची उंची, अंतर, आकार याच्या तंत्राविषयी हस्ताक्षर तज्ज्ञ श्री. अरविंद गोखले यांनी मार्गदर्शन केले.

## दिवाळी शिबिरांची वैशिष्ट्ये

१) भागश: शिबिरांची रचना
२) व्यावसायिक युवकांच्या योगदानातून शिबिरांसाठी काही प्रमाणात निधीचे संकलन
३) धान्य, किराणा अशा वस्तूरूपातही काही युवकांनी शिबिरांसाठी मदत गोळा केली.
४) आपल्या महाविद्यालयातील मित्रांना वर्धिनीच्या शिबिरात येण्याचे आवाहन काही युवकांनी केले. या आवाहनाला दोन जणांनी शिबिरात पूर्णवेळ उपस्थित राहून तर दहा युवक युवती मित्रांनी एक पूर्ण दिवस शिबिरास भेट देऊन प्रतिसाद दिला व वर्धिनीच्या कामाचा परिचय करून घेतला. शिबिरार्थी विद्यार्थ्यांच्या नाटिका बसविण्याच्या कामात या सर्वांनी साह्य केले.

## स्कुल चले हम।

शाळा सुरू होण्याच्या दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव खूप काही सांगुन जातात. पाठीवरील नव्या दफ्तराचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडत असतो. ज्या विद्यार्थ्यांना नवे दफ्तर घेणे शक्य नसते त्यांच्याही मनात नव्या दफ्तराचे स्वप्न असतेच. 'सेवा-सहयोग' या सेवाभावी संस्थेने आय. टी. क्षेत्रातील आपल्या सहकारी मित्रांच्या योगदानातून पुण्यातील पहिली ते दहावी मधील सुमारे ३००० विद्यार्थ्यांना स्कुल बॅग्ज, वह्या, कंपास असा संच भेट म्हणून दिला. रविवार दिनांक २२ जून रोजी वर्धिनीच्या शाखा, संस्कार वर्ग, बचतगट सदस्य महिलांची शाळकरी मुलं यांच्यासाठी २०० संच भेट म्हणून दिले. एका छोट्या पण हृद्य कार्यक्रमात हे संच विद्यार्थ्यांना देण्यात आले.

गुणदोष याती न विचारी कांही । ठाव दिल्हा पाईं आपुलीया ।

## पर्यावरण रक्षण फेरी

'पाकोळी' बालवाडीच्या माध्यमातून वटपौर्णिमेच्या निमित्ताने पर्यावरण रक्षण फेरी काढण्यात आली. हातांमध्ये घोषणांचे फलक घेऊन आणि मोठ्याआवाजात घोषणा देत ही फेरी वर्धिनीतून निघाली आणि वेगवेगळ्या रस्त्यांनी जात गाडगेमहाराज मठामध्ये पोहोचली. वाटेवरती असलेल्या भाजीमंडईतील अनेक महिलांना या फेरीचे कुतूहल वाटत होते. ही फेरी कशासाठी आहे असे अनेक महिलांनी विचारले. वटपौर्णिमेची पूजा तोडलेली फांदी घरात आणून न करता वडाच्या झाडापाशी येऊनच करावी, विनाकारण झाडं तोडून पर्यावरणाचे नुकसान करू नये यासाठी प्रबोधन करण्याचा हेतू या फेरीमागे असल्याचे समजल्यावर अनेक महिलांनी अनुकूल प्रतिसाद दिला. गाडगेमहाराज मठात वटवृक्षाखाली बालवाडीतील विद्यार्थ्यांनी निसर्गाची गाणी म्हटली. मठाच्या व्यवस्थापकांनी मुलांना खाऊ देऊन या उपक्रमाचे खूप कौतुक केले.

## 'मुकाबला' दहशतवादाशी....

काही वर्षांपूर्वीपर्यंत केवळ देशाच्या सीमा भागात थैमान घालणारा दहशतवाद आज भारताच्या प्रत्येक गल्लीपर्यंत येऊन पोहोचला आहे. युवक वर्गाने सज्ज होण्याची वेळ आली आहे. या विषयाची वर्धिनीच्या युवा कार्यकर्त्यांना सविस्तर माहिती व्हावी या उद्देशाने पोलीस खात्याच्या विशेष शाखेचे इन्स्पेक्टर श्री भानुप्रताप बर्गे यांचे 'दहशतवाद आणि सुरक्षा' या विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

इन्स्पेक्टर बर्गे हे भारतातील पहिल्या दहशतवाद विरोधी पथकातील (ATS) अधिकारी आहेत. विविध आव्हानात्मक पोलिसी कारवायांमध्ये त्यांनी अत्यंत घातक दहशतवाद्यांना पाणी पाजले आहे.

हा महत्त्वपूर्ण विषय समजून घेण्यासाठी सुमारे १५० युवक कार्यकर्ते आपल्या मित्रांसह उपस्थित होते. इन्स्पेक्टर बर्गे यांनी अत्यंत प्रभावीपणे सुमारे एक तास या विषयाची मांडणी केली आणि नंतर दीड तास प्रश्नोत्तरांचे सत्र रंगले. या व्याख्यानातील काही महत्त्वपूर्ण मुद्दे पुढीलप्रमाणे :

१) दहशतवाद्यांचे दोन मुख्य उद्देश असतात– 'Horror' आणि 'Fear' उत्पन्न करणे.
२) अफवा न पसरण्यासाठी योग्य माहिती स्रोतांचा आधार घेण्याची सवय प्रत्येकाने लावून घेतली पाहिजे.
३) संशयीत वस्तूस हात लावू नये.
४) भाडेकरू ठेवताना काळजी घेणे आवश्यक.
५) समाजाने भडकाऊ भाषणांपासून सावध रहावे.
६) आपत्तीच्या वेळी पळापळ करू नका. एकत्र व्हा. लहान मुलांची प्राधान्याने काळजी घ्या.
७) कार्यकर्त्यांनी कायम ओळखपत्र बाळगावे.
८) रक्तदाता सूची, रुग्णालयातील आपत्कालिन मदत इत्यादीविषयी अद्ययावत असावे.
९) सर्व पूर्वग्रह बाजूला ठेवून पोलिस यंत्रणेस माहिती व तपास करण्यास पूर्ण सहकार्य करावे.
१०) सतत चॅटिंग करणाऱ्या, सिमकार्ड बदलणाऱ्या, जुन्या वाहनांची खरेदी करणाऱ्या लोकांवर लक्ष ठेवावे.
११) लक्षात ठेवण्याचे महत्त्वाचे सूत्र :

**"Be Alert, Be Prepared, Stay Informed."**

कठीण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ।।
तरीमग वाईट बोलावें तें । काय निमित्यें ।।

# जशी दृष्टी, तशी सृष्टी

अल्मा मॅटर या संस्थेमार्फत दिनांक ५ जुलै रोजी शिक्षकांसाठी एक कार्यशाळा घेण्यात आली होती. सुमारे ३००० प्रतिनिधी या कार्यशाळेला उपस्थित होते. वर्धिनीतर्फे २० युवक कार्यकर्ते या कार्यशाळेला उपस्थित होते. व्याख्यान इंग्रजीमध्ये असले तरी त्यातील सोपेपणा आणि वक्त्यांच्या प्रभावी वक्तृत्त्वामुळे पूर्ण दोन तास उपस्थितांचे लक्ष व्याख्यानाकडे होते.

शिक्षकाकडे किती अफाट शक्ती असते आणि त्यातूनच घडणारे विद्यार्थ्यांचे जीवन हा श्री. नरेंद्र यांच्या व्याख्यानाचा विषय होता. छोटी छोटी उदाहरणे देत त्यांनी विषय नेमकेपणाने मांडला. त्यांच्या व्याख्यानातील प्रमुख मुद्दे असे होते –

- शिक्षकाने विद्यार्थ्यांना नुसता विषय शिकवू नये तर त्यांना आयुष्यातील प्रत्येक क्षण कसा मोलाचा आहे, जीवनाचा आनंद कसा अनुभवायचा असतो हेसुद्धा शिकवले पाहिजे.
- जगामध्ये आजपर्यंत सतरा दशलक्ष कोटी (सतरा बिलियन) लोक होऊन गेले पण त्यापैकी जेमतेम ५०० जणांनीच जगाचा इतिहास घडवला. पण यात महत्त्वाचे म्हणजे या पाचशे लोकांना घडवण्यात त्यांच्या शिक्षकांचा/गुरूंचा मोलाचा वाटा होता हे आपण लक्षात ठेवायला हवे.
- प्रत्येक विद्यार्थ्यांचे भवितव्य हे शिक्षकावर अवलंबून असते. शिक्षकाने विद्यार्थ्याला व्यवस्थित घडवले तर केवळ विद्यार्थ्यांचेच नाही तर देशाचेही भवितव्य उज्ज्वल होऊ शकते.
- समस्यांना सामोरे जायला शिकवायला हवे. जे लोक समस्यांना न घाबरता सामोरे जातात तेच लोक पुढे यशस्वी होतात असे अनुभव येतात. अगदी देवांनासुद्धा सरळ-सोपे जीवन लाभले नाही. प्रभू रामचंद्रांना १४ वर्षे वनवास सोसावा लागला तर भगवान श्रीकृष्णाला जन्माला आल्याबरोबर समस्यांना सामोरे जावे लागले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, येशू ख्रिस्त यांनाही त्रास सहन करावा लागला, पण हे सर्व जण या त्रासाला सामोरे गेले आणि म्हणूनच महान होऊ शकले.
- आपण मुलांना जशी दृष्टी देऊ तशी ती घडतात हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी त्यांनी २-३ छोटी उदाहरणे सांगितली.

(१) एका मुलीने आपल्या आई-वडिलांना विचारले सृष्टीमध्ये माणूस कसा निर्माण झाला? आईने उत्तर दिले 'आत्म्यापासून' तर वडील म्हणाले 'माकडापासून'.

(२) चारी बाजूंनी शत्रूने वेढले आहे हे लक्षात आल्यावर एक सैनिक आपल्या अधिकाऱ्याला म्हणतो, 'सर! शत्रूने आपल्याला चारी बाजूने घेरले आहे. आता आपण वाचणे अवघड!' यावर तो अधिकारी सैनिकाला उत्तर देतो 'अरे व्वा! आनंदाची गोष्ट आहे, आता तू कुठेही गोळी मार, शत्रू मरणार!'

(३) एका शाळेत शिक्षकाने विद्यार्थ्यांना विचारले जगातील सात आश्चर्य कोणती? एका विद्यार्थिनीने वेगळेच उत्तर दिले. ती म्हणाली ती सात आश्चर्ये आहेत 'The ability to Laugh, Touch, Smell, Feel, See, Hear and Taste' असा वेगळा विचार करणाऱ्या विद्यार्थ्यांना फुलवले पाहिजे.

जन वन मिळा अचेत चळण । नाही दुजेपण ठांव यासी ।

## ह्या आनंदात सहभागी होऊया...

- वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रा. श्री. सुधाकर मुळे यांना पुणे महानगरपालिकेच्या वतीने शिक्षण व सामाजिक क्षेत्रात केलेल्या कामाबाबत 'गुणवंत शिक्षक' पुरस्काराने गौरवण्यात आले.
- मेजर किरण कुडलिंगार (निवृत्त) यांनी आय.आय. एम.अहमदाबाद या प्रसिद्ध संस्थेच्या व्यवस्थापन पदवी परीक्षेत तिसरा क्रमांक मिळविला आहे.
- वर्धिनीच्या देणगीदार श्रीमती निर्मला वैद्य यांना स्वा. सावरकर स्मृतीचिन्ह पुरस्काराने गौरवण्यात आले.
- वर्धिनीच्या खालील विद्यार्थ्यांची त्यांच्या नावांपुढील पदांसाठी निवड झाली आहे.

  श्री. दत्ता सांगोलकर- एस. टी. आय. — श्री. निलेश जगदाळे - पी. एस. आय.

  श्री. बल्लाळ - पी. एस. आय. — श्री. निलेश क्षिरसागर (सेटची परीक्षा उत्तीर्ण)

  श्री. मिलिंद कुलथे - तहसिलदार पदावर रुजू — श्री. उमेश लोहोंबरे : जि.प. वरीष्ठ क्लार्कपदी रुजू.

  ***यु.पी.एस.सी.पूर्व परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी***

  श्री. संतोष कांबळे — श्री. अतुल अग्निहोत्री

  श्री. मनिष कामतकर — श्री. योगेश यादव

  श्री. श्रीकांत मोरगी (सी. ए. पार्ट २ परीक्षा उत्तीर्ण)

  श्री. सोमनाथ पवळे (डिप्लोमा इन लेबर लॉ परीक्षेत पुणे विद्यापीठात प्रथम)
- श्री. गणेश पिलाने - आय.टी.आय. रिफ्रेजरेशन ॲन्ड एअर कंडिशनिंग कोर्समध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण.
- संतोष घाडगे याने अमरावती येथे झालेल्या राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेमध्ये तसेच कोल्हापूर येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील शालेय मल्लखांब स्पर्धेत खालीलप्रमाणे यश प्राप्त केले.

**राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धा, अमरावती :**

| | | | |
|---|---|---|---|
| पुरलेला मल्लखांब | द्वितीय क्रमांक | टांगता मल्लखांब | द्वितीय क्रमांक |
| वैयक्तिक कामगिरी | तृतीय क्रमांक | सांघिक कामगिरी | प्रथम क्रमांक |

**राष्ट्रीय स्तरावरील शालेय मल्लखांब स्पर्धा, कोल्हापूर,**

पुरलेला मल्लखांब — प्रथम क्रमांक **(सुवर्ण पदक विजेता)**

- फिरत्या प्रयोगशाळेचे काम पाहणाऱ्या श्री. सुनील कुलकर्णी यांनी होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेसाठी नव्याने संपर्कात आलेल्या काही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. यापैकी कुमार श्रीयश केसकर आणि अजिंक्य फणसे या दोघांची प्रकल्प टप्प्यांसाठी निवड झाली आहे.

**वरील सर्वांचे वर्धिनीच्या वतीने मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन!**

शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावें ।
उणे पडो नेदावें । कोणी येकाचें ।।

# हे सारे वर्धिनीमुळे !!

*त्रिदशक पूर्तीच्या वर्षाची सुरुवात म्हणून युवक-युवतींचे त्यांच्या त्यांच्या शाखांवर १३ मे च्या आसपास मेळावे झाले. या मेळाव्यांमध्ये वर्धिनीमध्ये अनौपचारिकपणे जे मोलाचे शिक्षण मिळते त्याचा व्यावसायिक / व्यावहारिक जीवनात कसा उपयोग होतो या विषयी अनेकांनी आपले प्रत्यक्ष अनुभव सांगितले. युवतींच्या कार्यक्रमातील या काही प्रतिक्रिया-*

● मी ज्या बसने रोज कामावर जायचे त्या बसमध्ये महाविद्यालयात शिकणारे बरेच विद्यार्थी असायचे. काही विद्यार्थिनीसुद्धा असायच्या. एक दिवस एका विद्यार्थिनीला त्रास देण्याच्या हेतूने काही विद्यार्थी तिला संकोच वाटेल असे विषय मुद्दाम बोलत आहेत असे माझ्या लक्षात आले. मी माझ्या जागेवरून उठून त्या मुलीच्या शेजारी जाऊन बसले. मी तिच्या शेजारी बसल्यावर तिला खूप हायसे वाटले आणि ती म्हणाली ताई ! ही मुलं नेहमीच असा त्रास देतात. मी काही न बोलता त्या मुलांकडे फक्त पहायला लागले. माझ्या नजरेला नजर मिळवण्याची त्या मुलांची हिंमत होईना. मग मी त्यांना एवढेच म्हटले की यापुढे एकदा जरी त्रास द्यायचा प्रयत्न केलात तर याद राखा ! माझी नजर आणि आवाजातील आत्मविश्वासाचा परिणाम झाला आणि टिंगल करणारी ती मुलं लगेचच पुढच्या स्टॉपला उतरली. वर्धिनीमध्ये आलेल्या अडचणींना आत्मविश्वासाने सामोरे जायला जे शिकवले जाते त्यामुळेच त्या मुलीची अडचण मला सहजपणे दूर करता आली.

**(कु. दीपाली पवार)**

● मी एका सॉफ्टवेअर कंपनीत काम करते. नोकरीच्या निमित्ताने पहिल्यांदा पुण्याच्याच काय महाराष्ट्राच्या बाहेर जावे लागले. नवीन प्रांत, नवे सहकारी आणि कंपनीही तशी मोठीच. पण या नवेपणाचा माझ्यावर वेगळा काही परिणाम झाला नाही कारण वर्धिनीमध्ये होणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या शिबिरांमधून परिस्थितीशी जुळवून घेण्याची भावना नकळत विकसित होत असते. स्वयंस्फूर्तीने काम करण्याची वर्धिनीत लागणारी सवय आणि सहजपणे छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये नेतृत्व करण्याचा सर्वांनाच मिळत असलेला सराव यामुळे कंपनीत नोकरीच्या दुसऱ्या-तिसऱ्या महिन्यातच सहजपणे एका मोठ्या गटाची 'टीम लिडर' म्हणून माझ्यावर जबाबदारी सोपवण्यात आली.

**(कु. श्वेता शिंदे)**

● एका मोठ्या कंपनीमध्ये आज मी काम करते. या कंपनीमध्ये निवडीसाठी झालेल्या मुलाखतीच्या वेळी मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी माझ्या अर्जामधील 'गाण्याची आवड' हा मुद्दा वाचून मला गाणे म्हणायला सांगितले. वर्धिनीमध्ये अनेक वर्षे देशभक्तीची भावना जागृत करणारी अनेक गीते मी म्हटली आहेत. त्या पैकी 'केसरी बाना सजाएँ, वीरका श्रृंगार कर' हे गीत मी आत्मविश्वासाने म्हटले. त्या गीतामुळे ते सर्वजण प्रभावीत झाले व त्यांनी मी हे गाणे कुठे शिकले आहे असे विचारले. अर्थातच मी 'स्व'-रुपवर्धिनी असे उत्तर दिले. मुलाखतीतील प्रश्नांचा ओघ सहाजिकच वर्धिनीच्या कामाकडे वळाला. एकूण अर्ध्या तासाच्या मुलाखतीतील अर्धा वेळ वर्धिनीचे काम या विषयासाठीच गेला. ज्या पदासाठी माझी मुलाखत होती त्या विषयी त्यांनी भरपूर प्रश्न विचारलेच पण वर्धिनीमुळे माझ्या व्यक्तिमत्वामध्ये जो आत्मविश्वास रुजला आहे त्याचा या कंपनीमध्ये माझी निवड होण्यात निश्चितपणे प्रभाव पडला असा मला विश्वास आहे.

**(कु. डिंपल हायगुंडे)**

नर नारी बाळें अवघा नारायण । ऐसे माझें मन करी देवा ।

# विशेष लेख

## आज देशाला 'हार्ड वर्क युनिव्हर्सिटीची' आवश्यकता आहे

ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ कै.श्री.पु.ग.वैद्य यांचे अलिकडेच दु:खद देहावसन झाले. त्यांचे वर्धिनीशी निकटचे नाते होते. हे नाते त्यांच्या आणि वर्धिनीच्या विचारातील एकरूपतेमुळे निर्माण झाले होते.

२००३ हे वर्धिनीचे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. या वर्षात अभ्यासिका चालविणाऱ्या, संस्कार वर्ग घेणाऱ्या व या कामात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या अशा सर्वांकरिता एक कार्यशाळा घेण्यात आली होती. त्यानिमित्ताने शैक्षणिक क्षेत्रात सक्रीय भूमिकेतून काही विधायक घडविणाऱ्या क्रियाशील शिक्षण तज्ज्ञांशी या कार्यशाळेची पूर्वतयारी म्हणून वर्धिनीने संपर्क साधला होता. २३ एप्रिल २००३ या दिवशी कै. पु. ग. वैद्य यांनी व्यक्त केलेले मनोगत, त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून, सारांश रूपात पुढे ठेवीत आहोत. या मनोगतातील मुद्दे शिक्षणक्षेत्रातील आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना अंतर्मुख करायला लावणारे आहेत.

* पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळांमधील शिक्षणावर गांभीर्याने आणि प्राधान्याने भर द्यायला हवा.

* प्राथमिक शाळांमधून व्यावसायिक व सैनिकी शिक्षणाचा विचार होणे आवश्यक आहे.

* पूर्वप्राथमिक शाळांमध्ये शिक्षित पालकांनी (आई-वडील उभयतांनी) आपला थोडा वेळ देऊन काही तासिका घ्याव्यात. त्यातून शिक्षक-पालक-विद्यार्थी यांच्यात अधिक सुसंवाद निर्माण होईल.

* जगातल्या बहुतेक क्रूर माणसांचे बालपण संस्कारहीन होते असे लक्षात येते. म्हणून पूर्व-प्राथमिक व प्राथमिक शाळांमधील शिक्षण व संस्कार हे अतिशय महत्त्वाचे आहेत. त्याकडे आज कमालीचे लक्ष दिले पाहिजे.

* सध्या शिक्षण धनदांडग्यांच्या हातात जाते आहे. भरपूर शुल्क आणि भरपूर देणगी असा पायंडा पडतो आहे. हे शिक्षणक्षेत्रावरचे एक नवीन आर्थिक आक्रमण आहे. अशा अनेक शाळांत संस्कारापेक्षा पैशाला अधिक प्राधान्य मिळते. देशभक्ती, राष्ट्रहित, श्रमप्रतिष्ठा, चारित्र्य अशा मूल्यांच्या जतनाकडे तळमळीने लक्ष दिले जात नाही, अनेक वेळा या मूल्यशिक्षणाचा केवळ देखावा मांडला जातो. शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असते. राष्ट्रभाषा, मातृभाषा, संस्कृती याकडे दुर्लक्ष केले जात आहे. एक प्रकारे या मातीशी नाळ तुटली जाते.

* आज मराठी माध्यमाच्या शाळांतील संख्या कमी होते आहे. मुलभूत संकल्पना मातृभाषेतून अधिक उत्तम रितीने रुजवता येतात हे विसरता कामा नये.

* बेकारी टाळणे, स्वावलंबी बनणे याकरिता 'कमवा आणि शिका' यावर भर देणे आवश्यक आहे. work culture शाळांतच अंगी बाणले गेले पाहिजे. महात्मा गांधीजींची 'श्रमालय' संकल्पना प्रत्यक्षात उतरवणे आवश्यक आहे.

* आज आपल्या देशाला **Hard Work University** चे पदवीधर आवश्यक आहेत.

* शिक्षण क्षेत्रात Learning to Learn यावरच खरा भर हवा. तसेच शारीरिक शिक्षणावरही कटाक्षाने भर देणे आवश्यक आहे.

जितुकें कांही आपणासि ठावें । तितुकें हळूंहळूं सिकवावें ।।
शहाणे करून सोडावें । बहुतजन ।।

# तीन दशकांची वाटचाल आणि भविष्यातील स्वप्नं

## श्री. पुरुषोत्तभाई श्रॉफ

पाहता पाहता वर्धिनीच्या कामाला तीस वर्षे पूर्ण झाली. डोळ्यासमोर तीस वर्षांचा पट उलगडून पाहताना किती तरी आठवणी ताज्या झाल्या. कै. किशाभाऊ पटवर्धन हे राजा धनराज गिरजी विद्यालयातून मुख्याध्यापक पदावरून निवृत्त होणार होते. त्यावेळेस आम्ही दोघेही ज्ञानप्रबोधिनीच्या कामात कै. अप्पासाहेब पेंडसे यांचे सहकारी म्हणून काम करीत होतो. ज्ञानप्रबोधिनीचा प्रयोग अद्वितीय होता, पण कै. किशाभाऊंना आणि मला पुण्याच्या पूर्व भागातील गरीब, निम्न आर्थिक स्तरातील विद्यार्थ्यांसाठी काही करावे असे वाटत होते. डिसेंबर १९७८ मध्ये किशाभाऊ निवृत्त झाले आणि त्याच्या दुसऱ्या दिवसापासून मनातील या विचारांना गती मिळाली. असा प्रयोग पूर्व भागात सुरू करावा असे वाटणारे सहकारी हळुहळू गोळा होऊ लागले आणि त्यातून सर्वश्री. राजाभाऊ लवळेकर, अण्णासाहेब गोगावले, दत्तोबा तांबे, कांचनभाई शहा, श्रीकांत सामळ असे सहकारी गोळा झाले आणि वर्धिनीचे काम सुरू घाले.

१०-१२ मुलांना निवडून सुरू झालेल्या वर्धिनीच्या कामात हळुहळू मुलांची संख्याही वाढू लागली आणि कामाचा विस्तारही होऊ लागला. १९८१ मध्ये जागेच्या आलेल्या अनपेक्षित अडचणीतून वाट काढत काम चालू राहिले पण आम्हा सर्व सहकाऱ्यांना या अडचणीने अस्वस्थ केले. सर्वांनी संकल्प केला की वर्धिनीला स्वत:ची जागा मिळवून द्यायची. जागेची अडचण जशी आली तसे मदतीचे हातही पुढे आले. मंगळवार पेठेत जिथे काम सुरू झाले त्याच परिसरात जागा मिळाली. तो भूखंड विकत घेण्याचे ठरले. कै. अण्णासाहेब गोगावले यांनी त्यासाठी प्रचंड मेहनत घेतली.

वर्धिनीची स्वत:ची वास्तू असावी असा केलेला संकल्प प्रत्यक्षात येण्यासाठी आता वर्धिनीला भूखंड मिळाला होता. त्यावेळी संस्थेकडे फारसा निधी नव्हता पण आमचा सर्वांचा समाजाच्या दातृत्वावर पूर्ण विश्वास होता. बँकेने कर्ज मंजूरही केले होते; पण कार्यकारिणीच्या एका बैठकीत असा निर्णय झाला की आपण प्रत्येकाने स्वत:ची काही रक्कम आणि आपल्या स्नेह्यांकडून काही रक्कम अल्प काळासाठी ठेव स्वरूपात मिळवावी आणि बांधकाम सुरू करावे. त्या एका बैठकीत आवश्यक त्या रकमेची आश्वासने मिळाली आणि इमारतीचे काम सुरू झाले. इमारतीच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनाला सरसंचालक प.पू. बाळासाहेब देवरस आणि रामकृष्ण मठाचे स्वामी स्मरणानंदजी महाराज उपस्थित होते. त्यांनी दिलेल्या आशीर्वादामुळे कामाचा पुढे खूप विस्तार झाला आहे. मा. मोहनजी भागवतांसारख्या अनेक ज्येष्ठ संघ अधिकाऱ्यांचेही संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन मिळत आहे.

या नव्या इमारतीत काम सुरू झाल्यावर सुरुवातीला खूप अडचणी आल्या. परिसरात कमालीची अस्वच्छता, निरक्षरता होती. अशा वातावरणात राहून काम करणे आव्हानात्मकच होते. पण छोट्या-छोट्या मुलामुलींना घेऊन बालवाडी सुरू झाली आणि वातावरण हळुहळू बदलू

तुका म्हणे नाही वर्ण अभिमान । अवघेचि जिवन्मुक्त लोक ।

लागले. गरजू महिलांसाठी शिवणवर्ग, दाई वर्ग, साक्षरता वर्ग सुरू झाले. डॉ. बानुबाई कोयाजींच्या मदतींमुळे आरोग्यकेंद्र सुरू झाले, आजोळ प्रकल्प सुरू झाला आणि इमारत वेगवेगळ्या उपक्रमांनी गजबजू लागली. गेल्या तीस वर्षांच्या वाटचालीत शहराच्या वेगवेगळ्या भागात बारा शाखा, गरजू महिलांसाठी चालणारे उद्योगशिक्षण वर्ग, खेड्यातील मुलांसाठी चालणारी फिरती प्रयोगशाळा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, अभ्यासिका अशा अनेक उपक्रमातून कामाचा विस्तार होत गेला. विस्ताराच्या या प्रत्येक उपक्रमातून समाजाला उपयुक्त अशा अनेक गोष्टी सुरू करता आल्या याचा खूप आनंद वाटतो.

रौप्यमहोत्सवाच्या टप्प्यवर संस्थेने विस्ताराचे काही स्वप्न पाहिले आहे. चऱ्होली येथे आपण विकत घेतलेली सहा एकर जमीन आणि संस्थेला त्याच गावी बक्षिसपत्राने मिळालेला एक एकराचा भूखंड अशा सात एकरावर वेगवेगळ्या योजना साकारायच्या आहेत. निवासी शिबिरांसाठी शिबिर संकुल, नर्सिंग डिप्लोमा/डिग्री कोर्स, कमर्शियल पायलट ट्रेनिंग अशा अनेक योजना, प्रकल्प विचाराधिन आहेत, नव्या नव्या कल्पना मांडल्या जात आहेत. शिक्षणानंतर तरुणांना उदरनिर्वाहासाठी काम मिळाले पाहिजे. त्यासाठी ज्ञान आणि शारीरिक श्रम यांच्या संयोगातून आणि अल्प भांडवलात जे जे म्हणून स्वयंरोजगार सुरू करता येऊ शकतात त्याचे प्रशिक्षण या जागेवर करावे असे वर्धिनीने ठरविले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे वर्धिनीचे मूळ काम आणि विस्तार योजनेतील स्वयंरोजगारासारख्या अनेक योजना यांचे आपल्या देशाच्या आजच्या परिस्थितीत खूप महत्त्व आहे.

ज्या वैदिक संस्कृतीतून हिंदू धर्म टिकला त्या हिंदू समाजाने गेल्या किमान ३५०० वर्षांच्या इतिहासात कधीही कोणावरही आक्रमण केले नाही वा कोणाचे सक्तीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न केला नाही. उलट या देशावर मात्र सातत्याने आक्रमणे झाली, नाना तऱ्हेची संकटे आली. आपल्या देशावर चालून आलेल्या तैमूरने सुमारे एक लाख लोकांची हत्या केली. स्वतंत्र झाल्यावरसुद्धा भारताने कधीही कुणावर आपणहून आक्रमण केले नाही. पण स्वतंत्र भारतातील काश्मिर-मधल्या दहा लाख काश्मिरी पंडितांना मात्र अत्याचारांमुळे काश्मीरची भूमी सोडून विस्थापिताचे

## स्तुत्य प्रयत्न 'प्रयास'चा

वर्धिनीचे युवक कार्यकर्ते मेजर किरण कुडलिंगार (निवृत्त) यांनी अहमदाबादच्या प्रसिद्ध आय.आय.एम. शिक्षण संस्थेतून व्यवस्थापन पदवीचे शिक्षण नुकतेच पूर्ण केले. त्यांनी व त्यांच्या सहकारी मित्रांनी आय.आय.एम. अहमदाबादच्या जवळ असलेल्या एका सेवावस्तीत जाऊन तेथील ६० मुला-मुलींचे शिक्षण, आरोग्य या विषयांसाठी स्वयंस्फूर्तीने 'प्रयास' या नावाने उपक्रम सुरू केला. सुरुवातीला बुजणारी सेवावस्तीमधील ही साठ मुलंमुली आता या उच्चशिक्षित ताई-दादांबरोबर मोकळेपणाने संवाद करतात, नव्यानव्या गोष्टी शिकायचा प्रयत्न करतात. 'प्रयास'च्या उपक्रमाला प्रसिद्धी-माध्यमातून प्रसिद्धी मिळताच अहमदाबादमधील अनेकांनी आर्थिक मदत देऊ केली. आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर हा उपक्रम बंद होऊ नये म्हणून प्रत्येक वर्गाकडे काही विद्यार्थ्यांचे पालकत्व देऊन या विद्यार्थ्यांनी एक अभिनंदनीय पायंडा सुरू केला आहे.

तो परोपकार करिताचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।
मग काय उणे तयाला । भूमंडळी ।।

जीणे जगावे लागत आहे. अमरनाथची यात्रा करणेसुद्धा धोक्याचे झाले आहे. शांतताप्रिय असलेला हा सोशिक समाज कधी रागावला, चिडला आणि त्याने प्रतिक्रिया दिली तर ती प्रतिक्रिया देखील टीकेचे लक्ष्य होते.

घटना इतिहासातील असो किंवा अतिरेक्यांनी मुंबईवर अलिकडे केलेला हल्ला असो, अशा घटनांमधून बोध काय घ्यायचा? भगवत्‌गीतेमधील उक्तीप्रमाणे *उद्धरेदात्मनात्मानम्'*! आपणच आपले रक्षण केले पाहिजे. एकजुटीने उभे राहून आपण आपले व समाजाचे रक्षण केले पाहिजे त्यासाठी सामान्य नागरिकाची अशी स्वसंरक्षणाची मन:स्थिती उत्पन्न करायला हवी. वर्धिनीत ज्या सांघिक कवायती घेतल्या जातात, शिस्त व कठोर परिश्रम करण्याचे तसेच संकटकाळी समाजाच्या रक्षणासाठी धाऊन जाण्याचे जे संस्कार रुजविले जातात ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे समाजामध्ये वर्धिनीसंबंधी एक विश्वास निर्माण झाला आहे. वर्धिनी आता केवळ एक संस्था न राहता एक चळवळ व्हायला हवी.

भारत ही सुवर्णभूमी आहे. औद्योगिक प्रगतीने आणि आय.टी क्षेत्रातील बुद्धीच्या प्रतिभेने आपण जगातील प्रगत देशांमध्येही आपला ठसा उमटविला आहे. माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या आशावादानुसार २०२० सालापर्यंत भारत जगातील एक प्रबळ राष्ट्र होईल आणि या टप्प्यावर जागतिक नेतृत्त्वाची जबाबदारीसुद्धा आपल्यावर येणार आहे. हे आव्हान पेलण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करायला हवेत. वर्धिनीचे काम अधिक प्रभावी होणे, कामाचा अनेक अंगांनी विस्तार होणे, हे याच प्रयत्नाचा एक भाग समजून काम करूया.

## आणि फुटलेला पेपर बदलला गेला...

वार्षिक परिक्षेचे दिवस चालू असताना कार्यकर्ते आपापल्या शाखेतील वर्धकांची तयारी कशी चालू आहे याकडे अधिक लक्ष देत असतात. त्यासाठी या काळात वर्धकांना प्रत्यक्ष भेटून त्याला काही अडचण नाही ना हे पाहिले जाते. एका शाखेचा शाखा प्रमुख आपल्या शाखेतील एका विद्यार्थ्यांच्या घरी गेला. त्याच्याशी आणि पालकांशी गप्पा मारताना या प्रमुखाच्या हे लक्षात आले की सदर वर्धक ज्या शाळेत जातो त्या शाळेचे पेपर फुटतात आणि ते मिळवण्यासाठी अनेक विद्यार्थी धडपडाट करतात. हळूहळू माहिती काढून या शाखा प्रमुखाने ते पेपर जेथे मिळतात तेथे जाऊन स्वत:च दोन इयत्तांचे पेपर विकत घेतले आणि तडक त्या शाळेत जाऊन सदर शाळेच्या शाळाप्रमुखांची भेट घेतली. या शाळाप्रमुखांच्या समोर त्याने विकत घेतलेले पेपर ठेवले आणि विनंती केली की उद्या होणाऱ्या परीक्षेसाठी हेच पेपर काढलेले आहेत का याची खात्री करावी. शाळाप्रमुखांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन लगेचच त्याचा शोध घेतला आणि त्यांच्या लक्षात आले की पेपर खरोखरीच फुटलेले आहेत. सदर शाखाप्रमुखाला त्यांनी धन्यवाद दिले आणि दुसऱ्या दिवशीचे पेपर बदलून दिले गेले. या निमित्ताने सदर शाळेतील एक गैरप्रकार रोखता आला. तो आनंद घेऊन सदर कार्यकर्ता परतला.

जेथे देवाची तळमळ । तेथे कशाचा विटाळ ।

# हात उगारण्यासाठी नाही तर उभारण्यासाठी आहेत!

*('हात उगारण्यासाठी नाही तर उभारण्यासाठी आहेत बाबा आमटे यांचे हे उद्‌गार माझ्या हृदयाला स्पर्श करून गेले आणि कधी मी त्यांच्या कामात मिसळून गेलो माझे मलाच कळले नाही' डोळ्यात पाणी आणून आपल्या आठवणींना उजाळा देत श्री. दामोदर वेले बोलत होते. भारतरत्न डॉ. बाबा आमटे यांचे ९ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळामुळे दुःखद निधन झाले. जवळपास ५०-५५ वर्ष त्यांचा निकटचा सहवास लाभलेल्या श्री. दामोदर वेले आणि सौ. विजयाताई वेले या दांपत्याला भेटून घेतलेल्या मुलाखतीवर आधारीत लेख.)*

१९५१ साली बाबांचा जो 'मित्रमंडळा'चा पहिला कार्यक्रम झाला होता त्याला मी हजर होतो. याचे कारण असं होतं की माझे वडील आणि बाबा हे खादी क्षेत्रातील एकमेकांचे सहकारी होते. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचेबरोबर बाबा आणि माझ्या वडिलांनी काम केले होते. 'दामू' या नावानेच बाबा मला हाक मारायचे. मित्रमंडळाच्या त्या कार्यक्रमाने मी फारच प्रभावीत झालो. १९६७ किंवा ६८ सालची गोष्ट आहे. त्यांच्याकडे मला अण्णासाहेब सहस्रबुद्धे घेऊन गेले. त्यावेळी मी वर्धा जिल्ह्यामध्ये एका रूरल इन्स्टिट्यूटमध्ये प्राध्यापक म्हणून काम करीत होतो. अण्णासाहेब मला म्हणाले की अरे तू शिकवण्याचे जर काम करतोस तर मग समाजसेवेचेही काहीतरी काम केले पाहिजेस. इन्स्टिट्यूटमधील माझ्या २-३ सहकाऱ्यांना घेऊन मी त्यांच्याबरोबर बाबांकडे आनंदवनात गेलो. त्यावेळच्या वृत्तपत्रांमधून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या अशांततेच्या संदर्भात खूप बातम्या येत होत्या. देशभरातील तरुणांमध्ये प्रचंड अशांतता वाढत चालल्याचे बाबांनाही जाणवत होते. या अशांततेतून



युवापिढी हिंसेकडे वळेल अशी त्यांना चिंता वाटत होती. ते मला म्हणाले, 'हे बघ, दामू! आपल्याला सोमनाथला प्रकल्प सुरू करायचा आहे! तू सोमनाथच्या जंगलात जा. आपल्या नव्या प्रकल्पासाठी तेथील जंगलात योग्य जागेचा शोध घे. तेथे आपल्याला तरुणांसाठी श्रमसंस्कार शिबिर घ्यायचे आहे. या शिबिराची तू जबाबदारी स्वीकारावीस.' अण्णासाहेब सहस्रबुद्धे आणि माझ्या २-३ सहकाऱ्यांसोबत मी सोमनाथला गेलो. येताना मी परत बाबांना आनंदवनात जाऊन भेटलो. ते म्हणाले, 'दामू, या तरुण विद्यार्थ्यांच्या शिबिराला किमान १५०० विद्यार्थी आले पाहिजेत' ते म्हणाले, **'हात उगारण्यासाठी नाहीत तर उभारण्यासाठी असतात'** त्यांचे हे

**समुदाव पाहिजे मोठा । परि तणावा असावा बळकटा ।**
**मठ करोनी ताठा । धरोची नये ।।**

उद्‌गार माझ्या हृदयाला स्पर्श करून गेले आणि मी त्यांच्याकडे अधिक आकृष्ट झालो. भारावलेल्या स्थितीतच घरी आलो. पत्नीला बाबांची कल्पना सांगितली आणि त्यानंतर खरोखरीच या श्रमशिबिराच्या कामासाठी झपाटला गेलो. बाबांनी १५०० विद्यार्थ्यांची अपेक्षा केली होती. मी राष्ट्रसेवादल, युक्रांद, आणि बुलढाण्याची युवक प्रगती सहयोग या संघटनांशी संपर्क साधला. त्या संघटनांच्या कार्यकर्त्यांना बाबांच्या श्रमसंस्कार शिबिराची कल्पना आणि बाबांची इच्छा सांगितली आणि अधिकाधिक संख्या या शिबिराला यावी यासाठी प्रयत्न करायला सांगितले. संपूर्ण विदर्भ तर मी पिंजून काढला. शाळा, महाविद्यालये, युवक संघटना, जेथे जेथे युवकांशी संपर्क होईल त्या सर्वांना भेटून श्रमसंस्कार शिबिराची कल्पना आणि बाबांची इच्छा सांगून त्या सर्वांना या शिबिराला येण्यासाठी आवाहन केले.

## पूर्वतयारी

सोमनाथला त्यावेळी जंगल होते. सोमनाथला यायला रस्तासुद्धा नव्हता. बाबा म्हणाले, 'अरे, पंधरा दिवसांचे शिबिर घ्यायचे तर आपल्याला खूप तयारी करावी लागेल. १५०० तरुणांना राहता येईल एवढी जागा साफ करावी लागेल, इथे पाण्याची अडचण आहे. पाणी तर मोठ्या प्रमाणावर लागेल. पण जवळूनच ओढा वाहतो आहे त्या पाण्याचा आपण शिबिरासाठी उपयोग करू शकू. पाणी साठवण्याचाही विचार करावा लागेल. इथे प्रकल्प चालवायचा असल्याने पाण्याची कायमची सोय करावी लागेल. हे श्रमसंस्कार शिबिर आहे त्यामुळे त्यासाठी कोणते काम द्यायचे याची योजना पक्की करावी लागेल.' त्यानुसार श्रमशिबिराच्या काळात या परिसरात दोन तलाव बांधायचे असे ठरले. शिबिर कालावधी पंधरा दिवसांचा आणि तेही जंगलात, त्यामुळे पंधरा दिवसांच्या शिबिरासाठी भाजी कोठून आणायची हा प्रश्नच होता. नागपूरहून फार तर कांदे बटाटे आधी आणून ठेवता आले असते पण पंधरा दिवस कांदे बटाटे खाऊन मुलं कंटाळून गेली असती. मग बाबांनी एक कल्पना सुचवली. ते म्हणाले, 'आपल्याकडे जागा आहे, ३-४ महिन्यांचा कालावधी हातात आहे तर तू याच ठिकाणी त्यावेळी उपयोगी पडतील अशा भाज्या लाव'. कृषी महाविद्यालयातील माझ्या २-३ मित्रांकडे मी ही कल्पना मांडली. आठवड्यात एक भाजी दोनदा होईल अशा रितीने नियोजन करून ७-८ प्रकारच्या भाज्या लावायचे ठरले. तीन-साडेतीन महिन्याच्या कालावधीमध्ये येतील अशा रितीने भाज्या लावण्यात आल्या. आम्ही दर शनिवार-रविवार असे तेथे जाऊन भाज्या लावण्याचे काम करीत होतो. लाल भोपळा, ढेमसं, अळुची पानं, भेंडी अशा भाज्या लावल्या होत्या. मग बाबांना कल्पना सुचली की आपण मका लावावा.

'पुण्या-मुंबईकडील मुलं येणार त्यांना कणीस भाजून खायची सवय असते. आपण त्यांना ताजी कणसे भाजून खायला देऊ या!' बाबांची ही कल्पना सर्वांनाच आवडली. त्याप्रमाणे मग मकाही लावला. मका खूप आला. त्याहीपेक्षा भेंडी खूप आली कारण आजपर्यंत त्या जंगलातील जमिनीत असे कोणतेही पीक घेतलेले नव्हते. जमिनीत इतका कस होता की, भेंडीचे पीक

चित्त चैतन्य पडतां मिठी । दिसे हरिरूप अवघी सृष्टी ।

अमाप आले आणि तेही श्रमसंस्कार छावणी शिबिराच्या खूप आधी. दोन ट्रॉली भरून भेंडी जवळ असलेल्या वरोडा या गावी नेऊन विकली.

## आणि शिबिर सुरू झाले

सर्व प्रचार-प्रसार आणि आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राष्ट्रसेवादल, युक्रांद आणि युवक प्रगती सहयोग या तीनही संघटनांच्या माध्यमातून प्रत्येकी साधारण २०० तरुण विद्यार्थी शिबिरासाठी आले तर एकट्या विदर्भातून ८०० च्या आसपास विद्यार्थी आले. एकूण २५०-२७५ च्या आसपास मुलीही या शिबिरासाठी आल्या होत्या. अशा साधारण १४००-१५०० तरुणांचे श्रमसंस्कार छावणी शिबिर सुरू झाले. पहिल्या दिवशी सर्व मुलं तयार झाली. बाबांनी खूप कल्पना सर्वांसमोर मांडल्या. काय काय करण्याची कल्पना आहे त्या करताना कोणत्या अडचणी येतील याचीही कल्पना दिली.

'श्रमसंस्कार' हा शिबिराचा मुख्य हेतू होता. या कालावधीत एका तलावाचे काम पूर्ण होऊ शकले. याठिकाणी नंतर भातशेती करायची असल्याने जागेची साफसफाई करून खाचरं तयार करण्यात आली. या शिबिरातील न्याहारी व दोन वेळची जेवणे यासाठी कोणी आचारी नव्हते तर शिबिरार्थींनीच आळीपाळीने ही जबाबदारी सांभाळली आणि त्यात मुल-मुली असा भेद नव्हता.

या शिबिरामध्ये तरुणांशी बोलायला, त्यांना प्रेरणा द्यायला अनेक रथी-महारथी आले होते. त्यातील अनेकजण या मुलांबरोबर छावणी शिबिरात राहिलेही. यामध्ये श्री. शंकरराव देव, श्रीधर हरी थत्ते, एस.एम. जोशी, आचार्य रजनीश, राष्ट्रसेविका समितीच्या प्रमुख मावशी केळकर अशा अनेकांचा समावेश होता. मावशी केळकरांना हिंदी येत नव्हते. त्या मराठीतूनच बोलायच्या पण त्यांचं बोलणं इतकं प्रभावी होतं की, सर्वजण त्यांच्या बोलण्याने प्रभावीत होत असत. जळगावकडील अनेक डॉक्टर मंडळीही आली होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजही आले. शिबिरार्थी मुलामुलींच्या फर्माईशीनुसार त्यांनी खड्या आवाजात भजने सादर केली. वनवासी लोकांच्या कलांचा परिचय व्हावा या हेतूने वनवासींचे राजे विश्वेश्वर यांच्या सौजन्याने एक पारंपरिक वनवासी नृत्याचा कार्यक्रमही झाला. या कार्यक्रमासाठी २०० मैलावरील आपल्या गावाहून १० आदिवासी महिला पुरुष स्वत:च्या खर्चाने आले होते.

छावणी शिबिराच्या जवळ असलेल्या ओढ्याच्या काठी जनरेटर नेऊन तीन-चार ट्युबलाईट लावल्या होत्या. तेथे शिबिरात आलेल्या सर्वांना शेकोटी पेटवून गोलात बसवले होते. त्यांच्याबरोबर एस.एम. जोशी, शंकरराव देव हेही उपस्थित होते. सामुहिक गाणी म्हणत कार्यक्रम रंगात आला आणि त्याच वेळी शेकोटीवर कणसे भाजण्याचा कार्यक्रम चालू होता. साधनाताईंनी भाजलेल्या सर्व कणसांना तूप आणि मीठ लावून मुलांना ती खायला दिली.

## आणि व्याघ्रराजाने दर्शन दिले...

शेकोटीचा हा कार्यक्रम ऐन रंगात आला असताना बाबांनी सर्वांना एकदम शांत राहायला सांगितले. बाबा म्हणाले, 'इथेच जवळ कुठे तरी वाघ आला आहे, मला त्याचा वास येतोय. असे ते म्हणतायत न

म्हणतायत तोच एक ७-८ फुटी लांब वाघ तेथे आला. त्याची ती तुकतुकीत कांती आणि त्याचे ते रूप पाहिल्यावर सर्कशीमधील वाघ आणि जंगलातील वाघ यांच्यात नेमका काय फरक असतो याचे दर्शन सर्वांना झाले. अचानक आलेल्या या वाघामुळे सर्वच जण घाबरले आणि एकमेकांना धरून बसले. मग त्या वाघाने एक डरकाळी फोडली आणि छलांग मारून तो ओढ्याच्या पलीकडे निघून गेला. तो जसा गेला तसे सारेजण शूर झाले. वाघाचे ठसे बघताना सर्वांच्या चेहऱ्यावर आपण काहीतरी मोठा पराक्रम करतो आहोत असा भाव होता.

बाबा जंगलात खूप फिरायचे आणि जंगलातील वन्य श्वापदांबद्दल त्यांना खूप माहिती होती आणि त्यामुळे बहुदा बाकी कोणाला नाही पण बाबांना वासावरून जवळपास वाघ असल्याचे समजले. बाबा गोष्टी सांगत त्यात वाघाशी लढणं किती कठीण आहे ते सांगत.

शिबिरार्थींना अनेक सूचना देण्यात आल्या होत्या. त्यापैकी एक सूचना दिलेली होती की, जंगलात कोणी एकट्याने जायचे नाही. उन्हाळ्याचे दिवस असल्याने वाघ पाण्यावर येतो त्यामुळे कोणी धोका पत्करू नये असे सांगितले होते. एक दिवस दुपारी व्याख्यान चालू असताना दोन-तीन लहान मुलं धावत धावत आली. ते घाबरले होते. बाबांनी विचारले काय झाले? तेव्हा त्यांनी सांगितले की, 'वाघ आलाय.' सोमनाथच्या जंगलात एक लहान धबधबा आहे. त्या पाण्यात शिबिरार्थींची ही लहान मुलं न सांगता पोहायला गेली होती. त्याठिकाणी वाघ आला व पाणी पीत होता. त्याचे पाण्यात पडलेले प्रतिबिंब पाहिल्यावरच मुलांची गाळण उडाली आणि कपडे तसेच टाकून मुलं शिबिरात पोहोचली.

या पहिल्या छावणी शिबिरानंतर तेथे झालेल्या दुसऱ्या व तिसऱ्या शिबिरांची प्रमुख या नात्याने मी जबाबदारी सांभाळली. तिसऱ्या शिबिरानंतर दुसऱ्या तलावाचे काम पूर्ण झाले. छावणी शिबिरे या ठिकाणी आजही होतात. ते दोन्ही तलाव आजही आहेत व त्यात पाणी आहे. या तलावांमुळे बाबांनी तेथे विहीर खोदण्याची कल्पना मांडली. या विहिरीचे काम जवळपास दीड वर्षांत पूर्ण झाले.

## कुष्ठरोग निर्मूलन कामातील सहभाग

या शिबिरातील कामांमुळे मला प्रेरणा मिळाली आणि महाविद्यालयातील प्राध्यापकी सोडून पुढे मी कुष्ठरोग निर्मूलनासाठी काम करणाऱ्या गांधी मेमोरियल लेप्रसी फौंडेशन या संस्थेच्या कामात सहभागी झालो. त्यावेळी मला कुष्ठरोगासंबंधी काहीही माहिती नव्हती. सामान्य माणसाच्या मनात असते तशी माझ्याही मनात कुष्ठरोगासंबंधी भीती होती. डॉ. वारदेकर हे या संस्थेचे काम पाहत होते. कुष्ठरोगासंबंधी त्यांचा प्रचंड अभ्यास होता व डॉक्टर या नात्याने अनुभव होता. कुष्ठरोगाचा अभ्यास केल्यावर त्यांनी असे सिद्ध केले की कुष्ठरोग झालेली व्यक्ती घरी राहूनच उपचार घेऊ शकेल. ते मला म्हणाले की, प्राथमिक अवस्थेतच कुष्ठरोग्याला शोधून काढले पाहिजे. हे काम करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी लोकांना माहिती मिळाली पाहिजे. हेल्थ एज्युकेशन ऑफिसर या नात्याने मी हे काम करावे असे त्यांनी सुचविले. मग एक वर्ष मी प्रशिक्षण घेतले. टार्गेट

देव तिळी आला । गोड गोड जीव घाला ।
साधला हा पर्वकाळ । गेला अंतरींचा मळ ।

ग्रुप शोधून काढून प्रचार प्रसाराचे काम मी सुरू केले. बी.एड. कॉलेज, डी. एड. कॉलेज नवोदय विद्यालय, एन.सी.सी., एन.एस.एस. अशा ग्रुप्ससमोर व्याख्याने द्यायची, या रोगाविषयी माहिती देणारे साहित्य तयार करायचे असे माझे काम सुरू झाले. बी.एड., डी.एड.च्या विद्यार्थ्यांना कुष्ठरोग या विषयावर माझ्या पत्नीने पाठ तयार करून दिले. शिक्षकांना प्रशिक्षण दिले. शालेय अभ्यासक्रमामध्ये कुष्ठरोगासंबंधीचा पाठ समाविष्ट झाला पाहिजे. त्यासाठी पाठ्यपुस्तक- पाठ तयार केला आणि महाराष्ट्र राज्य मंडळातील सदस्यांच्या गाठीभेटी घेतल्या. पुढे हा धडा समाविष्ट झाला. असि. डायरेक्टर पदावर २३ वर्षे आणि नंतर एक वर्षे डायरेक्टर म्हणून मी काम करीत होतो. माझ्यानंतर डॉ. गोगटे यांनी या पदावर काम केले. त्यांना असे अगदी मनापासून वाटत होते की किती काळ आपण कुष्ठरुग्णांसाठी आनंदवनासारख्या स्वतंत्र कॉलनीज चालू ठेवायच्या? कुष्ठरोगाच्या समूळ उच्चाटनाचे स्वप्न तरी आपण पाहू शकतो का? पण आज सांगता येते की ३५ लाख कुष्ठरुग्ण संख्येवरून आता पाच लाख इतकी संख्या कमी करण्यात आपल्याला यश मिळाले आहे आणि आता कोणत्याही नव्याने कुष्ठरोग आढळणाऱ्या व्यक्तीला शारीरिक विकृती येत नाही. अन्य आजारांसारखा उपचार करून रुग्ण बरा होतो.

**<u>आनंदवनातील काम</u>**

कुष्ठरुग्णांच्याच सेवेच्या कामात राहिल्याने माझे अनेकदा आणि वर्षानुवर्षे आनंदवनात जाणे होत होते. अजूनही जाणे होते. बाबांनी तेथे जे काम उभे केले आहे ते अनमोल आहे. समाज जेव्हा कुष्ठरुग्णांकडे घृणास्पद नजरेने बघत होता तेव्हा बाबांनी त्यांना हृदयाशी धरले, त्यांना त्यांच्या पायावर उभे केले, स्वावलंबी केले. वेगवेगळे उद्योगव्यवसाय शेती अशा माध्यमातून त्यांच्या हातांना काम दिले. आनंदवनाच्या परिसरात तीन महाविद्यालये दिमाखाने उभी आहेत, हजारो विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय त्यामधून होते आहे. कुष्ठरोग बरा झाल्यानंतरही केवळ शरीराच्या काही अवयवांना आलेल्या विकृतीकडे पाहून शिकलेला समाजही सहजासहजी आपला गैरसमज बदलायला तयार नव्हता. परंतु बाबांच्या अथक प्रयत्नांमुळे, समाजातील वेगवेगळ्या कर्तृत्ववान व्यक्तींनी आनंदवनात वारंवार येऊन व्यक्त केलेल्या आत्मियतेमुळे उशिरा का होईना समाजाच्या मन:स्थितीत बदल झाला. असा बदल घडण्यासाठी बाबांनी अनेक कार्यक्रम राबविले. मित्रमेळा हा त्यातील एक उपक्रम. हिवाळ्यामध्ये ठराविक कालावधीत हा 'मित्रमेळा' व्हायचा. याचे निमंत्रण कोणालाही वेगळे पाठविले जायचे नाही परंतु अनेकजण आवर्जून यायचे. पु.ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे, भीमसेन जोशी असे अनेक दिग्गज या मेळ्याला यायचे. एक अनौपचारिक पण स्मरणात राहील असा कार्यक्रम दर वर्षी व्हायचा. वनफेरी व्हायची, वृक्षदिंडी निघायची. खूप मजा होती.

जशी बाबा आमटे यांच्या घरची तिसरी पिढी या कामात समरस झालेली आहे तशी रुग्ण म्हणून आलेल्या आणि नंतर कार्यकर्ते म्हणून काम करणाऱ्या अनेकांचीही पुढची पिढी आनंदवनाच्या

कामात सक्रीय आहे. बाबांनी केवळ कुष्ठरुग्णांसाठीच काम केले असे नाही तर अंध, अपंग, मुके–बहिरे, मतिमंद अशा सर्वांना या आनंदवनात सहभागी करून घेतले. त्यांचे 'संधीनिकेतन' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

बाबा आणि साधनाताई दोघांच्या स्वभावाची काही खास वैशिष्ट्ये आम्हाला मिळालेल्या त्यांच्या या सहवासामुळे अनुभवता आली. बाबांची स्मरणशक्ती दांडगी होती. एकदा परिचय झाला की बाबा त्या व्यक्तीला नावाने हाक मारायचे. आनंदवन पाहायला अनेकजण आपल्या वाहनातून यायचे, बाबांचा पाहुणचार अनुभवायचे. अशा अतिथींच्या गाडीवरील चालकाला न विसरता बाबा खाणंपिणं विचारायचे, किमान दहीसाखर तरी स्वत:च्या हाताने द्यायचे. साधनाताई तर येणाऱ्या प्रत्येकाला खाणंपिणं झाल्याशिवाय कधी जाऊच देणार नाहीत आणि स्वत: जेवण बनवून खाऊ घालणार.

आनंदवनात आज सर्व काही आहे. बाबांच्या कुटुंबाने त्यांच्या कुटुंबापुरता स्वयंपाक करून खाणे तर सहज करता येणारी गोष्ट आहे, परंतु आनंदवनाच्या पहिल्या दिवसापासून आनंदवनातील सर्वांसाठी जे जेवण बनते तेच जेवण बाबा आणि त्यांचे कुटुंबीय जेवतात. साधनाताईंच्या कामातील योगदानाचे मोल बाबांनी कायम प्रकट केले. कोठेही सभेमध्ये, कार्यक्रमात बोलताना त्या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सन्माननीयांच्या नावांचा उल्लेख करण्यापूर्वी बाबा नेहमी साधनाताईंचा आदराने उल्लेख करायचे. भारतरत्न ही सर्वोच्च पदवी स्वीकारतानाही बाबांनी ही अट कायम ठेवली होती आणि राष्ट्रपतींशी संबंधित प्रचलित प्रथा बाजूला ठेवून त्यांना ही अनुमती देण्यात आली होती. बाबांची ही गोष्ट खूप काही सांगून जाते.

### आणि शोक आवरेना

मुलाखत चालू असताना गप्पांच्या ओघात विषय वेले दांपत्यांचा बाबा आमटे आणि त्यांच्या कुटुंबियांशी असलेल्या स्नेहपूर्ण नात्यासंबंधी आला आणि श्री. दामोदर वेले सांगायला लागले की, दोन वर्षांपूर्वी ते स्वत: खूप आजारी होते. रुग्णालयात अत्यवस्थ होते. त्यावेळी श्री. विकास आमटे यांनी वेले यांच्या मुलाला फोन करून त्यांच्या तब्येतीविषयी चौकशी केली आणि ते मुलाला म्हणाले की बाबांना दामूकाकांशी बोलायचे आहे. पण त्यावेळेस मी बोलू शकण्याच्या स्थितीत नव्हतो. जेव्हा दोन–तीन दिवसांनी तब्येतीमध्ये सुधारणा झाली तेव्हा बाबांचा पुन्हा फोन आला. फोन हातात धरण्याइतकेही माझ्या अंगात त्राण नव्हते. मुलाने फोन धरला आणि मी बाबांशी बोललो. बाबा मला म्हणले, 'दामू! तुला ठणठणीत बरे होऊन पुन्हा कामाला उभे राहिलेले मला पाहायचे आहे' हे बाबांचे वाक्य श्री. वेले यांनी कसेबसे पूर्ण केले आणि बाबांच्या आठवणींनी त्यांचा गळा दाटून आला आणि नकळत डोळ्यांतून अश्रूंनी वाट मोकळी केली.

तुका म्हणे वाणी । शुद्ध जनार्दन जनीं ।

# अढी सोडा, गुढी उभारा!

*(गुढीपाडव्याच्या दिवशी वर्षारंभ उपासनेनंतर उपस्थित वर्धक-वर्धिका कार्यकर्त्यांच्या समोर ज्ञानप्रबोधिनीचे कार्यवाह श्री. सुभाषराव देशपांडे यांचे प्रबोधन सत्र झाले. या वेळी त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांवर आधारित लेख येथे देत आहोत.)*

जे जे हीण आहे ते होळीमध्ये विसर्जित झाले आहे. सृष्टीचक्र चालू आहे. आज वर्षप्रतिपदा आहे. आपल्या प्रतिकांना अर्थ आहे. आज गुढी-ध्वज उभारतो. भगवा ध्वज हा आपल्या सांस्कृतिक जीवनाचं, अभिमानाचं, विजयाचं प्रतिक आहे. जीव ओवाळून टाकावा अशी ही प्रतिके आहेत. आपल्याला प्रेरणा देणारी ही प्रतिके आहेत.

आज आपल्या उपासनेत विरजा मंत्र म्हटला. शुचिर्भूत व्यक्तिमत्त्व व्हावे असा मंत्र म्हटला. एकूण चार पातळ्यांवर विचार करावा. व्यक्तिगत आयुष्याची, संस्थात्मक, संघटनात्मक आणि राष्ट्रीय जीवनाची पातळी अशा या चार पातळ्या आहेत.

व्यक्तिगत पातळीत विचार करताना लक्षात येते की, व्यक्तीच्या ठिकाणी सूक्ष्म अहंकार जागा होतो आणि आपण केलेल्या चांगल्या कामाची दखल घेतली जात नाही अशा विचारांनी आपण अस्वस्थ होतो. आध्यात्मिक वृत्ती बाणवणे अशा वेळी आवश्यक असते. मी जे जे केले ते माझ्यातल्या स्फुरणाने घडवून आणले. त्यामुळे केलेल्या कामाची पावतीची गरज नाही. 'इदं न मम' भावनेने मी कोणतेही काम केले पाहिजे ही धारणा आवश्यक आहे.

संस्थात्मक पातळीवर काम करताना त्या कामाच्या चौकटीत राहून काम केले पाहिजे. ही कामे करताना आवश्यक अशी काही पथ्ये पाळायला हवीत. ही कामेही आनंदाने करवी. त्यातली औपचारिकता सांभाळून काम करावे लागते. या कामात कार्यक्षमता आणणे आवश्यक आहे. व्यक्ती व संस्था दोन्हीही प्रगत होणे महत्त्वाचे.

संघटनात्मक पातळीवर संघटनेचे जीवन विचार व भावना यांनी गुंफलेले असते. कार्य करणाऱ्यांनी संघटनेच्या पातळीवर प्रेरणांची सहअनुभूती घेणे व प्रगती करत जाणे हे महत्त्वाचे. शेवटी प्रत्येक व्यक्तीला त्या त्या व्यक्तीचे आग्रह चिकटलेले असतात. व्यक्ती तितक्या प्रकृती हेही खरे असते. पण ध्येयनिष्ठेच्या आकलनातून, ध्येयावर असलेल्या निष्ठेतून हे सर्व प्रश्न सुटू शकतात. यासाठी त्यागाची आणि कार्यक्षमतेची परमावधी आवश्यक असते.

आपण परस्परावलंबी आहोत, आपल्यात समत्त्व आहे आणि आपण एकरूप आहोत याची जाणीव राष्ट्रीय पातळीवर आवश्यक आहे. माझी प्रगती होत असताना इतरांचीही प्रगती झाली पाहिजे. आर्थिक विषमताही दूर करण्यासाठी झटले पाहिजे.

'इदं न मम' अशा जाणिवेने भारलेली व्यक्ती, कार्यक्षम संस्था, परस्पर सहकार्यातून उभी असलेली संघटना आणि एकत्वाची जाण असलेले राष्ट्रीय जीवन असा विचार व्हावा.

नुसते बोलून भागणार नाही. बोलण्याचा परिणाम फक्त १०% असतो. आचरणाचा परिणाम मात्र ९०% असतो. 'अढी सोडा गुढी उभारा' हाच या सणाचा संदेश आहे.

> उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ।
> वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ।।

(अभ्यासदौरा क्र.६)

# मिशन काश्मिर...

*(जम्मू काश्मिरमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून संघप्रेरित सेवाभारती ही स्वयंसेवी संस्था शिक्षण क्षेत्रात काम करीत आहे. कडमाल या गावी एक वसतीगृह या संस्थेमार्फत चालविले जाते. अतिरेक्यांच्या हल्ल्यांना बळी पडलेल्या कुटुंबातील अनाथ मुलांचा तसेच अन्य मुलांचा सांभाळ या केंद्रामार्फत केला जातो. या केंद्राच्या कामाला थोडा हातभार लावावा व सिंधू दर्शन कार्यक्रमात सहभागी व्हावे या हेतूने श्री. प्रसाद गाडे आणि अनिरुद्ध गायकवाड हे वर्धिनीचे दोन युवक कार्यकर्ते एक महिनाभर काश्मिर मोहिमेवर गेले होते. त्यांच्या मुक्कामातील अनुभव, त्यांच्याच शब्दांत...)*

महाराष्ट्राबाहेर असा आमचा हा पहिलाच प्रवास होता त्यामुळे पुण्यातून निघून जम्मूला पोहोचेपर्यंत मनामध्ये प्रचंड उत्कंठा होती. जम्मूला सेवाभारती संस्थेच्या कार्यालयात तेथील ज्येष्ठ प्रचारक श्री. जयदेवसिंगजी ऊर्फ दादाजी यांनी आम्हाला जम्मूत चालणाऱ्या कामांची माहिती सांगितली. आम्ही काय काम करायचे आहे याची कल्पना दिली आणि त्यासाठी कडमाल येथे चालणाऱ्या वसतीगृहावर घेऊन गेले.

**स्थानिक समितीची स्थापना**

या वसतीगृहामध्ये २० विद्यार्थी आहेत. आतंकवादी पीडित, भूकंप पीडित, अनाथ अशी वेगवेगळी पार्श्वभूमी असलेली मुले या वसतीगृहामध्ये राहतात.

कडमाल गावातील लोकांची या वसतीगृहासाठी एक स्थानिक समिती उभी करण्याचे काम आमच्यावर सोपवले गेले. संपूर्ण अपरिचित अशा या गावात फिरून तेथील लोकांना वसतीगृहाच्या कामासंबंधी काय वाटते आहे याचा अंदाज घेत त्यातून वसतीगृहासाठी योग्य माणसे शोधण्याची आमची मोहीम सुरू झाली. खूप वेळ लागत होता पण काम करताना मजा आली आणि अखेर एक स्थानिक समिती स्थापन करण्यात आम्हाला यश मिळाले. या लोकांनी वसतीगृहाचे पालकत्व घ्यावे आणि स्थानिक मदतीवरच वसतीगृह चालावे अशी या समितीकडून अपेक्षा आहे.



तुका म्हणे क्षमा सर्वांचे स्वहित । धरा अखंडित सुखरूप ।



जायचा तेव्हा त्याचे उत्तर असायचे की 'मी पण मोठेपणी वडिलांसारखा आतंकवादी होणार आणि पोलिसांना मारणार' वसतीगृहात राहण्यामुळे आपला देश, देशाचे खरे शत्रू कोण अशा विषयाबाबत त्याच्या कल्पना स्पष्ट होत गेल्या व आज तो म्हणतो की 'मोठा झाल्यावर मी पोलिसात भरती होणार आणि सीमेपलिकडून येणाऱ्या आतंकवाद्यांना रोखणार.'

याच वसतीगृहात 'तोफिल' नवाचा दहा वर्षांचा मुलगा आहे. त्याच्याशी गप्पा मारताना त्यालाही जेव्हा विचारले मोठेपणे तू कोण होणार? तर तो ही सहजपणे म्हणाला की, 'मी आतंकवादी होणार.' तू आतंकवादी का होणार असे विचारल्यावर तो चटकन म्हणाला 'कारण मी मुस्लीम आहे.'

त्याचे हे उत्तर ऐकून आम्ही अस्वस्थ झालो. त्याला कसे समजाऊन सांगावे हे आम्हाला लक्षात येईना. पण वर्धिनीच्या कामातील अनुभवांचा आधार घेत त्याचा गैरसमज दूर करण्याचा आम्ही प्रयत्न केला आणि त्याला त्याने प्रतिसादही छान दिला.

फुटिरतावादी शक्ती आणि स्वार्थी राजकारणी मुस्लीम समाजात कसा विचार पेरतात याची ही दोन बोलकी उदाहरणे. काश्मीर या देशापासून तोडण्यासाठी चाललेल्या देशघातकी प्रयत्नांची दाहकता या निमित्ताने आम्हाला जाणवली आणि देश सुरक्षित राहण्यासाठी सर्वांनीच किती काम करायला हवे आहे हे लक्षात आले.

**जो शहीद हुए है उनकी जरा याद करो कुर्बानी!**

### मुष्टीधान्य योजना

स्थानिक समिती उभी करण्याच्या निमित्ताने आणखीन एक काम करता आले. कडमालमध्ये फिरताना महिलांचाही सहभाग या कामासाठी मिळेल असे वाटल्याने २-३ महिलांच्या मदतीने सुमारे पंचवीस स्थानिक महिलांची एक बैठक बोलावली. वसतीगृहामार्फत चालणाऱ्या कामाची त्यांना थोडी कल्पना होती पण आपल्याला काही मदत करता येईल याविषयी त्यांना विश्वास नव्हता. मुष्टीधान्य योजना त्यांच्यासमोर ठेवल्यावर सर्वांचे चेहरे उत्साही दिसले. 'अशी मदत करणे आम्हाला शक्य आहे,' असा प्रतिसादही मिळाला. अशा मदतीमुळे वसतीगृहाची धान्याची गरज काही प्रमाणात तरी भागेल हे समजल्यावर सर्वांनी त्यात सहभाग घेण्याचे मान्य केले.

### मी 'आतंकवादी' होणार

या वसतीगृहामध्ये राहणारा वसीम हा १३-१४वर्षांचा मुलगा. याचे वडिल अतिरेकी होते आणि पोलीस कारवाईत मारले गेले. हा अनाथ मुलगा या वसतीगृहात गेल्या ३-४ वर्षांपासून आहे. तू मोठेपणी कोण होणार असा प्रश्न लहान मुलांना नेहमीच विचारला जातो. वसीमला जेव्हा असा प्रश्न विचारला

आडले जाकसले जाणावे । यथानशक्ति कामास यावे ।
मृदुवचने बोलत जावे । कोणी येकासी ।।

गेल्या काही वर्षांपासून सिंधू दर्शनाचा एक मोठा कार्यक्रम लेह–लद्दाख येथे संपन्न होतो. जम्मुपासून लेह–लद्दाख येथे पोहोचण्यासाठी तीन दिवस लागतात. देशभरातून या कार्यक्रमासाठी जम्मुमध्ये पोहचलेल्यांना तेथे घेऊन जाण्याची जबाबदारी सेवाभारतीकडे होती. एकूण सात बस भरून पर्यटक आले होते. या पैकी तीन गाड्यांमधील प्रवाशांची जबाबदारी आम्हा दोघांवर सोपवली होती. प्रवासामध्ये रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या उत्तूंग पर्वतराजीकडे पाहत राहिल्यामुळे वेळ किती गेला आणि अंतर किती कापले गेले याचा अंदाजच आला नाही. गाडीच्या चालकाने जेव्हा सांगितले की समोर दिसते आहे ती 'कारगिल टेकडी' तेव्हा आम्ही भानावर आलो. त्याने 'कारगिल' असा शब्द उच्चारताच कारगिल युद्धाचे दिवस आठवले आणि आठवण झाली कारगिल युद्धातील 'कर्नल ललित राय' या पराक्रमी अधिकऱ्याची. वर्धिनीच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांचे कारगिल युद्धावरचे एक प्रेरणादायी व्याख्यान झाले होते. गाडीच्या चालकाने सांगितले, की कारगिल युद्धात शहीद झालेल्यांचे एक स्मारक त्या टेकडीच्या पायथ्याशी आहे. आमच्या तीनही गाड्या आम्ही त्या स्मारकापाशी थांबवल्या. सर्वजणांनी या शहीद स्मारकाचे दर्शन घेतले. शहीद झालेल्या सैनिकांची, अधिकाऱ्यांची नावे स्मृतीभिंतीवर कोरली आहेत. ती नावे वाचताना मनात विचार आला की या सर्वांच्या बलिदानामुळे आपण सुरक्षित जीवन जगतो. मग त्यांना आदरांजली तरी वाहायला नको का? आम्ही सर्व प्रवाशांना त्या स्मारकापाशी गोळा केले. पाच मिनिटे मनोगत व्यक्त केले. आणि 'ऐ मेरे वतनके लोगो' हे गीत सादर केले. गीत म्हणताना आमच्या डोळ्यातून नकळत अश्रू ओघळत होते तर ते भावनेला हात घालणारे गीत ऐकून उपस्थित अनेकांना रडूच कोसळले. त्या परिसरात गस्त घालणारे जवानही तेथे जमले होते त्यांनाही या उत्स्फूर्त कार्यक्रमाने खूप छान वाटले. त्यांच्यातील मराठी भाषिक जवान मुद्दाम येऊन भेटले. त्यांच्याशी गप्पा मारल्यावर आम्हाला अभिमान वाटला.

**सिंधू दर्शन कार्यक्रम -**

आपल्या देशाच्या इतिहासात सिंधू नदीचे खूप महत्त्वाचे स्थान आहे. या नदीचे दर्शन घ्यायला देशभरातून लोक यावेत व या निमित्ताने लेह–लद्दाखसारख्या प्रदेशातील आपल्याच बांधवांशी त्यांचे नाते दृढ व्हावे अशा अनेक कारणांनी हा कार्यक्रम सुरू झाला. या निमित्ताने स्थानिक कलाकारांच्या कला



ऊंस बाहेर दिसे काळा । आत रसाचा आगळा ।
तुका म्हणे मोल गोडी । काय चाड वरिल्या खोडी ।।

तर सादर होतातच पण एकात्मतेला पूरक अशा अनेक गोष्टी घडतात. आम्हालाही उत्साहाने भारलेल्या या कार्यक्रमात सहभागी होता आले याचा खूप आनंद झाला. लेहलद्दाख मधील लोकांचे एक दुःख आहे ते म्हणजे त्यांच्या चेहऱ्याची ठेवण ही थोडी वेगळी आहे आणि त्यामुळे जेव्हा आपल्याच देशातील लोकांकडून 'आप किस देशसे आए' अशा प्रकारचे वाक्य ऐकायला मिळते तेव्हा त्यांना खूप खूप वाईट वाटते. सिंधू दर्शन कार्यक्रमामुळे मात्र निश्चितपणे हळू हळू संवाद वाढायला लागला आहे आणि त्यातून आवश्यक ते बदल होतील असा विश्वास वाटतो.

**भारतकी करन्सी चाहिए**
**मगर राज चाहिए पाकिस्तानका !**

सिंधू दर्शन कार्यक्रमातून परतताना फुटिरतावादी शक्तीचे पुनः एकदा दर्शन घडले. अमरनाथ यात्रेकरूंच्या सोयीसाठी काही जमीन उपलब्ध करून देण्याचा जो निर्णय जम्मु-काश्मिर शासनाने घेतला त्यावर फुटिरतावादी शक्तींची प्रचंड प्रतिक्रिया उमटली. रस्त्यावर उतरलेल्या या फुटीरतावाद्यांनी पर्यटकांच्या गाड्या आडवल्या, गाड्यांच्या काचा फोडल्या आणि अनेक प्रक्षोभक घोषणा दिल्या. त्यातील एक घोषणा होती 'भारतकी करन्सी चाहिए मगर राज चाहिए पाकिस्तानका' ही घोषणा बरंच काही सांगून जाते. फुटिरतेची बीजं अशीच जर रुजत राहिली तर काश्मिर खरंच भारताचा राहील का? असा विचार मनाला अस्वस्थ करून गेला. काम करण्याची प्रेरणा जागविणारे अनुभव घेत आणि त्याचवेळी देशाच्या सुरक्षेला आव्हान देणारे प्रसंग अनुभवत आम्ही पुण्याकडे मार्गस्थ झालो.

●●●

## आयडॉल!

राहील तांबोळी हा वर्धिनीचा युवक कार्यकर्ता. गरवारे वाणिज्य महाविद्यालयात तो शिकतो. त्याच्या गटाची आंतरमहाविद्यालयीन बिझिनेस फेअर स्पर्धेसाठी निवड झाली. जवळपास २० महाविद्यालयाचे संघ यामध्ये सहभागी झाले होते. अनेक महाविद्यालयीन गटांनी चित्रपट नट-नट्यांचे मोठी-मोठी पोस्टर्स विक्रीसाठी ठेवली होती. पहिल्या दिवशी हे पाहिल्यावर राहील व त्याच्या मित्रांनी छत्रपती शिवाजी. महाराणा प्रताप, नेताजी सुभाषचंद्र बोस अशा अनेक महापुरुषांची रंगीत छायाचित्रे तसेच नित्य उपयोगी आयुर्वेदिक औषधे यांची विक्री केली. त्यांच्या गटाचा दुसरा क्रमांक आला. या विक्रीतून मिळालेल्या नफ्याचा उपयोग एका गरजू विद्यार्थ्यांसाठी करायचा असे राहील व त्याच्या मित्रांनी ठरविले आहे.

या निमित्ताने अनेक गमतीचे अनुभव आले. एका युवतीने नेताजी सुभाषचंद्रांचे चित्र पाहून विचारले हे कोण आहेत. हे नेताजी सुभाषचंद्रांचे चित्र आहे असे सांगितल्यावर लहानपणी हे नाव मी गोष्टीतून ऐकलं आहे असं ती युवती म्हणाली. ही तिची प्रतिक्रिया ऐकल्यावर विक्री करणाऱ्या गटातील सर्वांना धक्काच बसला. चित्रपटातील नट-नट्या 'आयडॉल' बनल्याने ही स्थिती आली आहे आणि हे चित्र बदलायचे असेल तर खरे आयडॉल मुलांसमोर सतत येणे किती आवश्यक आहे हे जाणवले.

दुसऱ्याच्या दुःखें दुखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ।।
प्राणीमात्रांस मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ।।

(अभ्यासदौरा क्र.७)

# सीमेची कथा अन व्यथा

## पूर्वांचल अभ्यास दौरा

*(अभ्यासदौऱ्यांच्या माध्यमातून समाजा पुढील / देशापुढील वेगवेगळ्या प्रश्नांचा अभ्यास वर्धिनीचे कार्यकर्ते करीत असतात. १८ ते २८ डिसेंबर या कालावधीत युवकांच्या एका गटाने बांगलादेशाशी जोडल्या जाणाऱ्या भारतीय सीमेची स्थिती प्रत्यक्ष पाहण्याचे ठरवून हा दौरा आखला. या निमित्ताने प्रत्यक्ष सीमेची स्थिती, सीमेलगतच्या गावांमधील प्रश्न याचे दर्शन त्यांना घडले. या दौऱ्याचा वृत्तांत त्यांच्याच शब्दात)*

सध्या भारतासमोर एक मोठी समस्या आहे. ती म्हणजे पूर्वांचलात वाढत चाललेली घुसखोरीची समस्या. समस्येचे अध्ययन करण्यासाठी आम्ही हा अभ्यास दौरा आखला होता. यात जे जे अनुभवायला मिळाले त्याची ही कथा.

आम्ही एकूण १३ जण या दौऱ्यासाठी १४ डिसेंबर २००८ रोजी पुण्याहून निघालो आणि १७ डिसेंबर सकाळी किशनगंजला पोचलो. या प्रवासात अनेक राज्यातील मुलांशी आमच्या भेटीगाठी झाल्या. बांगला देशातून होणाऱ्या घुसखोरीच्या समस्येकडे देशाचे लक्ष वेधण्यासाठी अ.भा.विद्यार्थी परिषद या संघटनेने किशनगंज येथे तरूणांचा एक मोर्चा आयोजित केला होता. या समस्येचा थोडा अभ्यास करावा आणि ज्या भागात या समस्येचे परिणाम स्पष्ट दिसत आहेत तेथे जाण्याचे ठरवून आम्हीही या मोर्चात सहभागी झालो. 'बांग्लादेश घुसपैठी हटाओ' आंदोलनात वेगवेगळ्या राज्यांमधून आलेले ५०००० तरूण सहभागी झाले होते. या प्रसंगी घुसखोरीच्या समस्येवर व्याख्यानेही झाली. त्यामुळे या समस्येची तीव्रता काही प्रमाणात आम्हाला समजू शकली. या एवढ्या मोठ्या आणि देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीन महत्वाच्या असलेल्या कार्यक्रमाची प्रसारमाध्यमांनी दखल घेतली नाही याचे खूप वाईटही वाटले आणि आश्चर्यही.

त्यानंतर १८ तारखेला आम्ही गुवाहटी येथे पोहचलो आणि तेथून आमचा खरा प्रवास सुरू झाला. बांग्लादेशी घुसखोरांनी पहिला हल्ला जेथे केला त्या 'उदालगुडी' या गावी आम्ही १९ ला पोहचलो. तेथे गेल्यावर ज्याची मनात कल्पनाही आपण करू शकत नाही अशी मन हेलावून टाकणारी दृश्ये आम्ही तेथे पाहिली. घुसखोरांनी प्रथम घराघरातील धान्य आणि अन्य वस्तू चोरल्या. नंतर त्या घरांना आगी लावण्यात आल्या. एकूण ५२३ घरे पेटवण्यात आली. आम्ही उदालगुडीच्या पुनर्वसन शिबिराला भेट दिली.



तुका म्हणे विठो भरला सबाह्य । उणे काय आहे चराचरीं ।।



ओळखपत्र मिळाले नाही' ही त्यांची व्यथा ऐकून धक्काच बसला.

२१ तारखेला आम्ही होजाई येथे जाऊन श्री. उमाशंकरजी यांची भेट घेतली त्यांच्या सोबत आम्ही श्री. कृष्णाजींच्या गावी गेलो. या गावात जवळपास १५० ते २०० हत्ती झुंडीने येतात आणि शेतीचे नुकसान करतात.



पहिलीच भेट एका १२ वर्षांच्या मुलाची झाली. त्याच्या दोन्ही पायातून गोळी आरपार गेली होती. एका बोडो जमातीच्या तरूणाची घुसखोरांनी बोटे कापली आणि त्याच्या डोक्यावर वार केले. या तरूणाने तो प्रसंग सांगितला तेव्हा तळपायाची आग मस्तकात गेली.

२० तारखेला आम्ही काझियामाटी पुनर्वसन शिबिराला भेट दिली. घुसखोरांनी केलेल्या हल्यामुळे बेघर झालेल्या नागरिकांच्या भेटी घेतल्या. 'पाकिस्तान जिंदाबाद' अशा घोषणा देत घुसखोरांनी जेथे पाकिस्तानी झेंडा रोवला त्या मोहनपूर या गावीही आम्ही गेलो. तेथील पुनवर्सन शिबिरातील लोकांच्या भेटी घेतल्या, त्यांच्या व्यथा समजून घेतल्या. 'घुसखोरांना मतदार ओळखपत्र सहजपणे मिळते पण भारताचे नागरिक असूनही आम्हाला मात्र मतदार

नेमकपण वर्तो लागला । तो बहुतास कळों आला ।
सर्व आर्जवी तयाला । काय उणें ।।

हत्तींच्या घुसखोरीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी गावकरांनी विद्युत प्रवाह सोडलेल्या तारांचे कुंपण गावाभोवती लावले आहे. ते पाहिल्यावर बांग्लादेशातून घुसखोरी करणाऱ्यांना रोखण्यासाठी मात्र कुंपण नाही याचे आश्चर्य वाटले. आम्ही कार्बी लोकांशी चर्चा केली. त्यांनी आम्हाला सांगितले की राजकारणी लोकांच्या मदतीने बांग्लादेशी घुसखोर हळुहळु जमिनी विकत घेतात किंवा बळजबरीने कब्जा करतात आणि आपली वस्ती तयार करतात.

२२ तारखेला सकाळी बारकोना (माणकचार) येथे पोहोचलो. तीन गटांमध्ये तीन ठिकाणी राहिलो. आमचा गट ज्यांच्या घरी मुक्कामाला होता त्यांचे नाव होते 'कोच'. आम्ही त्यांच्या घरी रात्री १०.३० पोहचलो. पूर्वांचलात दुपारी चार-साडेचारलाच सूर्यास्त होत असल्याने रात्री साडेदहा ही खूप उशिराची वेळ पण हे कुटूंब आमची वाट पाहत होते. आम्ही तेथे गेल्यावर त्यांनी आमच्यासाठी ताजा स्वैपाक केला. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून आम्ही भारावून गेलो.

२३ तारखेला सकाळी विद्याभारती संस्थेच्या श्री. शंकरजी यांचेबरोबर माणकचार येथील भारताच्या सीमेवर पोहोचलो. आम्हाला असे दिसले की या सीमेवर कुंपणच नाही. गावालगतच्या या संपूर्ण सीमेवर फिरताना आम्हाला फक्त एकच सुरक्षा सैनिक भेटला. सीमेवरून सहजपणाने लोकांची ये-जा चालू होती पण त्यांना ना अडवायला कोणी होते ना त्यांची चौकशी करायला. या गावातील लोकांशी चर्चा करून या घुसखोरी समस्येविषयीची त्यांची मते जाणून घेतली.

२४ तारखेचा फुलवारी ते दुभडी हा प्रवास आम्ही बोटीने केला. या प्रवासात आम्हाला असं दिसलं की या जलमार्गाने मालाची ये-जा विना अडथळा चालू आहे आणि बांग्लादेशाशी जोडलेल्या या सीमावर्ती गावात कोणताही चेक पॉईंट नाही.

बांग्लासीमेवर खूप मोठ्या प्रमाणावर गाईंची तस्करी होते असे आम्ही ऐकले होते. ती ज्या ठिकाणाहून होते ते ठिकाण पाहायला आम्ही गेलो. तेथे जाताना एका व्यक्तीने आम्हाला अडविले आणि आम्ही कुठे चाललो आहोत असे दटावून विचारले. आम्हीही त्याला काही प्रश्न विचारले पण त्याने उत्तरे दिलीच नाही. आम्ही टुरिस्ट आहोत असे आम्ही उत्तर दिले त्यावर 'पुढे कुठलाच पिकनिक पॉईंट नाही; येथूनच माघारी फिरा' असे त्याने दरडावून सांगितले. तो पर्यंत आमच्या भोवती बरीच माणसं जमा झाली होती. दरडावणाऱ्या आणि भोवतीच्या माणसांकडे पाहिल्यावर, आम्हाला पुढे जाऊ देण्यास त्यांचा असलेला विरोध पाहता हे सर्वजण घुसखोर असावेत अशी आम्हांला शंका आली. नाईलाजाने आम्हाला माघारी फिरावे लागले. आपल्याच देशात फिरायला आपल्यालाच अडविले जाते याचे मात्र दुःख झाले.

त्यानंतर आम्ही पैखण येथील सैनिकांशी भरपूर गप्पा मारल्या व त्यांना या घुसखोरी बद्दल विचारले. त्यांनी आम्हाला सांगितले की या संदर्भात काही समस्या निर्माण झाली तर पहिल्यांदा स्थानिक पोलिस व नंतर बी. एस. एफ. त्यामध्ये लक्ष घालते. त्यानंतरही आवश्यकता भासली तर सैन्याची मदत

तुका म्हणे माझा सखा पांडुरंग । व्यापियलें जग तेणें येक ॥

घेतली जाते. वरून हुकूम मिळाल्याशिवाय आम्हाला कोणतीच कारवाई करता येत नाही.

अशा प्रकारे आपल्या देशाच्या एका भागातील सीमेची व्यथा जवळून पाहून अत्यंत व्यथित अंत:करणाने आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. एका सुखद घटनेने मात्र मनात आशाही फुलवली. बोडो आणि संथाल अशा जमातींमध्ये भांडणे लावून घुसखोरी करणाऱ्या, जमिनी बळकवणाऱ्या, मुली व महिलांना पळविणाऱ्या घुसखोरांविरूद्ध या दोन्ही जमातीच्या लोकांनी एकत्र येऊन लढा दिला आणि एकीचा दणका दाखविला. या दणक्याने घुसखोर पाय लावून पळाले. **या घटनेच्या पार्श्वभूमीवर आपापली जात/जमात विसरून 'आम्ही भारतीय आहोत' ही एकीची भावना जागृत करणे, रूजविणे हाच या समस्येवरचा खरा आणि टिकावू उपाय आहे असे वाटते.**

## मनाचे आरोग्य

शोध खूप लागले आहेत, लागत आहेत. एकीकडे माणसाचे आयुष्यमान वाढल्याचे दिसते पण त्याचवेळी माणसाच्या चिंताही तितक्याच वाढताना दिसत आहेत. पैसा, भौतिक साधनं पुरेशी नाहीत म्हणूनही समस्या आणि हे सारं काही असूनही समस्या असा विरोधाभास समाजात दिसतो. त्याचे कारण मनाच्या आरोग्याच्या स्थितीत आहे. समर्थ रामदास स्वामींनी मनाचे श्लोक रचून मनाचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी काय करावे, काय टाळावे याचे नेमके मार्गदर्शन केले आहे. समर्थ रामदास स्वामींच्या जन्मचतु:शताब्दीच्या निमित्ताने वर्धक, कार्यकर्ते व पालक या सर्वांसाठी रविवार दिनांक १६ मार्च रोजी एक व्याख्यान आयोजित केले होते. समर्थ व्यासपीठाचे कार्यकर्ते डॉ. राम साठे यांचे मनाचे आरोग्य या विषयसूत्रावर व्याख्यान झाले. मनाच्या श्लोकातील निवडक पाच श्लोकांचे विश्लेषण करीत माणसाच्या पाच कर्मेंद्रियांची कामे योग्य पद्धतीने झाली नाहीत तर बिघाड कसा सुरू होतो व समाजात तो कशा पद्धतीने प्रकट होताना दिसतो यावर वेगवेगळे दाखले देत त्यांनी मनाचे आरोग्य जपणे किती महत्त्वाचे आहे हे समजावून सांगितले.

*With Best Compliments From*

**DONATE GENEROUSLY FOR : VANAVASI WELFARE**

TO

**SHREE SUNDERNARAYAN**
**GAIMESH SANSKAR KENDRA**

**DEOBANDH TALUKA KHODALA, DIST. THANE**

- INSERTED BY -

**S. R. PUSALKAR & CO.**

MUMBAI

स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोसीत जावें ।
झिजोन कीर्तीस उरावें । नाना प्रकारें ।।



# समरसतेचे मार्गदर्शक
# समर्थ रामदास स्वामी आणि संत तुकाराम महाराज



## सुनील चिंचोलकर

*(समर्थ साहित्याचे गाढे अभ्यासक आणि प्रवचनकार. अनेक वर्षे सज्जनगडाचे व्यवस्थापक तसेच सज्जनगड मासिकाचे संपादक. २० वर्षांहून अधिक काळ नऊ हजाराहून अधिक प्रवचने. त्यांची एकूण ३२ पुस्तके प्रसिद्ध झाली असून त्यांच्या एकूण ११ पुस्तकांचा अन्य भाषांमध्ये अनुवाद प्रसिद्ध झालेला आहे. श्री. चिंचोलकर यांच्या 'चिंता करितो विश्वाची' या पुस्तकाला पुणे विद्यापीठाचा पुरस्कार मिळाला आहे, तसेच 'पत्रातून व्यक्त झालेले विवेकानंद' आणि 'समर्थ रामदास व स्वामी विवेकानंद' ही दोन पुस्तके महाराष्ट्र शासनाने अवांतर वाचनासाठी पुरस्कृत केली आहेत.)*

हिंदू धर्मामध्ये वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्था जी निर्माण झाली त्यामागे अर्थार्जनाची पद्धती हा निकष होता. विविध वर्ण आणि जाती या समाजातील अर्थसंस्था होत्या. त्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद नव्हता. मनुष्य गुणांच्या सहाय्याने एका वर्णातून दुसऱ्या वर्णात समाविष्ट होऊ शके, तसेच एका वर्णातील व्यक्तीचे दुसऱ्या वर्णातील व्यक्तीशी असलेले संबंध हे समतेचे होते. शबरीसारख्या भिल्लीणीची उष्टी बोरे प्रभू रामचंद्रांनी प्रेमाने स्वीकारली किंवा महाभारत काळात सत्यकाम जाबालीसारखा वारांगनापुत्र गुरुकुलात वैदिक शिक्षण घेऊ शकला अशी अनेक उदाहरणे या संदर्भात देता येतील. काही मूठभर लोक जातीव्यवस्थेसंबंधी संकुचित विचारांचे होते पण त्यांच्या या विचारांना शास्त्रांची मान्यता नव्हती. महाराष्ट्रात तर सर्वच संतांनी समतेचा पुरस्कार केला. भगवद्‌गीतेमध्ये श्री भगवंतांनी योगाची व्याख्या 'समत्वम् योग उच्चते' अशी केली आहे.

संतांनी समरसता सांगितली त्यामागे कोणतेही व्यावहारिक धोरण नव्हते. सर्वत्र तोच परमात्मा नटला आहे ही त्यांची प्रत्यक्ष अनुभूती होती. त्यांच्या अंत:करणात विषमता नव्हती. इंग्रजांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेला जातीयवादाचे आणि वर्णव्यवस्थेला वर्णविद्वेषाचे रूप दिले. मूठभर संकीर्ण मनोवृत्तीच्या तथाकथित धर्माचार्यांची शिक्षा बिटिशांनी मात्र हेतूत: संपूर्ण ऋषीपरंपरेलाच दिली. इंग्रज या देशात तोडफोड करण्यासाठीच आले होते आणि त्यामुळे संधी मिळेल त्या ठिकाणी समाजरचनेत त्यांनी तोडफोड केली. संत ज्ञानेश्वरांपासून स्वामी विवेकानंदांपर्यंत सर्व संतांनी सामाजिक समरसता प्रस्थापित केली. समाजामध्ये एकी राहू नये अशीच ब्रिटिशांची नीती होती. ब्रिटीश गेल्यानंतरही आपल्या समाजात काही लोक अशा नीतीचे बळी पडलेले दिसतात. श्रीमद् दासबोधात समर्थ म्हणतात-

> **बरे बोलतां सुख वाटतें । हें तो प्रत्यक्ष कळतें ।**
> **आत्मवत् परावें तें । मानीत जावे ।।**

ब्राह्मणाचे ब्रह्म ते सोवळे ।
आणि शूद्राचे ब्रह्म ते ओवळे ।
ऐसे आगळे वेगळे । तेथे तेथे असेचिना ।
उंच ब्रह्म रायासी । नीच ब्रह्म परिवारासी ।
ऐसा भेद तयापासी । मुळीच नाही ।
नारायण असे विश्वी ।
त्याची पूजा करीत जावी ।
या कारणे तोषवावी ।
कोणीतरी काया ।।

'ब्राह्मण मंडळ्या मेळवाव्या' 'मराठा तितुका मेळवावा' अशा सारख्या ओव्या रचणाऱ्या समर्थांनी 'शहाणे करावे जन । पतित करावे पावन । किंवा 'शहाणे करून सोडावे, बहुत जन' अशा सुमारे ३६० ओव्यांमधून बहुजन समाजाचे समर्थन दासबोधात केले आहे. सामान्य माणसापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचावी म्हणून 'मुलाच्या चालीने चालावे' असा सल्ला समर्थांनी दिला आहे. 'मुलाच्या बोलीने बोलावे' म्हणूनच दासबोध आणि मनाचे श्लोक समर्थ एवढ्या सोप्या भाषेत लिहितात. भजनाची व्याख्या करताना समर्थ म्हणतात -

भेटो कोणी येक नर । धेड महार चांभार ।
त्याचे राखावे अंतर । या नाव भजन।

तर आणखी एका अभंगात ते म्हणतात-

अनाथांचा नाथ रे ।
त्याला कैसी जात रे ।
चोखा मेळ्या संगे ।
जेवी दही दूध भात रे ।।

'राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे' अशीच समर्थांची धारणा होती म्हणून ते म्हणतात-

जीव जीवात घालावा ।
आत्मा आत्म्यात मिसळावा ।
राह राहो शोध घ्यावा । परांतराचा ।।

समर्थांची ही समतेची भूमिका ही केवळ बोलण्यासाठीची नव्हती तर ती त्यांच्या आचरणात होती. लहानपणी विविध जातीतील मुलं समर्थांची मित्र होती. शिरवळ आणि पाली येथील मठांचे मठपती मराठा समाजातील होते. धोंडिबा धनगर, दत्तु न्हावी, म्हशा महार हे बहुजन समाजातील शिष्य त्यांचे खूप निकटवर्ती समजले जात होते. समर्थ बहुजन समाजातील शिष्यांना फार जवळ करतात याचा राग म्हणून काही कर्मठ ब्राह्मणांनी १६७ साली चाफळच्या रामनवमी उत्सवावरती बहिष्कार घातला होता. या रामनवमी उत्सवाला कोणी ब्राह्मण जेवायला आले नाहीत पण समर्थ डगमगले नाहीत. त्यांनी चाफळपासून १० मैलावर असलेल्या भोवरवाडी गावातील एक हजार हरिजन दांपत्यांना भोजनाचे आमंत्रण दिले. त्यांची पहिली पंगत बसवली, आलेल्या सर्व स्त्रियांना साडी व पुरुषांना धोतरं दिली. ज्यांनी हा प्रसंग पाहिला ते गिरिधर असे लिहितात की, 'गोसावी समस्त पुरुषांमध्ये रघुवीर पाहत्याती आणि समस्त स्त्रियांमध्ये जानकी पाहत्याती'. सांप्रदायिक कागदपत्रात 'एक हजार अस्पृश्य दांपत्यास भोजन करविले' अशी या घटनेची नोंद आहे. सर्वच संतांना आत्मज्ञान झाल्याने आपणच सर्वत्र नटलेले आहोत असा अनुभव आल्यामुळे त्यांच्या मनात कोणताही द्वैतभाव नव्हता. समर्थ या परंपरेतीलच संत असल्याने त्यांनी समरसतेचा हा मानदंड सांगितला.

आपणास चिमोटा घेतला । तेणे कासावीस जाला ।
आपणावरून दुसऱ्याला । राखत जावे ।।

संतशिरोमणी तुकाराम महाराज हे समर्थांना समकालीन होते. एवढेच नव्हे तर दोघांनी परस्परांची भेट घेऊन अभंगात परस्परांची स्तुती केली आहे. तुकाराम महाराज म्हणतात–

**विष्णुमय जन वैष्णवांचा धर्म ।**
**भेदाभेद भ्रम अमंगळ ।**
**कोणाही जीवाचा न घडो मत्सर।**
**वर्म सर्वश्वर पूजनाचे ।**
**तुका म्हणे एका देहाचे अवयव ।**
**सुखदु:ख जीव भोगे पावे ।।**

याचा अर्थ वर्णावरून समाजात भेद निर्माण करणे तुकाराम महाराजांना मान्य नव्हते. संत किंवा साधु यांचे लक्षण सांगताना तुकोबाराय म्हणतात –

**जे का रंजले गांजले ।**
**त्यासि म्हणे जो आपुले।**
**तोचि साधु वोळखावा ।**
**देव तेथेचि जाणावा ।**
**मृदु सबाह्य नवनीत ।**
**तैसे सज्जनांचे चित्त ।**
**ज्यासि अपंगिता नाही ।**
**त्यासी धरी जो हृदयी।**
**दया करणे जे पुत्रांसी ।**
**तेचि दासां आणि दासी ।**
**तुका म्हणे सांगू किती ।**
**त्याची भगवंताच्या मूर्ती।**

चिपळूण जवळ श्री क्षेत्र डेरवण येथे संत नामदेव, संत तुकाराम, समर्थ रामदास आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे एकत्रित मंदिर आहे. अशाच प्रकारचे एक मंदिर अमरावती जवळ रहाटगाव येथे असून या मंदिरात संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांच्या मूर्ती आहेत. या दोन्ही मंदिरांमध्ये होणाऱ्या उत्सवांना सर्व समाज एकत्र येतो आणि एकोप्याने उत्सव साजरे करतो.

समर्थ आणि तुकोबाराय ब्राह्मण कोणाला म्हणतात ते समजावून घेतले पाहिजे. समर्थ म्हणतात–

**करिती ब्रह्म निरुपण ।**
**जाणती ब्रह्म संपूर्ण ।**
**तेचि जाणावे ब्राह्मण। तत्त्वविद।**

आणि तुकोबाराय म्हणतात–

**ब्राह्मण तो याती अंत्यज असता।**
**मानावा तत्वतां निश्चयेसी।**
**रामकृष्ण नाम उच्चारी सरळ।**
**आठवी सावळे रूप मनी।**
**तुका म्हणे गेल्या षड् उर्मी।**
**अंग सांडुनिया मग ब्राह्मण तो ।।**

जी व्यक्ती माणसा–माणसांमध्ये भेद निर्माण करते त्याला धर्म नीट समजला नाही असेच समजावे. भगवद्गीतेपासून संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीते पर्यंत सर्वच संतांच्या गीतांतून, अभंगातून समरसतेचा सूर आपल्याला ऐकता येईल. संत साहित्यातील समरसतेचा हा सूर सर्व समाजाने समजावून अंगिकारला तर जाती विद्वेषासारखे सामाजिक अपराध या देशात कधीच घडणार नाहीत.

**आपुल्या पुरुषार्थ वैभवें । बहुतांस सुखी करावें ।**
**परंतु कष्टी करावे । हे राक्षसी क्रिया ।।**

# संतसाहित्यातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता

## विश्वास कुलकर्णी

फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य समता आणि बंधुता या जगाला देणग्या दिल्या आहेत असे आधुनिक इतिहास मानतो. पण त्या अगोदर कित्येक शतके आपल्या संतांनी ही बीजे आपल्या समाजात रोवली होती. समरसतेचा विचार करताना स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा एकत्रित विचार करावा लागेल.

प्रत्येक संताने स्वातंत्र्याचा पुरस्कारच केला आहे. कर्मकांडाचा प्रभाव असलेल्या काळातही आपला देव निवडण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला असावे असे सर्व संतांनी आवर्जून सांगितले आहे.

**'तस्मात विचार करावा ।**
**देव कोण तो वोळखावा ।**
**आपला आपण शोध घ्यावा ।**
**अंतर्यामी ।।**

**– समर्थ रामदास**

हे स्वातंत्र्य बहाल करतानाच व्यवहार व वागणुकीत समभाव असावा, उच्च नीचतेचा त्याला स्पर्शही असू नये, असा समता आणि बंधुतेच्या पलीकडे जाणारा विचार तुकोबांनी आपल्या अभंगातून लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला होता.

**'खेळ मांडियेला वाळवंटी ठाई ।**
**नाचती वैष्णव भाई रे' ।।**
**वर्ण अभिमान, विसरली याति ।**
**एकएकां लोटांगणी जाती ।।**

हा संसार सागर पार करावयाचा तर ही सर्वांत सोपी सुखाची पायवाट आणि म्हटले तर हाच सुखाचा राजमार्ग आहे. असेच तुकोबांनी स्पष्टपणे म्हणले आहे.

पंक्तीप्रपंच तुकोबांना आणि कोणाही संत सत्पुरुषाला अजिबात मान्य नव्हता. तुकोबा एका अभंगात म्हणतात –

**ज्याचिया बैसावे भोजनपंगती ।**
**त्याचिया संगती तैसे खावे ।।**

असा हा शुद्ध व्यवहारावर आधारलेला परमार्थ होता.

शिवरायांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचा हा मुख्य पाया होता. समता आणि बंधुतेचा मुख्य आधार हा परस्परांचा आदर हाच आहे. याविषयी आपल्या अभंगात रोखठोक भाषेत तुकोबा म्हणतात–

**कोणाही जीवाचा न घडो मत्सर ।**
**वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।**
**तुका म्हणे एका देहाचे अवयव ।**
**सुख दुःख जीव भोग पावे ।।**

कोणाही सजीवाच्या शरीरातील सर्व अवयवांचे संतुलन आणि संचलन जीवाच्या अस्तित्वासाठी चालते. प्रत्येक अवयव एक दुसऱ्याच्या नकळत एकमेकाला मदत करीत असतो. हा एकजीवपणा हीच अवयवांची समरसता. असाच एकजीवपणा तुकोबांना समाजातील विविध घटकांमध्ये अपेक्षित होता.

जन्म आलियाचे फळ । काहीं करावें सफळ ।
ऐसे न करिता निर्फळ । भूमिभार होये ।।

उद्योग किंवा व्यवसाय यामध्ये कार्यरत असणारी प्रत्येक व्यक्ती उद्योगाशी समरस झाली असेल तरच त्या उद्योग व्यवसायाची भरभराट व कायमस्वरूपी विकास होऊ शकेल. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. त्याचप्रमाणे उद्योग, व्यवसायाशी आत्मियता निर्माण होण्यासाठी (ownership), त्यात समरसता साधण्यासाठी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची आवश्यकता आहे. काम करण्याचे, निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, नियम-सोयी-सवलती-सुविधांमध्ये सारखेपणा, कर्मचाऱ्यां-मध्ये दुजाभाव न करता सर्वांना सारखी वागणूक यामुळे त्या कार्याशी/ उद्योगाशी असलेली व्यक्तीची आत्मियता वाढण्यास, समरसता वाढण्यास निश्चित मदत होईल. तुकोबा आपल्या अभंगात म्हणतात,

**'दया करणे जे पुत्रासी ।**
**ते चि दासा आणि दासी ।।'**

औद्योगिक समरसता साधण्यासाठी खरे तर हा मूलमंत्र होऊ शकेल.

सर्वांशी सारखेच-समत्त्वदृष्टीने वागणारा तुकोबांच्या दृष्टीने 'भगवंताची मूर्ती' होता. समरसतेची भावना प्रत्येक समाजघटकात आणि व्यक्तीमध्ये निर्माण होण्यासाठी समदर्शित्वाची भावना फुलून येणे तुकोबांना तसेच प्रत्येक संताला महत्त्वाचे वाटत होते.

तुकोबाराय म्हणतात-

**अवघी एकाची च वीण ।**
**तेथे कैचे भिन्नाभिन्न ।।**
**रिता नाही कोणी ठाव ।**
**सर्वांभूती वासुदेव ।**
**तुका म्हणे तो चि दास ।**
**त्या देखिल्या जाती दोष ।।**

तुकोबांची समत्त्वाची भावना माणसांपर्यंतच मर्यादित नव्हती. तुकोबांना समरसता केवळ समाज घटकांमध्येच अपेक्षित नव्हती. सध्या 'Eco-Friendly' चा, पर्यावरण जपण्याचा काळ आहे. ३५०-४०० वर्षांपूर्वीच तुकोबांनी सृष्टीतील सर्व घटकांच्या समरसतेचे (सहजीवनाचे) महत्त्व अभंगातून प्रकट केले होते.

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ।**
**पक्षी ही सुस्वरे आळविती ।।**
**येणे सुखे रुचे एकांताचा वास ।**
**नाही गुण दोष अंगा येत ।।**

खरा वैज्ञानिक दृष्टिकोन असेल तर समता आणि समरसता व्यवहारात सहज उतरेल. देवही दगडाचा, पायरीही दगडाची मग नेमका फरक कुठे? चराचर सृष्टीशी समरस झालेला भक्त देवाच्या मूर्तीला ज्या भावनेने नमस्कार करतो त्याच समरस भावनेने देवळाच्या पहिल्या पायरीलाही नमस्कार करतो.

तुकोबा आपल्या अभंगात म्हणतात-

**पाषाण देव पाषाण पायरी ।**
**पूजा एकावरी पाय ठेवी ।।**
**सार तो भाव सार तो भाव ।**
**अनुभवा देव ते चि झाले ।।**

सृष्टीमधील प्रत्येक घटकाशी तुकोबा एवढे समरस झाले होते की, प्रत्येक जीव घटकात तुकोबांना विठोबाच दिसत होता. आपल्या प्रत्येक कृतीतही त्यांनी विठ्ठलच पाहिला होता-

**विठ्ठल गीती गावा ।**
**विठ्ठल चित्ती ध्यावा ।**
**विठ्ठल उभा पहावा ।**
**विटेवरी ।।**

नरदेहाचे उचित । काही करावे आत्महित ।
येथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमी लावावे ।।

अशीच समरसता प्रत्येक संताने साधली होती.

**कांदा मुळा भाजी ।**
**अवघी विठाई माझी ।।**

**–संत सावतामाळी**

वंशभेद, वर्णभेद, जातीभेद, कर्मभेद, लिंगभेद बाजूला सारून प्रत्येक माणसामधील माणूस जेव्हा दिसेल, प्रत्येक सजीवामधील आपल्यासारखाच जीव नकळत दिसू लागेल तेव्हा एकमेकांमधील मत्सराची जागा तुकोबांना अपेक्षित असलेल्या आदराने– समरसतेने घेतली असेल. हा आदर नसेल तर तुकोबांच्या लेखी मरणच होते.

तुकोबा म्हणतात–

**'येणे जाणे होय भूतांच्या मत्सरे ।**
**न कळता खरे देव ऐसा ।**
**देव ऐसा जया कळला सकळ ।**
**गेली तळमळ द्वेषबुद्धी ।।'**

कोणत्याही ऊसामध्ये असलेली साखर ज्या व्यावहारिक सहजतेने आपल्याला ओळखू येते त्याच सहजतेने प्रत्येक सजीवामधील परमेश्वर तुकोबांनी पाहिला होता.

तुकोबा आपल्या अभंगात म्हणतात–

**'साखरेचे मूळ ऊस ।**
**तैसा देही देव दिसे ।**
**दुधी असता नवनीत ।**
**नेणे तयाचे मंथित ।।'**

संत तुकोबांचे आणि समर्थ रामदासांचे यासंबंधीचे विचार अगदी मिळतेजुळते होते.

दासबोधामध्ये रामदासांनी म्हटले आहे–

**'उसामध्ये घेईजे रस ।**
**थेर ते सांडिजे बाकस ।**
**तैसा जगामध्ये जगदिश ।**
**विवेके ओळखावा ।।**

आपल्याला आपल्या स्वत:च्या शरीरातील काही कळत नाही. मग सगळ्या जगामधले कसे कळणार? कशी समरसता साधणार? अन्न साखळीचा, जीव साखळीचा विचार केला तर एक सजीव दुसऱ्या सजीवाचा आधार असतो. ईश्वराने मोठे भेद जीवसृष्टीत केले आहेत. त्या भेदांवरच सृष्टी चालत असेल तर सगळे एका धाग्याने कसे जोडले जाणार? समर्थ म्हणतात हे सगळे भेद नसून सृष्टींचा अनुभव घेण्यासाठी केलेली रचना आहे.

**नाना फळे रसाळ लागली ।**
**नाना जिनसी गोडीस आली ।**
**गोडी पहावया निर्माण केली ।**
**नाना शरीरे ।।**

सृष्टीप्रमाणेच माणसांमध्येही देश–स्थल, वेष, भाषा, लिंग यानुसार वेगळेपणा आहे. यात माणसांनी स्वत:हून जपलेले वेगळेपण भर घालते. या परिस्थितीत दोन समान घटक पाण्याच्या दोन प्रवाहांप्रमाणे नकळत एकमेकांत मिसळले पाहिजेत, असे सुचविताना समर्थ म्हणतात–

**का सरिता गंगेसी मिळाली ।**
**मिळणी होता गंगा झाली ।**
**मग जरी वेगळी केली ।**
**तरी होणार नाही सर्वथा ।।**

नैसर्गिकरीत्या हे होतच असते. पण मानवनिर्मित आणि कृत्रिम गोष्टींचे आपल्या जीवनातील

**जेणे नाही श्रवण स्वार्थ । तेथे कैचा हो परमार्थ ।**
**मार्ग केले तितुके वेर्थ । श्रवणेवीण होय ।।**

प्रमाण जसजसे वाढत जाईल तसतसे दोन जनप्रवाह स्वत:च्या वेगळेपणाची जाणीव न ठेवता एकमेकांत मिसळून जातील हे पाहण्याचे काम कोणालातरी पार पाडावे लागेल, तरच होणारी घुसळण सुसह्य असेल. चराचर सृष्टीतील परमेश्वर समरस होऊन पाहावयाचा असेल तर, कोणाला तरी प्रयत्न करावेच लागतील हे सांगताना समर्थ म्हणतात–

**नारायण असे विश्वी ।**
**त्याची पूजा करीत जावी ।**
**याकारणे तोषवावी ।**
**कोणीतरी काया ।।**

असे कष्ट घेतल्यानंतर समरसता अशक्य नाही.

समरसता साध्य झाल्यानंतरचा समाज कसा असेल त्याचे चित्र आपल्यासमोर मांडताना समर्थ दासबोधात म्हणतात–

**उंच नीच नाही परी ।**
**राया रंग येकचि सरी ।**
**जाला पुरुष अथवा नारी ।**
**येकचि पद ।।**

संतांच्याच परिभाषेत सांगायचे तर संकुचितपणा, गळून पडलेले स्वातंत्र्य, साचलेपणा नसलेली समता आणि सापत्नभाव नसलेली बंधुता म्हणजे समरसता. 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा खळाळता प्रवाह म्हणजे समरसता.'

●●●

*With Best Compliments From*

# M/s. Chemtech Specialities
# &
# M/s. Chemtech Laboratories

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

35, Vivek Housing Society, Padmavati, Pune 411009.
Phone - 2436 6994, Telefax - 2436 6996
Email - chemtechlabs@yahoo.com

**श्रवणे घडे चित्तशुद्धी । श्रवणे होये दृढबुद्धी ।**
**श्रवणे तुटे उपाधी । अभिमानाची ।**

# आठवणी दाटतात

वर्षभरामध्ये वर्धिनीशी संबंधित कुटुंबांमध्ये व्यक्तिवियोगाच्या दुःखद घटना घडल्या. या कालावधीत खालील व्यक्तीचे देहावसान झाले.या सर्व कुटुंबियांच्या दुःखात वर्धिनी सहभागी आहे.

- श्री. योगेश फुलपगर
- श्री. चंद्रशेखर शंकर पाठक
- श्री. युवराज ठाकरे
- श्रीमती रोहिणीताई भाटे
- श्री. सुरेश मारुती यादव
- श्रीमती शांताताई घाणेकर
- श्रीमती लक्ष्मीबाई यादव
- श्री. विजय साखरिया



- श्रीमती नानीबाई तबाजी नरवडे
- डॉ. डी. एम. रोंघे
- श्रीमती सदाबाई बलदोटा
- श्री संभाजी आयवळे
- श्री तुकाराम बांद्रे
- श्री. मारुतराव नडे
- श्री. गोपाळराव बीडकर
- सौ. निशा धनागरे

१) **श्रीमती वासंतीताई बेदरकर** यांचे २३ एप्रिल रोजी वृद्धत्वामुळे दुःखद निधन झाले. स्वामी विवेकानंद शाखेच्या कामाची सुरुवात झाल्यापासून त्यांनी श्रीमती कुंतीताई मुजुमदार यांच्या समवेत शाखेचे काम वाढण्यासाठी खूप कष्ट घेतले होते. अत्यंत शांत स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य. स्वामी विवेकानंद शाखेच्या वर्धकांसाठी त्यांनी अनेक वर्षे अत्यंत रुचकर आणि पोषक आहार बनविण्याचे काम अबोलपणे केले. ठरवलेले काम निष्ठापूर्वक आणि तन्मयतेने कसे करावे याचे वासंतीताई बेदरकर हे मूर्तीमंत उदाहरण होते.

२) ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. पु. ग. वैद्य सर यांचे दुःखद निधन झाले. त्यांचे बहुमोल मार्गदर्शन गेली तीस वर्षे वर्धकांना आणि कार्यकर्त्यांना वेळोवेळी मिळत होते.

३) रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक, दै. तरुण भारताचे माजी संपादक आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक श्री. चंद्रशेखर परमानंद तथा बापूसाहेब भिशीकर यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी दुःखद निधन झाले. वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत होते.

४) मुंबई येथे छत्रपती शिवाजी टर्मिनस, हॉटेल ताज, नरिमन हाऊस, हॉटेल ओबेरॉय अशा ठिकाणी अतिरेक्यांनी जो भ्याड हल्ला केला, त्यामध्ये बळी पडलेल्या निष्पाप नागरिकांना तसेच अतिरेक्यांचा हल्ला परतावून लावण्यासाठी पोलिस दलातील व सैन्यदलातील ज्या शूर अधिकारी व सेवकांनी प्राणांची बाजी लावली त्या सर्व शूर वीरांना सश्रद्ध आदरांजली!

या सर्व कुटुंबियांच्या दुःखात वर्धिनी सहभागी आहे.

ज्याचे वय आहे नूतन । त्याने त्याहावे जपोन ।
जनासी पडे मोहन । ऐसे करावे ।।

# आर्थिक आघाडीवरून...

काम सामाजिक असले तरी ते चालू राहण्यासाठी, परिणामकारक होण्यासाठी आणि वाढण्यासाठी जसे वेळ देणाऱ्या कार्यकर्त्यांचे बळ लागते तसेच 'अर्थबळ'ही लागते. कोणत्याही शासकीय मदती-शिवाय काम करताना तर ते अधिकच आवश्यक बनते. गेल्या तीस वर्षापासून वर्धिनी कोणतीही शासकीय आर्थिक मदत न घेता काम करीत आहे. या तीस वर्षांमध्ये कामाचा व्याप जसा वाढला तशीच आर्थिक गरजही वाढली. **१९८१ चा वार्षिक खर्च** होता रु. २०,८०२/- आणि सरलेल्या २००७-०८ या आर्थिक वर्षाचा **मासिक खर्च** होता रु. २,१८,७९६/- विद्यमान प्रकल्प/उपक्रम यामध्ये होणारी वाढ, नव्या प्रकल्प / उपक्रमांची सुरुवात, चलनवाढ अशी अनेक कारणे यामागे आहेत. आपल्या व्यक्तिगत जीवनामध्ये समाजऋण मानणारी आणि त्यासाठी आर्थिक दृष्ट्या सक्रीय सहाय्य करणारी खूप मोठी सज्जनशक्ती समाजात जागोजाग आहे. प्रसिद्धीपासून दूर राहणारी ही माणसं गाजावाजा न करता, वर्धिनीसारख्या सामाजिक काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांना भरभरून साह्य करतात आणि त्यामुळेच समाजातील सेवाभावी संस्था आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी धडपड करू शकतात. अशा सज्जनशक्तीच्या आधारावरच वर्धिनीची आजवरची वाटचाल यशस्वी झाली आहे आणि भविष्यातही होत राहील असा विश्वास आहे. वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षात वर्धिनीच्या कोषामध्ये कायमनिधी वगळता रुपये २६,५३,९२४/- इतकी रक्कम देणगी, व्याज इत्यादी रूपाने जमा झाली व जमा झालेल्या या रकमेचा विनियोग खालील प्रकारे झाला.




वर्षभराचा एकूण खर्च
रु. २६,२५,५५३/-

उद्दिष्टांवर झालेला खर्च
रु. २१,४१,९८१/- (८२ %)

करांपोटी झालेला खर्च
रु. ९९,१४५/- (४ %)

व्यवस्थापकीय खर्च
रु. ३,८४,४२७/- (१४ %)

**दिस जातील, दिस येतील। मंदी सरल, सुख येईल ।**

वर्ष २००८ सरताना मंदीचा फटका जगाच्या अर्थकारणाला बसू लागला आहे. या पार्श्वभूमीवर आर्थिक मंदीने झाकोळलेल्या नव्या वर्षामध्ये चालू असलेल्या सर्व उपक्रमांना लागणारे आवश्यक तेवढे अर्थबळ उभे करण्याबरोबरच विस्ताराच्या नव्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्या सर्वांचे सक्रीय सहकार्य मिळावे अशी विनंती आहे. आर्थिक साह्य करू शकतील अशी नवी माणसे वर्धिनीला जोडण्याच्या कामी आपली मदत मिळाली तर आर्थिक अडचणीच्या या काळातही काम प्रगतीच्या दिशेने पुढे जात राहील असा विश्वास वाटतो.

**धूर्तपणे सकळ जाणावे । अंतरी अंतर बाणावे ।**
**समजल्याविण सिणावे । कासयासी ।।**

## दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागप्रमुख– श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२ भाग १ : भागप्रमुख : श्री. दत्ता सकट ✆ : ९२७००१९१२७**

❖ **रामकृष्ण शाखा**
२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे – ४११ ०११.
शाखाप्रमुख – **श्री. मंदार पोफळे**
✆ :
युवकप्रमुख – **श्री. शैलेश पैलवान**
✆ : ९८८१२५०३३४

❖ **स्वामी विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय
पांडवनगर,वडारवाडी, पुणे–१६
शाखाप्रमुख – **श्री. किरण सूर्यवंशी**
✆ : ९८५०१४८८३६
युवकप्रमुख – **श्री. अमर वाबळे**
✆ : ९९२२०६६८२६

❖ **स्वामी अभेदानंद शाखा**
वीर बाजीप्रभू विद्यालय
गोखलेनगर, पुणे – ४११ ०१६
शाखाप्रमुख – **श्री. चेतन कुसाळकर**
✆ : ९९२२०६५२५९
युवकप्रमुख – **श्री. विक्रांत दिघे**
✆ : ९८६०५०२२०१

---

**भाग २ : भागप्रमुख : धनंजय डोबे ✆ : ९७६७७२३३२२**

❖ **स्वामी योगानंद शाखा**
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ,
पुणे – ४११ ०३०
शाखाप्रमुख – **श्री. प्रसाद गाडे**
✆ : ९८६०६४६१२२
युवकप्रमुख – **श्री. प्रशांत वेदपाठक**
✆ : ९८८११०२३१३

❖ **स्वामी सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२
शाखाप्रमुख – **श्री. कैलास अंडील**
✆ : ९८८१३३८६६८
युवकप्रमुख – **श्री. शिवाजी खरात**
✆ : ९७६५५५९११२

❖ **स्वामी ब्रह्मानंद शाखा**
म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द,
पुणे – ४११ ०५१
शाखाप्रमुख – **श्री. गुरुप्रसाद मुळे**
✆ : ९२७३४५९३७४
युवकप्रमुख – **श्री. महेश पवळे**
✆ : ९८५०६०७०८८

---

**भाग ३ :**
**भागप्रमुख : श्री. विक्रांत महिंद्रकर ✆ : ९२२५५२३२०४**

❖ **स्वामी अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय
बिबवेवाडी, पुणे – ४११ ०३७
शाखाप्रमुख – **श्री. हर्षद कुलकर्णी**
✆ : ९९६००२०३४४
युवकप्रमुख – **श्री. विनोद बिबवे**
✆ : ९८५०८९०८२२

❖ **स्वामी दयानंद सरस्वती शाखा**
विश्वकर्मा विद्यालय, अप्पर इंदिरानगर,
पुणे – ४११ ०३७
शाखाप्रमुख – **श्री.चेतन महिंद्रकर**
✆ : ९७६७७२५२९४
युवकप्रमुख – **श्री.संदीप राणे**
✆ : ९४२१०८०३५४

❖ **स्वामी श्रद्धानंद शाखा**
महर्षि आण्णासाहेब शिंदे विद्यालय
घोरपडे पेठ, पुणे – ४११ ०४२
शाखाप्रमुख – **श्री. निलेश धायरकर**
✆ : ९७६३३६९९८५
युवकप्रमुख – **श्री. चैतन पैलवान**
✆ : ९८८१२३०३०२

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार सायं. ६ ते ८.३०, शनिवार दुपारी ४.३० ते ७.३०, रविवार सकाळी ७.३० ते १०.३०

---

❖ **आजोळ (दुपार शाखा)**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे – ४११ ०११
पालक– **सौ. मंजुषाताई कुलकर्णी**
(संपर्क – सोम. ते शनि. दु. २ ते ५
रवि. सकाळी ७.३० ते १०.३०)

❖ **वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे – ४११ ०११
शाखाप्रमुख – **श्रीमती तस्लीम फणीबंद**
✆ : ९७६७७२५२९४

❖ **भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ,
पुणे – ४११ ०११
पालक – **श्रीमती विद्याताई किंजवडेकर**
✆ : ९७६३३६९९८५

(संपर्क– सोम. ते शुक्र. सायं. ६ ते ८.३०, शनि. दु. ४.३० ते ७.३० रवि. स. ७.३० ते १०.३०)

**नाना साधने निरूपणे । देव शोधाया कारणे ।**
**सकळ आपुले अंत:कर्णे । समजले पाहिजे ।**

# शारदामणि महिला विभाग

महिला विभाग प्रमुख - श्रीमती पुष्पाताई नडे ✆ : ९८२२८२३७५७

'पाकोळी' बालवाडी प्रमुख - सौ. स्वातीताई कारेकर ✆ : ०२०-२६१२७०४

बचतगट समन्वयक - सौ. वासंतीताई कुलकर्णी

सह समन्वयक - श्रीमती विद्याताई किंबवडेकर ✆ : ९७६३३६९९८५

## उद्योगशिक्षण वर्ग

१) सहाय्यक परिचर्या (पुणे वर्ग) - सौ. विजयाताई कुलकर्णी,
सौ. लता सत्तूर, सौ. कुंदा जोशी

सहाय्यक परिचर्या (पौड वर्ग) - डॉ. सौ. व श्री. सचिन नगरकर,
सौ. नंदाताई बेंडखळे, कु. अमृता फाले

सहाय्यक परिचर्या (वेल्हा वर्ग) - श्रीमती अंजुम सय्यद, कु. प्रतिभा शिवतरे,
कु. सुप्रिया गायखे

२) शिवण वर्ग - सौ. माधुरीताई गुरव

३) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग - श्रीमती तस्लिम फणीबंद

साक्षरता प्रसार - श्रीमती सुगंधाताई कबीर

# प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र**

**अभ्यासिका केंद्र** - सौ. सुवर्णाताई पाठक

ग्रंथालय- श्रीमती नीलाताई कुडलिंगार

फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प

श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

**संगणक विभाग**

विभाग प्रमुख - श्री अविनाश जोशी ✆ : ९३७१२७४८५१

**सहाय्यक** - श्री निशिकांत वाईकर ✆ : ९८८१४७९६९९

**मृदगंध गिरीभ्रमण गट**

**समन्वयक** - श्री. चंदन हायगुंडे ✆ : ९८५०५५०८५८,

श्री. निशिकांत वाईकर ✆ : ९८८१४७९६९९

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

**नवीन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्कांच्या वेळा**

१) कर्वेनगर शाखा : श्री. रणजित टेमघरे ✆ : ९८५०२४४२४२

२) पुणे मनपा शिक्षण मंडळ आणि स्व-रूपवर्धिनी संयुक्त संचालित अभ्यासिका केंद्र
औंध परिसर - श्री. श्यामसुंदर जोशी ✆ : ९८२६१११२३४

विश्वी विश्वंभर । बोले वेदांताचे सार ।
जगी जगदीश । शास्त्र वदती सावकाश ।।

# असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) व्यायामशाळा : सकाळी ६ ते ८
२) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
३) अभ्यासिका : सकाळी ८ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) आजोळ प्रकल्प (दुपारशाखा) : दुपारी २ ते ५
३) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र) – प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र – प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) उद्योग शिक्षण वर्ग
३) साक्षरता वर्ग
४) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
५) सेवावस्ती संस्कार वर्ग
६) कुटुंब सल्ला केंद्र
७) शिवणवर्ग
८) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
९) बचतगट
१०) नेत्रचिकित्सा विभाग
११) अभ्यासिका केंद्र

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळामध्ये चालतात.

**कार्यालयीन व्यवस्थापक**

श्री. शिवदास शंकर तथा आप्पासाहेब पोतदार,

**कार्यालय**

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे – ४११०११.
सौ. वासंती कुलकर्णी, कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट,
श्री. अशोकराव चिपळूणकर
(☎ २६१२१७०४, २६१३४३१०)

**संपर्क**

सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

व्यापिले हे नारायणें । ऐसी गर्जति पुराणें ।
जनीं जनार्दन । संत बोलती वचन ।

# प्रार्थना





नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।
हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।।१।।



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।।२।।



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।।३।।



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।।४।।

पर्जन्य वर्षता जीवना वाहावट । ते समसकट गंगे मिळे ।।
सर्व तें हें जाय गंगाचि होऊन । तैसा वर्णावर्ण नाही नामीं ।।